CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३५१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### कच्च्या तेलाचा पुन्हा भडका!

नवी दिल्ली : अमेरिका, इस्त्रायल आणि इराण युद्धामुळ कच्च्या तेलाचे भाव आता प्रति बॅरल ११५ च्या वर गेले आहेत. चिंतेची गोष्ट ही की, हे वाढलेले भाव खाली येण्याचे नावच घेत नाहीत. काही दिवसांपूर्वी पश्चिम आशियात युद्ध थांबण्याचे संकेत मिळाले होते. तेव्हा भाव १०० च्या खाली आल्यामुळे सर्वांना दिलासा मिळाला होता; पण ही आशा फार काळ टिकली नाही आणि आता पुन्हा दरवाढीचा भडका उडाला आहे. पश्चिम आशियातील संघर्ष आता पाचव्या आठवड्यातही कायम आहे. तो थांबण्याऐवजी अधिक चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत. या संघर्षात नवीन देश सामील झाले असून लष्करी हालचाली तीव्र झाल्या आहेत. यामुळे बाजारपेठेचा कल आता 'तात्पुरता अडथळा' कडून 'दीर्घकालीन धोका' या विचाराकडे वळला आहे. या सर्व चिंतेच्या केंद्रस्थानी 'होर्मुझची सामुद्रधुनी' आहे. हा जगातील सर्वात महत्त्वाचा तेल वाहतूक मार्ग आहे.

### धावत्या टँकरखाली उडी घेत मजुरानं संपवलं जीवन

चंद्रपूर : चंद्रपूर जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. रस्त्यावर धावणाऱ्या डिझेलच्या टँकरखाली झोकून देत एका मजुराने आत्महत्या केली आहे. बल्लारपूर शहरात ही धक्कादायक घटना घडली आहे. आत्महत्येची घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. मृताची ओळख भैरव खेडू ठाकूर (४०) अशी पटली आहे. आत्महत्येचं कारण अद्याप समजलेलं नाही. मिळालेल्या माहितीनुसार, मृत मजूर बिहारचा रहिवासी असून तो बांधकामावर मजूर म्हणून काम करत होता. काल दुपारी एक डिझेल टँकर राजुरा शहराच्या दिशेने जात होता, तेव्हा रस्त्याच्या कडेला झाडाखाली बसलेल्यांपैकी एकाने उठून थेट टँकरच्या पुढच्या चाकासमोर स्वतःला झोकून दिले. टँकरचे पुढचे चाक त्याच्या अंगावरुन गेल्यानं त्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. अचानक घडलेल्या या घटनेमुळं घाबरलेल्या टँकर चालकाने तात्काळ टँकर थांबवला आणि तो घटनास्थळावरुन पळून गेला. आत्महत्येमागील कारण अज्ञात असून पोलीस तपास करत आहेत.

### सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकाचा मृत्यू

**भंडारा :** एका आरोपीला न्यायालयात पेशीवर नेलं असता सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकाला हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना भंडाऱ्याच्या साकोली न्यायालयात आज दुपारी घडली. किशोर शेळके (५५) असं मृत सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकांचं नावं आहे. किशोर शेळके हे भंडारा पोलीस मुख्यालयाच्या बँड पथकात कर्तव्यावर असून आज साकोली पोलीस ठाणे अंतर्गत एका गुन्ह्यातील आरोपीला त्यांनी भंडारा जिल्हा कारागृहातून साकोली न्यायालयात पेशीवर नेलं होतं. शेळके यांना यावेळी हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि उपचारापूर्वीचं त्यांचा मृत्यू झाला.

### रेती माफीयाने शेतकऱ्यावर उगारली कुऱ्हाड

बुलढाणा जिल्ह्यात रेती माफीयांची मुजोरी दिवसेंदिवस वाढत जात असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील वडनेर भोलजी येथील शेतकरी शेर खान आमिर खान हे त्यांच्या शेतात गेले असता परिसरातील वाळूमाफिया असलेला एजाजखान मिलखान व जावेद खान मिल खान यांनी शेतकरी शेरखान यांना कुराडीचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली आहे. घटनास्थळी दोघांमध्ये वाद होऊन एजाज खान यांनी शेतकऱ्यावर चक्क कुऱ्हाड उगारली आहे. याप्रकरणी नांदुरा पोलीस स्टेशनमध्ये एजाज खान व जावेद खान याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पार्थ पवार अचानक राज ठाकरेंच्या भेटीला

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणातून एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) युवा नेते आणि खासदार पार्थ पवार यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी भेट घेतली. सुमारे दीड तास चाललेल्या या प्रदीर्घ चर्चेमुळे राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

# २४ लाख ७३ हजार थकबाकीदार शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मार्ग मोकळा

## ३० जूनआधी प्रक्रिया पूर्ण करणार; राज्यस्तरीय बँकर्स कमिटीचा अहवाल तयार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ३० मार्च :** राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजने'च्या अंमलबजावणीला आता वेग आला आहे. राज्यस्तरीय बँकर्स कमिटीने थकबाकीदार शेतकऱ्यांचा सविस्तर अहवाल तयार केला असून, यामुळे सुमारे २४ लाख ७३ हजार ५६६ शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मार्ग मोकळा झाला आहे. ३० जूनपर्यंत ही सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीची घोषणा केली होती. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी



सहकार विभागाने जिल्हा मध्यवर्ती आणि राष्ट्रीयीकृत बँकांकडून थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती संकलित केली आहे. विशेष म्हणजे, केवळ पीककर्जच नव्हे, तर मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जाचाही यात समावेश करण्यात आला असून, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकबाकी असलेल्या पात्र शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

### नेमके निकष काय?

या कर्जमाफीबाबत महत्त्वाची बाब म्हणजे, फक्त थकीत पीककर्जच माफ होईल असा निकष सरकारने ठेवलेला नाही. अनेक शेतकऱ्यांचे पीककर्ज नियमित असले तरी शेतीसाठी घेतलेले मध्यम किंवा दीर्घ मुदतीचे कर्ज थकले आहे. अशा शेतकऱ्यांनाही दोन लाखांच्या मर्यादेत कर्जमाफीचा लाभ दिला जाणार आहे. पीककर्ज परतफेडीची मुदत ३० जून असते, त्याआधीच ही प्रक्रिया पूर्ण करून शेतकऱ्यांना सातबारा कोरा करण्याची संधी दिली जाईल, असे सहकार विभागातील सूत्रांनी सांगितले.

बँकर्स कमिटीच्या अहवालानुसार, राज्यातील १ कोटी ३३ लाख शेतकऱ्यांपैकी सुमारे २४ लाख ७३ हजार शेतकरी थकबाकीदार आहेत. त्यांच्याकडे एकूण ३५ हजार ४७७ कोटी रुपयांची थकबाकी आहे. यात सोलापूर, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, नांदेड आणि अहिल्यानगरसह एकूण १४ जिल्ह्यांमध्ये थकबाकीचे प्रमाण सर्वाधिक आहे. या शेतकऱ्यांच्या खात्यावर दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम थेट जमा केली जाणार आहे.

# आखाती देशांमधील युद्धाचा गणेश मूर्तिकारांना फटका

## परदेशी मूर्ती पाठवण्यात येत आहेत अडचणी

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ३० मार्च :** गणेशमूर्तींचं माहेरघर म्हणून प्रसिद्ध असलेल्या पेण येथील मूर्तिकारांना यंदा गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. आखाती देशांमधील तणावपूर्ण परिस्थितीचा थेट परिणाम गणेश मूर्तींच्या निर्यातीवर झाला असून जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट म्हणजेच बंदरात विविध मालाचे कंटेनर अडकून पडले आहेत.

या परिस्थितीमुळे गणेशमूर्ती निर्यातीसाठी आवश्यक असलेल्या कंटेनरची उपलब्धता कमी झाली आहे. परिणामी, दुबई, लंडन, वेस्ट इंडीज, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंडोनेशिया, थायलंड आणि मॉरिशस यांसारख्या देशांमध्ये पाठवण्यात येणाऱ्या गणेशमूर्ती वेळेत पोहोचण्याची शक्यता धोक्यात आली आहे.

याचा थेट फटका स्थानिक मूर्तिकारांना बसत असून त्यांच्या उत्पन्नावर परिणाम होत



आहे. वाढत्या अडचणींमुळे पेणमधील या पारंपरिक व्यवसायासमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे.

दरम्यान अमेरीका इराण आणि इस्रायल यांच्यातील युद्धाला एका महिन्यापेक्षा जास्त काळ उलटला असून हे युद्ध दिवसेंदिवस अधिक तीव्र होताना दिसत आहे. इराणने कुवेत सिटी जवळच्या वीज तसेच पाणी शुद्धीकरण प्रकल्पावर हवाई हल्ला केला. या हल्ल्यात एका भारतीय कामगाराचा मृत्यू झाला. कुवेतच्या वीज आणि पाणी शुद्धीकरण प्रकल्पाच्या सरकारी इमारतीचे हल्ल्यात मोठे नुकसान झाले.

# अमेरिकेनं इराणला चारही बाजूंनी घेरलं... ५० हजार सैनिक तैनात

**तेहराण/वृत्तसंस्था :** अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध एका वेगळ्या वळणावर पोहचलं आहे. अमेरिका आणि इस्त्रायलने प्रचंड मिसाईल आणि ड्रोन हल्ले करून देखील इराण मागे हटण्यास तयार नाही. अमेरिका देखील इराण युद्ध लवकर संपवण्याच्या मानसिकतेत दिसत नाहीये. त्यातच आता मध्य पूर्व आशियातील अमेरिकेच्या तैनात असलेल्या सैनिकांची संख्या ५० हजारांपर्यंत पोहचली आहे. ही सामान्य परिस्थितीपेक्षा १० हजारांनी जास्त आहे.

न्यूयॉर्क टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार २५०० मरीन, २५०० नेव्हीचे नवे जत्थे मध्य पूर्व आशियात दाखल झाले आहेत. अमेरिका या भागात मजबूत घेराबंदी केली जात आहे. सध्या परिस्थिती अशी आहे की कधीही काहीही होऊ शकतं. राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प हे इराणसोबत एक महिना सुरू असलेल्या युद्धाबाबत पुढचा निर्णय घेणार आहेत. यात इराणचे रणनैतिक बेटे ताब्यात घेण्याची योजना सामील असू शकते.

५० हजार सैनिक तैनात मात्र..



अमेरिकेच्या लष्कराने आपली ८२ एअरबॉर्न डिव्हिजनचे जवळपास २००० पॅराट्रुपर्स इराणजवळ तैनात केले आहेत. ही सर्व लष्करी कवायत होर्मुझ स्ट्रेटवरील इराणचे नियंत्रण कमी करून त्यावर ताबा मिळवण्यासाठी सुरू असल्याचं बोललं जात आहे. मात्र लष्करासंबंधीचे जाणकार सांगतात की इराणसारख्या मोठ्या देशावर नियंत्रण मिळवण्यासाठी ५० हजार सैनिकांची तादक ही खूप कमी आहे. सध्याच्या घडीला अमेरिकेची लढाऊ विमाने इराणच्या मुख्य तेल निर्यात केंद्रांवर खार्ग बेटासह ९० ठिकाणी बॉम्बवर्षाव करत आहेत.

होर्मुझ खुला करण्याचं आव्हान

जगाचं जवळपास २० टक्के तेल या होर्मुझ सामुद्रधूनीमधून प्रवास करतं. इराणच्या सततच्या हल्ल्यांमुळं हार्मुझ ठप्प झालं आहे. ट्रम्प प्रशासन हा जलमार्ग पुन्हा सुरक्षित करण्यासाठी या बेटाच्या जमिनीवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न करण्याची शक्यता आहे.

# पत्नीच्या माहेरच्या मालमत्तेवर पतीचा हक्क नाही : हायकोर्टाचा निकाल

**तभा वृत्तसेवा**

**अमरावती, दि. ३० मार्च :** एखाद्या हिंदू महिलेचा मृत्यू मृत्युपत्र न करता झाला, तर तिला तिच्या पालकांकडून वारशाने मिळालेली मालमत्ता तिच्या वडिलांच्या वारसांकडे जाईल. अशा मालमत्तेवर तिचा पती किंवा त्याच्या वारसांचा कोणताही हक्क असणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने दिला आहे.

'लाईव्ह लॉ'च्या रिपोर्टनुसार, एका आजीने २००२ मध्ये आपली जमीन आपल्या पहिल्या नातीला 'बक्षीस पत्र' करून दिली होती आणि तिची रीतसर नोंदही झाली होती. मात्र, २००५ मध्ये या पहिल्या नातीचा कोणताही वारस (अपत्य) नसताना मृत्यू झाला. नातीच्या मृत्यूनंतर आजीने ते जुने बक्षीस पत्र रद्द केले. नवीन 'मृत्युपत्र' तयार करून तीच जमीन आपल्या दुसऱ्या नातीला (याचिकाकर्ती) दिली. २०१२ मध्ये आजीच्या निधनानंतर दुसऱ्या नातीने जमिनीवर नाव लावण्यासाठी अर्ज केला. याला सरकारी अधिकाऱ्यांनी मंजुरी दिली. परंतु, पहिल्या (मृत) नातीच्या पतीने याला विरोध केला. पतीचा दावा असा होता की, पत्नीच्या मृत्यूनंतर त्या जमिनीवर तिचा पती म्हणून आपला कायदेशीर हक्क आहे. अखेर २०२३ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी मूळ बक्षीस पत्र रद्द करणे अवैध ठरवत पतीच्या बाजूने निकाल दिला. या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.

याचिकेवर सुनावणी करताना हिंदू न्यायमूर्ती तारला राजशेखर राव यांनी नमूद केले की, हिंदू वारसा कायदा १९५६ च्या कलम १५(२)(र) चे वाचन केल्यास हे स्पष्ट होते की, एखाद्या हिंदू महिलेला तिच्या माहेरून (आई किंवा वडिलांकडून) वारशाने जमीन किंवा मालमत्ता मिळाली असेल आणि तिचा मृत्यू झाला, जर तिला मुले नसतील, तर ती मालमत्ता तिच्या पतीला न मिळता पुन्हा तिच्या वडिलांच्या नातेवाईकांना (वारसांना) मिळते. माहेरच्या मालमत्तेवर पतीचा कोणताही हक्क राहत नाही.

जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश केला रद्द

न्यायालयाने म्हटले की, मृत पत्नीला जमीन तिच्या माहेरून (आजी-आजोबा किंवा आई-वडिलांकडून) मिळाली होती. तिला कोणतेही मूल नव्हते. अशा परिस्थितीत, हिंदू वारसा कायद्यानुसार, त्या जमिनीवर तिच्या पतीचा कोणताही कायदेशीर हक्क राहत नाही. पतीचा हक्कच नसल्यामुळे आजीने केलेले बक्षीस पत्र रद्द करण्याच्या निर्णयाला विरोध करण्याचा अधिकारही त्याला नाही. अखेर, न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यांचा आधीचा निर्णय रद्द केला आणि तहसीलदारांना आदेश दिला की, त्या जमिनीवर दुसऱ्या नातीचे (याचिकाकर्तीचे) नावाची नोंद करावी.

# भोंदू बाबाचा मोठा पर्दाफाश! खरातचा सीएही रडारवर, १५०० कोटींच्या मालमत्तेचा होणार तपास

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ३० मार्च :** स्वतःला ज्योतिषी म्हणवत भविष्य सांगण्याच्या नावाखाली महिलांना जाळ्यात ओढून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करणारा आणि आर्थिक फसवणूक करणारा भोंदू बाबा अशोक खरात (-नेिहेज़ घहरीरीं) याच्याविरोधातील तपास अधिक गतीने सुरू आहे.



गेल्या दोन आठवड्यांपासून पोलिस कोठडीत असलेल्या खरातची सखोल चौकशी सुरू असून त्याच्याशी संबंधित अनेक व्यक्तीही आता पोलिसांच्या रडारवर आल्या आहेत.

तपासात खरातने फसवणूक करून कोट्यवधींची संपत्ती उभी केल्याचे समोर आले आहे. त्याच्याकडे मोठ्या प्रमाणावर मालमत्ता, जमीन-जुमला असल्याची माहिती पुढे आली आहे.

याच प्रकरणात आता नवी घडामोड समोर आली असून खरातचे आर्थिक व्यवहार पाहणारा चार्टर्ड अकाउंटंट (सीए) पोलिसांच्या चौकशीत आहे. खरातच्या सुमारे १५०० कोटींपेक्षा अधिक मालमत्तेवर एसआयटीची करडी नजर असून या सीएकडून महत्त्वाची आर्थिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. हा सीए केवळ खरातचेच नव्हे, तर शिवनिका संस्थानच्या आजी-माजी सदस्यांचेही आर्थिक व्यवहार पाहत होता.

शिवनिका ट्रस्टच्या व्यवहारांवरही संशय व्यक्त होत आहे. २०१८ मध्ये अवघी चार लाखांची उलाढाल असलेल्या या ट्रस्टने २०२४ पर्यंत कोट्यवधींची झेप घेतल्याने तपास यंत्रणा अधिक सतर्क झाली आहे. या व्यवहारांची सखोल चौकशी केली जाणार आहे.

दरम्यान खरातविरोधात अनेक महिलांनी पुढे येत तक्रारी नोंदवल्या असून प्रकरणाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. आता शिवनिका संस्थेच्या सर्व आजी-माजी सदस्यांची चौकशी होणार असून रुपाली चाकणकर (ठीं-रिश्रिळ उहरज़रपज़री) यांचीही चौकशी होण्याची शक्यता आहे. एसआयटीकडून संबंधितांना समन्स बजावण्यात आले असून या चौकशीतून आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नवी मुंबईतील हॉटेल, खानावळी डबघाईला!

**तभा वृत्तसेवा**

**नवी मुंबई, दि. ३० मार्च :** नवी मुंबई शहरात व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या तीव्र तुटवड्यामुळे हॉटेल व खानावळी व्यवसायावर मोठे संकट ओढवले आहे. गेल्या काही दिवसांपासून सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाल्याने अनेक हॉटेल्सना वेळेवर गॅस उपलब्ध होत नाही. परिणामी, काही हॉटेल्स अंशतः बंद ठेवावी लागत आहेत, तर काही ठिकाणी पूर्णपणे शटर खाली करण्याची वेळ आली आहे.

या तुटवड्याचा थेट परिणाम हॉटेलच्या दैनंदिन कामकाजावर होत असून, मेनू कार्डमधील अनेक पदार्थ हटवण्यात आले आहेत. तर, जे पदार्थ उपलब्ध आहेत, त्यांचे दर वाढवल्यामुळे ग्राहकही हैराण झाले आहेत.

बाजारात सिलिंडरची कमतरता असल्याने काही ठिकाणी काळाबाजार वाढल्याचेही समोर आले आहे. अधिकृत दरापेक्षा अनेक

## पुरवठा विस्कळीत, काही हॉटेल्स बंद तर मेनू महाग; सिलिंडरचा दर ५ हजारांपर्यंत, कांद्याच्या मागणीतही घट

पटीने जास्त दर मोजून व्यावसायिकांना सिलिंडर खरेदी करावा लागत आहे. सध्या एक व्यावसायिक सिलिंडर तब्बल ५ हजार रुपयांपर्यंत विकला जात असल्याची माहिती हॉटेल व्यावसायिकांनी दिली आहे.

या वाढत्या खर्चामुळे हॉटेल चालकांवर आर्थिक ताण वाढला असून, तो ताण कमी करण्यासाठी अनेकांनी मेनूमधील पदार्थांच्या किमतीत सुमारे १० टक्क्यांनी वाढ केली आहे. काही ठिकाणी तर कमी मागणी असलेले किंवा जास्त गॅस लागणारे पदार्थ पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत. एकूणच, गॅस तुटवड्यामुळे नवी मुंबईतील हॉटेल उद्योग संकटात सापडला असून, याचा परिणाम थेट ग्राहकांवरही होत आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून पुरवठा सुरळीत न केल्यास, येत्या काळात अनेक हॉटेल्स बंद पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

एलपीजी गॅसच्या तुटवड्यामुळे मुंबई आणि आसपासच्या शहरांतील ७० ते ७५ टक्के हॉटेल व्यवसाय बंद झाल्याने कांद्याच्या मागणीत मोठी घट झाली आहे. परिणामी, कांद्याच्या दरातही घसरण झाली आहे. सध्या पांढऱ्या कांद्याला १५ ते २० रुपये किलो दर मिळत आहे. महाराष्ट्रातील नं. १ चा कांदा १३ ते १५ रुपये, नं. २ चा कांदा १० ते १२ रुपये किलो दराने विकला जात आहे. बिनपातीचा सुका कांदा ६ ते ८ रुपये, तर बिनपातीचा ओला कांदा ४ ते ६



रुपये किलो दराने मिळत आहे.

गॅस हा आमच्या व्यवसायाचा कणा आहे. सिलिंडरच मिळत नसेल तर व्यवसाय कसा चालवायचा हा मोठा प्रश्न आहे. ग्राहकांना परत पाठवावे लागते. काळ्या बाजारातून महागात सिलिंडर घ्यावा लागतोय. रोजचा खर्च प्रचंड वाढला आहे. त्यामुळे आम्हाला दर वाढवण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे.

**–रोहित सुर्वे, हॉटेल व्यावसायिक**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## छ.संभाजीनगर शहरात इंधन दरवाढीच्या निषेधार्थ रिक्षा चालकांनी पुकारला संप

**छत्रपती संभाजीनगर |** छत्रपती संभाजीनगर शहरात इंधन दरवाढीच्या निषेधार्थ रिक्षा चालकांनी संप पुकारला असून सार्वजनिक वाहतूक सेवा ठप्प झाली आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने रिक्षाचालक सहभागी झाले असून त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. अचानक रिक्षा बंद झाल्याने बाहेरून येणाऱ्या प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. कामावर जाणारे नागरिक, विद्यार्थी आणि रुग्ण यांचे हाल झाले. इंधन दर कमी करावा तसेच भाडेवाढ लागू करावी, अशी मागणी रिक्षाचालकांनी केली आहे.

## गॅलेक्सी बुक६ सिरीज लाँच

छत्रपती संभाजीनगर - सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने गॅलेक्सी बुक६ सिरीज लाँच केली आहे, जिची किंमत १,२७,९९० रूपयांपासून सुरू होते. सॅमसंगची सर्वात प्रगत गॅलेक्सी बुक सिरीज अचूक अभियांत्रिकी आणि संतुलित, स्लिम प्रोफाइलच्या माध्यमातून एआय-समर्थित उत्पादकता वाढवते. गॅलेक्सी बुक६ सिरीजमध्ये इंटेल® कोअर™ अल्ट्रा सिरीज ३ प्रोसेसर्सची शक्ती आहे, जे जलद प्रोसेसिंग, सुलभ मल्टीटास्किंग आणि प्रतिसादात्मक एआयसाठी मागील जनरेशन्सच्या तुलनेत ६० टक्क्यांहून अधिक जलद सीपीयू कार्यक्षमता देतात. एकीकृत करण्यात आलेले एनपीयू इमेज क्लीनअप, त्वरित भाषांतर आणि सर्वोत्तम शोध अशा एआय-संचालित टास्क्ससाठी जवळपास ५० टॉप्सना पाठिंबा देते. हे सर्व टास्क्स क्लाऊडवर अवलंबून न राहता त्वरित होतात.

## टाटा सॉल्टतर्फे श्रेणीतील नेतृत्व अधिक मजबूत

छत्रपती संभाजीनगर: 1983 पासून भारतातील आयोडाईज्ड मीठ विभागातील आणि बाजारपेठेतील अग्रणी टाटा सॉल्ट आपल्या उत्पादनांमध्ये अतुलनीय शुद्धता आणि सुधारणा सुनिश्चित करण्याची परंपरा कायम ठेवत आहे. प्रयोगशाळेतील चाचणीद्वारे प्रमाणित झाल्यानुसार नमूद केलेल्या 100 मीठांपैकी टाटा सॉल्टने सर्वाधिक शुद्धतेसह आघाडी मिळवली आहे. यामुळे केवळ प्रदेशातच नव्हे तर संपूर्ण भारतात शुद्धता आणि अस्सलतेसाठी टाटा सॉल्ट हे एक मापदंड म्हणून प्रस्थापित झाले आहे.

## 'इत्ती सी खुशी' मालिकेत भूमिका गुरंग ची एन्ट्री

सोनी सबवरील इत्ती सी खुशी या मालिकेत आता एक नवा ट्विस्ट येणार आहे. लोकप्रिय अभिनेत्री भूमिका गुरूंग या मालिकेत सारा सेठी या भूमिकेत दाखल होत आहेत. सारा ही व्यक्तिरेखा ग्लॅमर, अनपेक्षित वळणं आणि भावनांचा प्रचंड वादळ घेऊन कथेत प्रवेश करते. तिच्या आगमनामुळे नातेसंबंधांमध्ये उलथापालथ होणार असून, कथानकाची दिशा पूर्णपणे बदलणार आहे. भूमिका गुरूंग यांची व्यक्तिरेखा सारा ही एक यशस्वी हॉटेलियर असून साऊथ मुंबईतील हाय-सोसायटी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखली जाते. तिचा तीक्ष्ण मेंदू, हटके आकर्षण आणि बिनधास्त वृत्ती यामुळे ती वेगळी ठरते.

## नाट्यकलेच्या मुळांना मानाचा मुजरा

साजरा होणारा वर्ल्ड थिएटर डे हा रंगभूमीच्या समृद्ध परंपरेला आणि तिच्या कायमस्वरूपी प्रभावाला दिलेला सन्मान आहे. या निमित्ताने सोनी सब चे कलाकार करुणा पांडे, वरुण बडोला, उत्कर्षा नाईक, रजत वर्मा, ऋषी सक्सेना, दीक्षा जोशी आणि नेहा एस.के. मेहता यांनी आपल्या रंगभूमीच्या प्रवासाची आठवण करून दिली. रंगमंचाने त्यांना दिलेली शिस्त, स्पॉन्टेनिटी आणि प्रेक्षकांशी थेट नाते आजही त्यांच्या अभिनयाला समृद्ध करते. लाईव्ह स्टोरीटेलिंगचे बारकावे आत्मसात करणे आणि रिटेक्सशिवाय परफॉर्मन्सची अनिश्चितता स्वीकारणे—या अनुभवांनी त्यांच्या ऑन-स्क्रीन भूमिकांना अधिक खोली दिली आहे.

## नथसह पारंपरिक महाराष्ट्रीय लुक

सोनी सब वरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेने आपल्या हृदयस्पर्शी कथाकथन आणि सांस्कृतिक क्षणांमुळे प्रेक्षकांच्या मनात खास स्थान मिळवले आहे. अलीकडील गुढीपाडव्याच्या सिक्वेन्समध्ये मालिकेत रंगतदार सणासुदीचे वातावरण दाखवले गेले, ज्यात पात्रांनी खऱ्या महाराष्ट्रीयन पद्धतीने उत्सव साजरा केला.या सिक्वेन्समध्ये शानाया ही भूमिका साकारणारी अभिनेत्री मुस्कान बामने पारंपरिक महाराष्ट्रीयन लूकमध्ये झळकली. तिने गुलाबी रंगाची नऊवारी साडी, कॉन्ट्रास्टिंग ब्लाउज आणि नथ, बांगड्या तसेच सोन्याचे सूक्ष्म दागिने परिधान केले होते.

## व्यक्तिमत्त्वांचा संघर्ष होईल तेव्हा

सोनी सब वरील इत्ती सी खुशी प्रेक्षकांच्या मनाला भिडणारी कहाणी पुढे नेत आहे. अन्विता (सुम्बुल तौकीर खान) चा प्रवास आता एका नव्या टप्प्यावर पोहोचतो आहे, जिथे प्रेम, महत्वाकांक्षा आणि कठीण निर्णय तिच्या आयुष्याचा भाग बनतात. येणाऱ्या एपिसोड्समध्ये कथा सहा महिन्यांनी पुढे सरकते आणि आशा, नवीन सुरुवाती आणि अनपेक्षित वळणांनी भरलेला एक नवा अध्याय सुरू होतो.या नव्या फेजमध्ये, प्रोफेशनल धक्का बसल्यानंतर अन्विता प्रेमाला आपली ताकद मानते आणि लग्नाच्या तयारीला सुरुवात करते. पण लवकरच तिच्या आणि विराट (रजत वर्मा) च्या विचारांमध्ये फरक दिसू लागतो. लग्नाच्या तयारीदरम्यान त्यांच्या नात्याला त्यांच्या वेगळ्या स्वभावामुळे कसोटीला सामोरे जावे लागते.

## झी कुटुंब ॲवॉर्ड्स 2026 : प्रेक्षककेंद्री नवकल्पनांचा भव्य अनुभव

**छत्रपती संभाजीनगर |** Zee TV ने 'झी कुटुंब ॲवॉर्ड्स 2026' द्वारे आपल्या कंटेंट स्ट्रॅटेजीला नव्या उंचीवर नेले आहे. यंदाचा सोहळा केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित न राहता, एक समग्र आणि इमर्सिव्ह एंटरटेनमेंट अनुभव म्हणून सादर होत आहे. प्रेक्षकांच्या बदलत्या अपेक्षांचा विचार करून प्रत्येक परफॉर्मन्स, सादरीकरण आणि नॅरेटिव्ह अधिक प्रभावी करण्यात आले आहे. उच्च प्रॉडक्शन व्हॅल्यूज, जागतिक दर्जाचे सेट डिझाइन आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा प्रभावी वापर यामुळे या सोहळ्याची रीच आणि एंगेजमेंट वाढली आहे. प्रेक्षकांना केंद्रस्थानी ठेवण्याच्या धोरणामुळे भावनिक कनेक्ट अधिक दृढ झाला आहे.

# हिंदूराष्ट्र साठी हिंदू संमेलन सोयगाव मधून घ्यावे : आशुतोष झा

## सोयगाव येथे भव्य हिंदू संमेलन संपन्न ; नागरिकांचा मोठा प्रतिसाद





**तभा. वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.३० मार्च |** सोयगाव शहरात सकल हिंदू समाजाच्या वतीने रविवारी आयोजित भव्य हिंदू संमेलनात मोठ्या संख्येने जनसागर उपस्थितहोता. यावेळी व्यासपीठावर प्रमुख वक्ते आशुतोष झा,गोपाल चैतन्य महाराज,प.पू.ब्रम्हांनंद महाराज,गोरक्षनाथ आबुज,ह.भ.प.कु.जान्हीताई सोनवणे,सारिकाताई मिसाळ,आदींची उपस्थिती होती सोयगाव मंडळ अंतर्गत दहा गावांचे हे भव्य हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले.यावेळी आशुतोष झा यांनी सोयगावात गर्दी पाहून हिंदूराष्ट्र साठी हिंदू संमेलन सोयगाव मधून घ्यावे असे सांगून धर्माचा इतिहास प्रत्येकाच्या रक्ताच्या धमन्या मध्ये गेला पाहिजे त्यासाठी धर्माचा अभिमान बाळगा व हिंदू धर्माचा शत्रू कोण हे ओळखून धर्म म्हणजे सनातनचा गुण अंगिकरावा तसेच महिलांच्या रक्षणासाठी हिंदू धर्म आहे हे हिंदू राष्ट्र होईपर्यंत गप्प बसणार नाही असेही त्यांनी ठणकावून सांगितले या ब्रह्मांडावर एकच हिंदू धर्म असून सर्वांना सोबत ठेवण्याची ताकद हिंदू धर्मात आहे.राजकारण वर टीका करत त्यांनी जे हिंदू धर्माचा अपमान करून मतांसाठी इतर धर्मांचे लांगुन चलन करतील त्यांच्या साठी दरवाजे बंद करा असेही त्यांनी सांगितले आहे. गोरक्षनाथ आबुज यांनी हिंदू संमेलन हे कोणाच्याही विरोधात नाही शक्ती संचय व दोष दूर करण्यासाठी हे संमेलन असून इतरांच्या पोटात गोळा उठू नये असा टोला त्यांनी लागवला हिंदू धर्माची प्राचीन ग्रंथात सुमारे पाच हजार वर्षापूर्वी पासून नोंद आहे म्हणून सनातन धर्म म्हणून हिंदू धर्माची ओळख आहे असेही त्यांनी सांगितले हिंदू धर्मात महिलांना १९५० मध्ये राज्यघटना तयार करून मतदानाचा अधिकार दिला आहे.महिलांना स्थान आहे त्यामुळे हिंदू धर्मात महिलांना मंदिरातील देव मानतात वैचारिक आक्रमक थांबवून सामाजिक समरसता,एक गाव एक मंदिर,कुटुंबातील एकत्र पद्धत यामध्ये भजन आणि भोजन एकत्र घ्यावे भाषा,भूषा आदींचा विचार पूर्वक वापर करा कुटुंबाने एकत्रित तीर्थस्थळ करा असे संकल्प करण्याचे आवाहन केले. प.पू.ब्रम्हानंद महाराज यांनी धर्म,मोक्ष,अर्थ आणि काम हे म्हणजेच सनातन धर्म असे सांगितले वृंदावन धाम आश्रमाचे गोपाल चैतन्य महाराज,सारिकाताई मिसाळ,यांनीही मनोगत व्यक्त केले.या भव्य हिंदू धर्म संमेलनात सोयगाव सह परिसरातील अफाट गर्दी हे या संमेलनाचे वैशिष्ट्ये ठरले.या कार्यक्रम प्रसंगी कल्पेश जोशी यांनी प्रास्ताविक सादर केले तर हर्षल हिंदू यांनी सूत्रसंचालन केले व ह.भ.प.सुधन्वा केणेकर यांनी आभार व्यक्त केले.यावेळी सोयगाव पोलीसांनी बंदोबस्त ठेवला होता.

# ग्राहकांना गॅस वितरण घरपोच करावे : दिलीप स्वामी



**तभा. वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर |** घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होऊन स्थिती पुर्वपदावर आणण्यासाठी कठोर उपाययोजना राबवा. कोणत्याही परिस्थितीत ग्राहकाला गॅस सिलींडर हे घरपोच डिलीव्हरीद्वारेच पोहोचवावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

गॅस पुरवठ्याबाबत येत असलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक बोलावण्यात आली. लोकांना सिलींडर मिळविण्यासाठी हाल सोसावे लागत असल्याने जिल्हाधिकारी स्वामी यांनी गॅस पुरवठादार संस्थांची बैठक बोलावली. जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, गॅस उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी नितीन बजाज, शुभम चौहान तसेच रेखा केदारे, माधुरी कदम, सविता काकडे तसेच जिल्ह्यातील अन्य गॅस वितरक उपस्थित होते. जिल्ह्यात गॅसचे बुकींग वाढले आहे. युद्धाच्या पार्श्वभुमिवर हे बुकींग वाढले असून दिलेल्या मुदतीत लोकांना सिलींडर घरपोच दिले जात आहे. मार्च, एप्रिल महिन्यात असणाऱ्या सरासरी पुरवठ्या इतकीच मागणी होत असल्याचे कंपनीचे प्रतिनिधी यांनी निदर्शनास आणले.

गॅसचे बुकींग ऑनलाईनच होत आहे. मात्र अनेक लोक सिलींडर संपल्यावर थेट सिलींडर घेऊनच एजन्सीवर गर्दी करत आहेत,असे एजन्सीधारकांतर्फे सांगण्यात आले.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी निर्देश दिले की, कोणताही ग्राहक सिलींडर घेऊन एजन्सीवर येता कामा नये. ग्राहकाने बुकींग केल्यानंतर त्याला घरपोच डीलीव्हरीद्वारेच सिलींडर पोहोचविणे बंधनकारक आहे. सद्यस्थितीत नवीन गॅस जोडणी हे काम बंद आहे. तसेच काही ग्राहकांची ई केवायसी बाकी आहे. ते काम ग्राहक ऑनलाईन करु शकतात. जिल्हाधिकारी पुढे म्हणाले की, सद्यस्थितीत प्रशासनाचा एक कर्मचारी गॅस एजन्सीवर नियंत्रणासाठी नियुक्त करण्यात आला आहे. त्यामुळे येत्या २४ तासात वितरण सुरळीत करावे, अन्यथा कायदेशीर कारवाई करावी लागेल असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी बजावले. गॅस एजन्सीधारकांनी सांगितले की, काही ठिकाणी डिलीव्हरी वाहनाला पोलीस बंदोबस्त असणे आवश्यक आहे. त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी पोलिसांना तातडीने निर्देशीत केले. गॅस सिलींडर ग्राहकापर्यंत नेणाऱ्या वाहनांना पोलीस पेट्रोलिंग देणे आवश्यक करावे,असे त्यांनी सांगितले.

## मराठवाड्यात वादळी पाऊस आणि गारपिटीची शक्यता; 'ऑरेंज अलर्ट' जारी

**छत्रपती संभाजीनगर, 30 मार्च |** मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागात पुढील दोन दिवस हवामानात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने वादळी पाऊस, विजांच्या कडकडाटासह गारपिटीचा अंदाज व्यक्त केला असून, नागरिकांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

अंदाजानुसार, या भागात वाऱ्यांचा वेग वाढून अचानक पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी गारपीटही होऊ शकते. त्यामुळे शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांनी आवश्यक खबरदारी घेणे गरजेचे आहे. उर्वरित राज्यात वातावरण ढगाळ राहून वादळी पावसाची शक्यता असल्याने 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

हवामान तज्ज्ञांच्या मते, सध्याच्या बदलामागे दक्षिण कर्नाटक भागात समुद्रसपाटीपासून सुमारे ५.८ किलोमीटर उंचीवर तयार झालेली चक्राकार वाऱ्यांची स्थिती कारणीभूत आहे. तसेच उत्तर ओडिशापासून दक्षिण तमिळनाडूपर्यंत वाऱ्यांच्या प्रवाहात खंड पडल्यामुळे कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाला आहे. यामुळे वातावरण अस्थिर झाले असून पावसासाठी पोषक स्थिती निर्माण झाली आहे.

दरम्यान, शहरातील तापमानातही चढ-उतार दिसून येत आहेत, ज्यामुळे वातावरण अधिक दमट आणि अस्थिर झाले आहे. हवामान खात्याच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना अनावश्यक बाहेर पडणे टाळावे, वादळी वाऱ्यांच्या वेळी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा असे आवाहन केले आहे.

# राज्यस्तरीय ऑल स्टाईल मार्शल आर्टस स्पर्धेत दोनशे विद्यार्थ्यांचा सहभाग



**तभा. वृत्तसेवा**

**बिडकीन दि ३० मार्च |** छत्रपती संभाजीनगर येथे दि २२ मार्च रोजी आयोजित झालेल्या भव्य राज्यस्तरीय ऑल स्टाईल मार्शल आर्टस स्पर्धेमध्ये २०० खेळाडूंचा सहभाग या स्पर्धेचे आयोजन मिशन मार्शल आर्ड्स अँड वूशू कुंग फु स्पोर्टस कराटे असोसिएशन इंडिया छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याने केले होते , या आयोजित भव्य राज्यस्तरीय मार्शल आर्टस स्पर्धेत विविध जिल्ह्यातून आलेल्या खेळाडूंनी सहभाग नोंदविला या स्पर्धेचे प्रथम पारितोषक २१०००/ रुपये

प्रविण घुगे यांच्या स्पोर्टस अकॅडमी जिंकले व द्वितीय पारितोषक -रु ११९५१ पैठण तालुका श्याम बुधवंत च्या टीमने जिंकले, तसेच तृतीय पारितोषक रु ७१५१ बिडकीन येथील कराटे प्रशिक्षिका राधा घुगे यांच्या टीमने जिंकले. कार्यक्रमाचे प्रायोजक - अशोक ढाकणे व सामाजिक कार्यकर्ते - विशाल करोडीवाल , मिशन मार्शल आर्ट संस्थेचे अध्यक्ष पवन घुगे. यानी खेळाडूंना प्रोत्साहन म्हणून, रोख बक्षीस ठेवले होते कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते पारितोषिक मेडल प्रमाणपत्र वितरण करण्यात आले डॉ. शैलेश करांडे (वरिष्ठ वनस्पती वीज पैदास कर युनायटेड जेनेटिक्स इंडिया प्रा.लि) डॉ. धनंजय घुगे (डायरेक्टर मराठवाडा कॅन्सर हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर डॉ. गणेश चव्हाण, विशाल करोडीवाल शिवाजी घुले , निलेश बनसोड. ह.भ.प अनिल महाराज कोळेकर, अशोक ढाकणे, स्वाती संचेती, मिशन मार्शल आर्ड्स संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पवन घुगे सचिव प्रविण घुगे. वरील मान्यवरांच्या हस्ते वितरण केले स्पर्धेचे पंच म्हणून काम पाहिले. व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला

## एलजीई इंडिया ने पंतप्रधान कार्यालयाच्या 'सेवा तीर्थ' इमारतीमध्ये प्रगत एचव्हीएसी सोल्यूशन्स कार्यान्वित

**तभा. वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर |** भारतातील सर्वात विश्वासार्ह इलेक्ट्रॉनिक्स ब्रॅंड्सपैकी एक असलेल्या एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया (एलजीई इंडिया) ने आज नुकत्याच उद्घाटन झालेल्या पंतप्रधान कार्यालय इमारत सेवा तीर्थ मध्ये आपले प्रगत एचव्हीएसी (हीटिंग, व्हेंटिलेशन आणि एअर कंडिशनिंग) सोल्यूशन्स यशस्वीरित्या कार्यान्वित केल्याची घोषणा केली. एलजीई इंडियाने १,५९० हॉर्सपॉवरची एकूण क्षमता असलेली आणि ११३ आउटडोअर युनिट्सचा समावेश असलेली व्हेरिएबल रेफ्रिजरंट फ्लो (व्हीआरएफ) एअर-कंडिशनिंग प्रणाली स्थापित केली आहे.

या प्रणालीचा पुरवठा एलजीई इंडियाच्या पुणे येथील उत्पादन केंद्रातून करण्यात आला आहे. यामुळे भारताच्या मेक इन इंडिया उपक्रमाला पाठिंबा देण्याची आणि आत्मनिर्भर भारताच्या दिशेने पुढील वाटचाल करण्याची कंपनीची वचनबद्धता अधिक दृढ झाली आहे. विशेषतः भारतीय परिस्थितीनुसार तयार करण्यात आलेली ही व्हीआरएफ प्रणाली अंतर्गत उत्पादन चाचणी मानकांनुसार ३९°C तापमानातही कार्यक्षमतेत कोणतीही घट न होता पूर्ण क्षमतेने चालण्यासाठी डिझाइन केलेली आहे, ज्यामुळे कडक उन्हाळ्याच्या महिन्यांतही सातत्यपूर्ण आणि प्रभावी कुलिंग मिळते. या प्रकल्पावर बोलताना, एलजीई मॅनेजिंग डायरेक्टर आणि चीफ सेल्स आणि मार्केटिंग ऑफिसर श्री. हॉंग जू जिओन म्हणाले, "आदरणीय पंतप्रधानांच्या सेवा तीर्थ या कार्यालयीन इमारतीसाठी योगदान देण्याची संधी मिळाल्याने एलजीई इंडिया सन्मानित झाली आहे.

### अग्रवाल जैन मंदिर सराफात भ.महावीर जन्मकल्यानक पत्रिकेचे विमोचन

# शहरातील सामाजिक उपक्रमाचा देशभर आदर्श ; राजेंद्र दर्डा



**तभा. वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर |** भ.. महावीर जन्म कल्याणक महोत्सवाच्या विविध सामाजिक उपक्रम पत्रिकेचे विमोचन सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्रजी दर्डा, प्रशांत देसरडा, विलास साहूजी, प्रतीक साहूजी, डी डी वायकोस तसेच समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शनिवारी झाले.

महोत्सवाचे ब्रीदवाक्य असलेल्या माझे शहर माझी जबाबदारी स्तुत्य उपक्रमाचाआदर्श सर्वत्र घेतलाजातो.

सामाजिक एकतेद्वारे कार्य सफल होते त्यामुळेच जन्मोत्सव कार्याचे देशभर सर्वत्र कौतुक होते असे दर्डा म्हणाले.

प्रारंभी नवकार महामंत्र पठण करण्यात आले.

मंदिराध्यक्ष मुकेश साहूजी, हर्षल साहूजी, रत्नशेखर साहूजी, नवदीप साहूजी, सागर साहूजी, अभय साहूजी, अजय साहूजी, निखिलेश साहुजी, आदित्य साहुजी आदींनी मान्यवरांचे स्वागत केले.

जन्म कल्यानकाच्या निमित्ताने जैन साइकिल राइडर्स ग्रुप द्वारा आयोजित साइकिल रैली साठी सानीया डीस्ट्रीबुटर तर्फे प्रायोजीत टी-शर्ट चे विमोचन करण्यात आले.

यावेळी समितीचे अजय सिंघवी बाहुबलीवायकोस, पंकज साखला, श्रेणिक कासलीवाल, हितेश कांकरिया यांच्या सह सकल जैन समाजाचे अनिल कुमार संचेती, विनोद बोकाडिया, दिगंबर क्षीरसागर, राजेश मुथा,कौशिक सुराणा, मदनलाल अच्छा, चांदमलजी सुराणा, नीलेश सावळकर, संजय संचेती, अमोल मोगले, जगदीश साहूजी, सुधीर साहूजी, संजय साहूजी, प्रशांत शहा, जैन साइकिल राइडर्स ग्रुप चे सचिन कासलीवाल, अमित कासलीवाल, पंकज अग्रवाल तसेच महीला समिती च्या

सारिका साहूजी, प्रीती साहूजी, संगीता संचेती ,सविता गोसावी, कविता अजमेरा, मनीषा भन्साळी, वैशाली धोंगडे, मंगला क्षीरसागर सह अनेक पदाधिकारी व भावीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**

आमचे पक्षकार **डॉ. संजय विनायक नाकाडे** रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी दिलेल्या माहिती व अधिकार पत्र यावरुन सर्व जनतेस जाहिर प्रगटणा व्दारे सूचित करण्यात येते की.
मौजे नारायण नगर हिंगोली ता. जि. हिंगोली येथील सर्वे नंबर ९८/३ मधिल प्लॉट क्रं. ०१ एकुण क्षेत्रफळ २७८.७० चौ.फु. असुन प्लॉट क्रं. १५७ ची चतुः सिमा पुर्वेस:- प्लॉट नं.२९ पश्चिमेस :- प्लॉट नं. १ चा भाग, उत्तरेस स.नं. ९७ व दक्षिणेस : १२ मि. रुंदीचा लेआऊट रोड अशी आहे. प्लॉट क्रं. १५८ ची चतुः सिमा पुर्वेस ९ मि. रुंदीचा लेआऊट रोड अशी आहे. ही संपत्ती आमचे पक्षकार हे मालक व ताबेदार असुन वरील प्लॉटची मुळ खरेदीखत हे मागील १० वर्षा पुर्वी गहाळ झालेले आहे. ज्याचा डेबुक क्रं.२५०३ दि.१७.०४.२००३ असा आहे.
तरी या जाहीर प्रगटणाव्दारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, वर नमुद प्लॉटचे मुळ खरेदीखत हे १० वर्षा पासुन गहाळ झालेले आहे.
करीता जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.
दि.३०/०३/२०२६

**तर्फे**
स्वाक्षरित/-
**ॲड. एन.एम. जोशी**

**जाहीर प्रगटण देणार**
स्वाक्षरित/-
**डॉ. संजय विनायक नाकाडे**

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ.संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. १९०/२०२६

अर्जदार:- १. सरस्वतीबाई मारुती शिंदे यम. ७० वर्ष धंदा. शेती २. संदिप मारोती शिंदे वय ३६ वर्ष धंदा. शेती १ व २ रा. मारुती मंदिर जवळ, पिंपळवाडी, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ३. लक्ष्मीबाई अनिल मोरे वय. ५१ वर्ष चंदा, शेती रा. पुरी, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ४. अनिता माणिक बोरुडे वय ४४ वर्ष धंदा. शेती रा. सावखेडा, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ५. मीराबाई मारुती शिंदे वयं. ४१ वर्ष धंदा. शेती रा. पिंपळवाडी, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ६. मंगल सुभाष सावंत वय. ४० वर्ष भंदा. शेती रा. सोलेगांव, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

-विरुद्धः-

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण:- कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की,

असे की, असे की, अर्जदार नं. १ यांचे पती तसेच अर्जदार नं. २ ते ६ यांची वडिल नामे मारोती विठ्ठल शिंदे हे दि. १३/०१/२०२६ रोजी मौजे पिंपळवाडी ता. गंगापूर जि.छ.संभाजीनगर येथे मयत झाले आहेत व अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयत मारोती विठ्ठल शिंदे यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही व अर्जदार हे मयत मारोती विठ्ठल शिंदे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी मयत मारोती विठ्ठल शिंदे याचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत मारोती विठ्ठल शिंदे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्दतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत मारोती विठ्ठल शिंदे यांचे वारस असल्याने वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्दती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

पु.दि.२९/०४/२०२६

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

# सोनपेठ तालुक्यात शेतीची पोटहिस्सा मोजणी प्रथम पाच गावांत योजना राबविण्यात येणार

**बाबासाहेब गर्जे**
**सोनपेठ ,/प्रतिनिधी:-** महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यभरात शेतकऱ्यांच्या शेतीचा पोटहिस्सा मोजणी पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत असून, याबाबतची मोहीम हाती घेण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सोनपेठ तालुक्यातील पाच गावांची प्राथमिक स्वरूपात निवड करण्यात आली आहे. या गावातील सर्व शेतकऱ्यांची त्यांच्या सहमतीने शेतीचा पोटहिस्सा मोजणी करण्याचे काम लवकरच सुरू होणार असल्याची माहिती सोनपेठ येथील भूमी अभिलेख कार्यालयाकडून देण्यात आली आहे. संपूर्ण राज्यभरात शासनाच्या वतीने शेतकऱ्यांच्या शेतीचा पोटहिस्सा मोजून पथदर्शक प्रकल्प राबविण्याचे ६ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर करण्यात आले आहे. त्याबाबतीत शासनाने आदेशही निर्गमित केला आहे. महाराष्ट्र राज्यात पथदर्शी प्रकल्प राबविणेसाठी एकूण १८ तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये परभणी जिल्ह्यातील एकमेव सोनपेठ तालुका निवडला गेला असून सुरुवातीला या तालुक्यातील पाच गावांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये आवलगांव, भिसेगांव, मोहळा, पोहंडुळ व कोरटेक या गावांचा समावेश करण्यात आला आहे. सदर कामी जनतेचा सक्रिय सहभाग मिळविण्यासाठी प्रसिद्धी व जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. गावातील सर्व शेतकरी व नागरिकांनी शासनाच्या सदर महत्वकांक्षी योजनेमध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यात सन १९९२ पासून माहे डिसेंबर २०२४ पर्यंत खरेदी हक्काने, वारसा वाटनीने, हक्क सोड पत्राने किंवा हस्तांतरण या कारणामुळे नव्याने सातबारा अधिकार अभिलेख तयार झालेल्या पोट विषयांची संख्या २,१२,७६,४९९ एवढी आहे. सातबारा अधिकार अभिलेखात तयार झालेले सर्व पोटहिशांची मोजणी होत नसल्यामुळे नकाशे व सातबारा अधिकार अभिलेख मिळत नाहीत. त्यामुळे विविध योजना राबविताना अडचणी निर्माण होतात. सदर शेतकऱ्यांच्या पोटहिशाची मोजणी करून नकाशा व अधिकार अभिलेख यांचे संलगणीकरण करून प्रत्येक भूभागास भू-आधार क्रमांक तयार होणार आहे. त्याद्वारे कृषी विषयक योजना तसेच शेतकऱ्यांना वित्त पुरवठा करण्यासंबंधी यजना व पीक सर्वेक्षण इत्यादी योजना यशस्वीरित्या कार्यन्वित करण्यासाठी, ग्रामीण भागातील शेत जमिनीच्या भूभागांचे खातानिहाय पोटहिस्सा मोजणी करून भूभागांची सीमा व क्षेत्र निश्चित करून त्याद्वारे अधिकार अभिलेखे नकाशे तंतोतंत मिळत ठेवणे आवश्यक आहे. या मोजणीचा पथदर्शी प्रकल्प जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या स्तरावरून सुरू करण्यात आला आहे.

प्रकल्पाची उद्दिष्टे
सर्व सर्वे नंबर, गट नंबर मध्ये तयार झालेल्या पोट हिस्याची मोजणी करणे, अधिकार अभिलेख सातबारा व नकाशा अद्यावत करून मेळात आणणे, प्रत्येक भूभागास भू-आधार क्रमांक देणे इत्यादी कामे केली जाणार आहेत.

प्रकल्पाचे फायदे
सातबारा नुसार धारक निहाय स्वतंत्र पोट हिस्सा/ भूभाग कोणतीही मोजणी फी न घेता नकाशे उपलब्ध केली जातील, धारकांचे क्षेत्र व हद्दीविषयी वाद कमी होण्यास मदत होईल, अधिकार अभिलेख सातबारा व त्यांचे नकाशे तंतोतंत मेळात ठेवणे शक्य होईल, भूभाग नकाशे व अधिकार अभिलेख यांचे संलगणीकरण करता येईल, शेतकरी, विविध बँका व पीक विमा कंपनी यांना नुकसान भरपाई निश्चित करण्यासाठी अद्यावत डाटाबेस उपलब्ध होईल, खरेदी पूर्व मोजणी प्रक्रियेची कार्यवाही करण्यासाठी अचूक डिजिटल डाटाबेस तयार होईल.

या प्रकारे शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून शासनाने सदरची मोहीम हाती घेतलेली आहे. सोनपेठ तालुक्यातील या मोहिमेमध्ये सर्व शेतकरी व नागरिकांनी सहकार्य करून योजना पूर्णत्वास नेण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख परभणीचे प्रताप चौधरी व उपाध्यक्ष भूमी अभिलेख सोनपेठ चे माणिक मुंडे यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### नारीला माणूस म्हणून स्वीकारा - डॉ. प्रयदर्शनी
### ज्ञानोपासक महाविद्यालयात 'नारीवाद और नारी विमर्श' विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र

**परभणी,/प्रतिनिधी :** नारी ही कधीच दुर्बल नव्हती, मात्र पुरुषप्रधान मानसिकतेमुळे तिला दुय्यम स्थान देण्यात आले आणि तिच्यावर अन्याय करण्यात आला. नारीला माणूस म्हणून स्वीकारा, असे आवाहन इंग्रजी व विदेशी भाषा विद्यापीठ, हैदराबाद येथील डॉ. प्रियदर्शनी यांनी केले.

येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात हिंदी विभागामार्फत एक दिवसीय 'नारीवाद और नारी विमर्श' राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन महाविद्यालयाच्या मुख्य सभागृहात यशस्वीपणे संपन्न झाले. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख मोहम्मद बाबर उपस्थित होते, तर उद्घाटकीय बीज भाषण इंग्रजी व विदेशी भाषा विद्यापीठ, हैदराबाद येथील डॉ. प्रियदर्शनी यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, नारी ही कधीच दुर्बल नव्हती, मात्र पुरुषप्रधान मानसिकतेमुळे तिला दुय्यम स्थान देण्यात आले आणि तिच्यावर अन्याय करण्यात आला. इतिहास व पौराणिक ग्रंथांमध्येही तिच्यावर झालेल्या शोषणाचे अनेक संदर्भ आढळतात, असे त्यांनी सांगितले.

हिंदी विभाग प्रमुख डॉ. सुजितसिंह परिहार यांनी या परिसंवादाचे प्रास्ताविक केले तर डॉ. उर्मिला पोरवाल डॉ. राजश्री मोरे, डॉ. अरुणा शुक्ला, डॉ. सविता कीर्ते आणि डॉ. पल्लवी पाटील यांनी विविध क्षेत्रात मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद आणि कर्मचारी यांनी विविध समित्यात काम करून सहकार्य केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. निर्मला जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. दिपाली अवचार यांनी केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने देशभरातून विविध संशोधक प्राध्यापक उपस्थित होते. या चर्चासत्रास हिंदी विभागातील डॉ.संतोष सोळंके, प्रा. आनंद लोखंडे, प्रा.चोरघडे सुर्यकांत, डॉ. दिपाली अवचार आदींनी परिश्रम घेतले.

### सासरवाडीत मिळालेल्या अवमानास्पद वागणुकीमुळे जावयाची आत्महत्या : दैठणा पोलिस ठाण्यात चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** सासरवाडी मिळालेल्या अवमानास्पद वागणूकीमुळे जावयाने आत्महत्या केल्याची घटना दैठणा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. दरम्यान, या प्रकरणात चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसमत तालुक्यातील हट्टा येथील संदीप डुकरे (वय २५ वर्ष) हे स्वतःच्या पत्नी व मुलीस सावरवाडीहून परत आणण्याकरीता परभणी तालुक्यातील सिंगणापूर या गावी म्हणजे सासरवाडीस दाखल झाले. त्यावेळी सासरच्या मंडळींनी मुलीस परत पाठविण्यास नकार तर दिलाच व धमक्याही दिल्या. त्याच ताण तणावातून डुकरे यांनी शुक्रवारी पहाटे सिंगणापूर येथील रेल्वे गेट परिसरात रेल्वे समोर उडी मारुन आत्महत्या केल्याची माहिती डुकरे कुटूंबियांनी दैठणा पोलिस ठाण्यात दाखल केलेल्या तक्रारीद्वारे दिली. त्या आधारे पोलिसांनी चौघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिस या प्रकरणात तपास करीत आहेत.

### अतिक्रमित रेल्वे जमिनीच्या पुनर्प्राप्तीतील दिरंगाईबद्दल डॉ. फौजिया या खान यांनी चिंता व्यक्त केली, उत्तरदायित्व आणि पारदर्शकतेची मागणी केली

**परभणी,/प्रतिनिधी-** अधिकृत आकडेवारीनुसार एकूण रेल्वे जमिनीपैकी केवळ ०.२२ टक्के जमीन अतिक्रमणाखाली असूनही, डॉ. फौजिया खान यांनी आज संसदेत अतिक्रमित रेल्वे जमिनीच्या पुनर्प्राप्तीच्या दिरंगाईबद्दल एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला. धोरणात्मक दावे आणि प्रत्यक्ष जमिनीवरील परिणाम यांच्यातील गंभीर तफावतीवर प्रकाश टाकत, डॉ. खान यांनी निदर्शनास आणून दिले की, गेल्या पाच वर्षांत केवळ ३३.६७ हेक्टर जमीन परत मिळवण्यात आली आहे. त्यांनी यावर जोर दिला की, ही दिरंगाई विशेषतः उच्च घनतेच्या शहरी भागांमध्ये चिंताजनक आहे, जिथे अतिक्रमणांमुळे प्रवासी सुरक्षा पायाभूत सुविधांमध्ये थेट अडथळा येतो आणि महत्त्वाच्या स्थानक पुनर्विकास प्रकल्पांना विलंब होतो.
डॉ. खान यांनी रेल्वे मंत्रालयाला, अशा महत्त्वाच्या क्षेत्रांमधील अतिक्रमित जमिनीच्या पुनर्प्राप्तीला प्राधान्य देण्यासाठी स्पष्ट आणि लक्ष्य-केंद्रित प्रशासकीय यंत्रणेच्या अभावाबद्दल प्रश्न उपस्थित केला. त्यांनी यावर जोर दिला की, धोरणात्मक प्राधान्याशिवाय, हा मुद्दा आधुनिकीकरणाच्या प्रयत्नांमध्ये एक कायमस्वरूपी अडथळा बनण्याचा धोका आहे.

### दिव्यांग बांधवांद्वारे आमदार डॉ. राहुल पाटील यांचा सत्कार
### दिव्यांग बांधवांनी व्यवसायासाठी जागेची मागणी करावी : आ. डॉ. राहुल पाटील

**परभणी,/प्रतिनिधी :** दिव्यांग बांधव ज्या भागात राहतात तेथील प्रशासकीय यंत्रणेकडे त्यांनी व्यवसायासाठी जागेची मागणी करावी, असे आवाहन आ. डॉ. राहुल पाटील यांनी केले. दिव्यांगांच्या प्रश्नावर नुकताच आ. डॉ. पाटील यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. याबद्दल दिव्यांग बांधवांच्या वतीने आ. डॉ. पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

२००६-२००७मध्ये तत्कालीन सरकारने दिव्यांग बांधवांना व्यवसायासाठी जागा देण्याचे आदेश काढले होते. या आदेशानुसार दिव्यांगांना ते राहत असलेल्या ठिकाणी दर्शनी भागात २०० फुटाची जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले होते. परंतू गेल्या १९ वर्षात मराठवाड्यातील कोणत्याही दिव्यांगांना व्यवसायासाठी जागा मिळाली नसल्याचे आ.डॉ.पाटील यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित करत शासनाच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. यावर मंत्री अतुल सावे यांनी मुंबईसह अन्य शहरात अशा प्रकारच्या जागा उपलब्ध करून दिल्याची माहिती दिली. परभणी जिल्ह्यात दिव्यांगांना जागा मिळाली नसल्यास त्याची चौकशी करून मागेल त्या दिव्यांगांना जागा देण्यात येईल असे आश्वासन दिले. या पार्श्वभुमीवर आ. पाटील म्हणाले की, दिव्यांग बांधवांनी व्यवसायासाठी दर्शनी भागात २०० स्क्वेअर फूट जागा पाहिजे असल्यास महापालिका, नगरपालिका, पंचायत समिती यांच्याकडे अर्ज करावेत.

यावेळी दिव्यांग बांधवांनी आ. पाटील यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले. आ. पाटील दिव्यांगांचे प्रश्न सातत्याने शासन दरबारी लावून धरत आहेत. आ. पाटील यांच्या पाठींब्यामुळे दिव्यांग बांधव सक्षम होत असल्याचे मत यावेळी दिव्यांग बांधवांनी व्यक्त केले. यावेळी रामराव डोंगरे, नवनीत पाचपोर, बंडू बीडकर, प्रकाश जाधव, विष्णू वैरागड, विलास राठोड, महेंद्र फुटाणे, गंगाधर गाडगे यांच्यासह दिव्यांग बांधव संजय वाघमारे, राहुल शिवभगत, शैलेश नवघडे, माऊली भरोसे, ज्ञानबा कदम, पाईकराव, गणेश शिंदे, ज्ञानोबा ढाले, अनिल पामे, सुरेश पाचपुंजे, गजानन दुधारे, ज्ञानदेव ढाले, एस. के. अहमद, गजानन गारूडे, नारायण धुमाळ, मदन निर्वळ, शेख फजल, खलील खान, सदाशिव पांचाळ, भगवान जल्हारे, दिलीप सौदागर, रमेश खंडागळे, सोनबा पाईकराव, सुमीत गोरे व शेकडो दिव्यांग बांधव उपस्थित होते.

## आजपासून ४ एप्रिल पर्यंत परभणी जिल्हयात मेघगर्जनेसह वादळी पाऊस बरसणार

**परभणी,/प्रतिनिधी-** आभाळी हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ३० मार्च रोजी प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. उर्वरित विदर्भात देखील काही प्रमाणात हवामानात बदल दिसून येऊ शकतो.
३० मार्चच्या तुलनेत ३१ मार्च रोजी एकंदरीत वादळी पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, या भागांमध्ये काही प्रमाणात अस्थिर हवामान आणि वादळी पाऊस पडू शकतो.
त्यानंतर १ ते ४ एप्रिल दरम्यान वादळी पावसाचे प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे या कालावधीत मध्य महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील ठिकठिकाणी आभाळी हवामान, दुपारनंतरचा वादळी पाऊस, आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने काढणी आहे.

## समाज माध्यमांमुळे महिलांची सुरक्षितता धोक्यात : डॉ. संगिता आवचार

**सेलू,/प्रतिनिधी:** समाज माध्यमांच्या वाढत्या वापरामुळे महिलांची सुरक्षितता तसेच समाज व्यवस्था धोक्यात येत असल्याचा गंभीर इशारा कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयाच्या इंग्रजी विभाग प्रमुख तथा प्रसिद्ध कवयित्री, साहित्यिक डॉ. संगिता आवचार यांनी दि. २७ मार्च रोजी सेलू येथे दिला.

नूतन विद्यालय शिक्षण संस्था, सेलू व महिला मंडळ, सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने कै. श्रीरामजी भांगडीया शतकोत्तर रजतजयंती निमित्त आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या.



''समाज माध्यमांमुळे महिलांची सुरक्षितता आणि समाज व्यवस्था धोक्यात'' या विषयावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. समाज माध्यमांचा अतिरेकी व अयोग्य वापर महिलांसाठी अनेक धोके निर्माण करीत असून, यासाठी सजगता आणि जबाबदारीची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नूतन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सत्यनारायण लोया होते. व्यासपीठावर प्राचार्य विनायकराव कोठेकर, महिला मंडळाच्या अध्यक्षा विजया कोठेकर, सचिव ललीता गिल्डा, नूतन कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका निशा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य विनायकराव कोठेकर यांनी केले.

महिला मंडळाच्या वतीने ललीता गिल्डा यांनी मनोगत व्यक्त करत कार्यक्रमाच्या उद्देशावर प्रकाश टाकला. सूत्रसंचालन हेमलता देशमुख यांनी केले, तर आभार निशा पाटील यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थिनी, महिला व नागरिकांची उपस्थिती लक्षणीय होती.

## गोवंश कत्तलीवर कारवाईदरम्यान पोलिसांवर दगडफेक; २५ जणांवर गुन्हा, ५ जण ताब्यात

**सेलू,/प्रतिनिधी :** शहरातील रहेमाननगर भागात गोवंश कत्तलीसंदर्भात कारवाई करण्यासाठी गेलेल्या पोलिस पथकावर जमावाने दगडफेक करत शासकीय कामात अडथळा आणल्याची गंभीर घटना रविवारी (ता. २९) सकाळी घडली. या प्रकरणी २५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून ५ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.
पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रहेमाननगर येथील नाल्यावरील पत्र्याच्या शेडमध्ये गोवंश कत्तली होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलिस पथकाने घटनास्थळी धाड टाकली. मात्र, कारवाई सुरू असतानाच काही जणांनी एकत्र येत पोलिसांवर दगडफेक केली व शासकीय कामात अडथळा निर्माण केला.
दरम्यान, घटनास्थळावरून सुमारे १०० किलो गोवंश जातीचे मांस, कातडी, मुंडके तसेच कत्तलीसाठी वापरण्यात येणारे सूर्या, कुऱ्हाडी, वजन काटे आदी साहित्य जप्त करण्यात येत असताना जमावाने ते पळवून नेऊन पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.
या प्रकरणी सहायक पोलिस उपनिरीक्षक कृष्णा घायवट यांच्या फिर्यादीवरून रजाक कुरेशी, मालजी कुरेशी, तला कुरेशी, मोबीन कुरेशी, जावेद कुरेशी, सादिक कुरेशी (रा. एकबाल नगर) तसेच इतर १५ ते २० अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
पोलिस निरीक्षक दीपक बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक शाकीर शेख पुढील तपास करीत आहेत.
पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न
शहरातील रहेमाननगर भागात गोवंश कत्तलीच्या संशयावरून पोलिसांनी धाड टाकली असता कारवाईदरम्यान पोलिस पथकावर जमावाकडून दगडफेक करण्यात आली. या प्रकरणी २५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून ५ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. घटनास्थळावरून सुमारे १०० किलो मांस व कत्तलीसाठी लागणारे साहित्य जप्त करण्याचा प्रयत्न सुरू असताना जमावाने ते पळवून नेऊन पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

## जिंतूर येथे 'महाराजस्व समाधान शिबिरास' प्रतिसाद

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तहसील कार्यालय जिंतूर यांच्या वतीने 'श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' टप्पा क्र. १ अंतर्गत दुधगांव जिल्हा परिषद शाळेत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.
सेलूच उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी व जिंतूरच्या तहसीलदार सौ. शितल कचवे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. शिबिरादरम्यान नागरिकांना उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, ग्री स्टॅक कार्ड, पीएम किसान योजना, नवीन अकृषिक धोरण, सातबारा दुरुस्ती, फेरफार, जमीन मोजणी अर्ज आदी विविध शासकीय सेवांबाबत माहिती देण्यात आली. तसेच उपस्थित लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.
कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, तहसीलदार सौ. शितल कचवे, बोरी पोलीस निरीक्षक थोरवे, नायब तहसीलदार गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक अशोकराव दुधगावकर, सरपंच श्रीमती भवालताई व पंचायत समिती सदस्य बाळासाहेब साखरे यांनीही सहभाग नोंदविला. शबिराच्या यशस्वी आयोजनासाठी दुधगाव मंडळातील तलाठी रोहन पवार, रुपेश वावळे, सौ. शिल्पा घाटूल, सौ. प्रज्ञा गायकवाड, कुमारी ऋतुजा भालेराव यांनी नियोजन केले. तसेच तहसील कार्यालयातील कर्मचारी अमोल होळंबे, महसूल मंडळ अधिकारी विठ्ठल बडगुजर व जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक शहाणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## महामानव, विश्वरत्न,डॉ.आंबेडकर जयंती उत्सव, जिंतूरमध्ये भीमगीतांचा बहारदार कार्यक्रम होणार

**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर ,/प्रतिनिधी:** जिंतूरमध्ये भीमगीतांचा बहारदार कार्यक्रम होणार जिंतूर प्रतिनिधी :- डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जिंतूर येथे विविध भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, सामाजिक ऐक्य आणि प्रबोधनाचा संदेश देणारा हा उत्सव यंदा सातव्या वर्षी अधिक उत्साहात साजरा केला जाणार आहे.

फुले, शाहू, आंबेडकर विचार मंच, जिंतूर तसेच गोर बंजारा समाज बांधव यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक संविधान मनवरे यांचा भीमगीतांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम विशेष आकर्षण ठरणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी शैलेशजी लाहोटी हे राहणार असून, उद्घाटन गट विकास अधिकारी सुभाषजी मानकर यांच्या हस्ते होणार आहे. स्वागताध्यक्ष म्हणून लक्ष्मणराव (दादा) बुधवंत यांच्यासह प्रशांत राखे नायब तहसीलदार, रमेश दरगड, शिवाजी लाटे, भगवानदादा वटाणे आणि ॲड. सुनील बुधवंत यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची विशेष उपस्थिती लाभणार असून, त्यामध्ये ॲड. विनोद राठोड, संजय श्रीरंग राठोड, दिलीप चव्हाण, डॉ. ज्ञानेश्वर राठोड, गुनिरत्न वाकोडे, राजेभाऊ घुगे, बालाजी सांगळे, नारायण राठोड, संजय भवाळे, अंबादास वाटोडे, देविदास राठोड आणि अविनाश काळे आदींचा समावेश आहे. कार्यक्रमादरम्यान समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कारही करण्यात येणार आहे. यामध्ये ॲड. मनोज सारडा, शेख शकील अहमद (बबलू भैया) आणि श्रीमती नंदाताई डाके यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार पठाण शहेजाद खान करणार आहेत. या भव्य कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते शरद सुदामराव चव्हाण आणि संजय रामराव आडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे. त्यांनी सर्व नागरिकांना मोठ्या



संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, १४ एप्रिल २०२६ रोजी धम्म वंदना आणि भव्य मिरवणूक देखील आयोजित करण्यात आली असून, जयंती उत्सवाच्या निमित्ताने सामाजिक एकात्मता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांचा संदेश देण्याचा प्रयत्न आयोजकांकडून केला जात आहे.

एकूणच, जिंतूरमध्ये होणारा हा जयंती उत्सव केवळ उत्सव न राहता सामाजिक जागृती आणि प्रेरणेचा एक महत्त्वपूर्ण सोहळा ठरणार आहे.



## अग्रलेख...

# ऊर्जेतही हवी आत्मनिर्भरता

'ऊर्जा' हा शब्द केवळ वीज, पेट्रोल, गॅस किंवा कोळसा यापुरताच मर्यादित नाही; तो राष्ट्राच्या प्रगतीचा, स्वाभिमानाचा आणि सार्वभौमत्वाचा प्राणवायू आहे. जशी मानवी शरीरासाठी रक्ताभिसरण व्यवस्था अत्यावश्यक असते, तशीच अर्थव्यवस्थेसाठी ऊर्जा ही जीवनदायी रक्तवाहिनी आहे. या रक्तवाहिनीत बाह्य अवलंबित्वाचा अडथळा निर्माण झाला, तर राष्ट्राच्या प्रगतीचा प्रवाह कुंठित होतो. म्हणूनच भारतासारख्या विकसनशील आणि वेगाने उभारी घेत असलेल्या देशाने ऊर्जा सुरक्षेत आत्मनिर्भरतेचा दीप प्रज्वलित करणे काळाची गरज बनली आहे. मध्यपूर्वेत निर्माण झालेल्या संकटामुळे ही गरज अधिकच तीव्रतेने अधोरेखित झाली आहे. यापूर्वी अमेरिका-इराक युद्धामुळे काही प्रमाणात ऊर्जा संकट निर्माण झाले होते. भारताची ऊर्जा गरज दिवसेंदिवस वाढत आहे. औद्योगिकीकरणाच्या चाकांना गती देण्यासाठी, शहरीकरणाच्या लाटेला आधार देण्यासाठी आणि डिजिटल क्रांतीच्या मशालीला तेज देण्यासाठी प्रचंड प्रमाणात ऊर्जा आवश्यक आहे. परंतु, या ऊर्जेच्या गरजांसाठी भारत मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे. कच्चे तेल, नैसर्गिक वायू यासारख्या संसाधनांसाठी विदेशी बाजारपेठेकडे हात पसरण्याची वेळ येते. हे परावलंबित्व म्हणजे जणू एखाद्या बलाढ्य योद्ध्याच्या पायात बांधलेली बेडीच आहे. त्यामुळे आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वीकारणे अपरिहार्य ठरते.

ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न केवळ आर्थिक नसून तो राष्ट्रीय सुरक्षेशी निगडित आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या पटावर तेलाच्या किमतीचे चढ-उतार वादळी समुद्रातील लाटांसारखे असतात. या लाटांवर अवलंबून राहणारा देश कधीही अस्थिरतेच्या भोवऱ्यात अडकू शकतो. मध्यपूर्वेतील तणाव किंवा जागतिक संघर्षाचा थेट परिणाम भारताच्या ऊर्जा पुरवठ्यावर होतो आहे. अशा परिस्थितीत आत्मनिर्भरता म्हणजे वादळातही स्थिर राहणारा दीपस्तंभ असतो. आत्मनिर्भरतेचा मार्ग म्हणजे केवळ स्वदेशी उत्पादन वाढवणे नाही, तर ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण होय. भारताने सौर, पवन, जल आणि जैवऊर्जा यासारख्या नूतनीकरणक्षम स्रोतांकडे झेप घेतली आहे. सूर्य हा भारतासाठी जणू अखंड ऊर्जा देणारा सुवर्णकुंभ आहे. 'सौरऊर्जा' ही त्या कुंभातून ओतली जाणारी अमृतधारा आहे. राजस्थानच्या वाळवंटात उभारलेले सौरऊर्जा प्रकल्प, तामिळनाडूच्या किनाऱ्यावर फिरणाऱ्या पवनचक्क्या हे सारे आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेले भक्कम पाऊल आहे. पण आता अधिक वेगाने पुढे गेले पाहिजे. मध्यपूर्वेतील संकटामुळे देशात गॅस सिलेंडरची मागणी अचानक वाढली. भीतिपोटी लोक सिलेंडरचा साठा मोठ्या प्रमाणात घरांमध्ये करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या साठेबाजीवर अंकुश ठेवण्यासाठी पाईप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) आवश्यक आहे. पीएनजी ही नैसर्गिक वायू थेट घरांपर्यंत आणि उद्योगांपर्यंत सुरक्षित पाईपलाईनद्वारे पोहोचवण्याची प्रणाली होय. या प्रक्रियेत प्रथम जमिनीखालून किंवा समुद्रातून काढलेला नैसर्गिक वायू प्रक्रिया केंद्रात शुद्ध केला जातो. त्यानंतर उच्च दाबाने तो मुख्य पाईपलाईन नेटवर्कमध्ये पाठवला जातो. शहरांमध्ये 'सिटी गॅस डिस्ट्रिब्युशन' (सीजीडी) नेटवर्कद्वारे हा वायू कमी दाबात रूपांतरित करून घरगुती स्वयंपाक, उद्योग आणि वाहनांसाठी (सीएनजी) वापरला जातो. मीटरिंग प्रणालीमुळे वापरानुसार बिल आकारले जाते. त्यामुळे ही यंत्रणा सुरक्षित, स्वच्छ आणि कार्यक्षम मानली जाते. देशात पीएनजी यंत्रणा झपाट्याने विस्तारत असली, तरी त्यात आपण अद्याप पूर्ण आत्मनिर्भर झालेलो नाही. कारण, देशातील नैसर्गिक वायू उत्पादन मर्यादित आहे आणि मोठ्या प्रमाणावर 'लिक्विफाईड नॅचरल गॅस'(एलएनजी) आयात करावा लागतो. त्यामुळे पुरवठा साखळी अजून परावलंबी आहे. तथापि, सरकारकडून सीजीडी नेटवर्क विस्तार, गॅस पायाभूत सुविधा आणि स्थानिक उत्पादन वाढवण्यावर भर दिला जात आहे.

पेट्रोल-डिझेलला पर्याय म्हणून भारतात अनेक स्वदेशी इंधनाचे पर्याय वेगाने पुढे येत आहेत. यामध्ये प्रामुख्याने इथेनॉल, बायोडिझेल, सीएनजी, इलेक्ट्रिक वाहने आणि हरित हायड्रोजनचा समावेश आहे. इथेनॉल हे ऊस, मका यासारख्या कृषी उत्पादनांपासून तयार होणारे जैवइंधन आहे. भारतात २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे धोरण राबवले जात असून, हे जणू शेतातून थेट इंजिनपर्यंत पोहोचणारे इंधन आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्न आणि देशाला आयात कमी करण्याचा दुहेरी फायदा होतो. बायोडिझेल हे वनस्पती तेल किंवा वापरलेल्या तेलापासून तयार होते, ते डिझेलचा पर्याय ठरू शकते. सीएनजी आणि बायोगॅस हे स्वच्छ इंधन पर्याय आहेत. शेण, कृषी अवशेषांपासून तयार होणारा बायोगॅस म्हणजे ग्रामीण भारतासाठी ऊर्जा स्वावलंबनाचा दीप आहे. दुसरीकडे इलेक्ट्रिक वाहने ही इंधनमुक्त क्रांती घडवत आहेत. जर वीजनिर्मिती नूतनीकरणक्षम स्रोतांपासून झाली, तर इलेक्ट्रिक वाहने पूर्णपणे स्वदेशी आणि पर्यावरणपूरक ठरतात. हरित हायड्रोजन हा भविष्यातील सर्वांत महत्त्वाचा पर्याय मानला जातो. पाण्याचे विघटन करून तयार होणारे हे इंधन प्रदूषणमुक्त असून, भारत 'ग्रीन हायड्रोजन मिशन'द्वारे यात आघाडी घेण्याचा प्रयत्न करीत आहे. तथापि, आत्मनिर्भरतेचा वेग पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि गुंतवणुकीवर अवलंबून आहे. इलेक्ट्रिक वाहने चार्जिंग नेटवर्क, गॅस पाईपलाईन, हायड्रोजन साठवणूक यासारखी आव्हाने आपल्यासमोर असली, तरी त्यातून मार्ग काढणे आवश्यक आहे.

ऊर्जा क्षेत्रातील आत्मनिर्भरता अशक्य नसली, तरी हा मार्ग निश्चितपणे सोपा नाही. यामध्ये गुंतवणूक, संशोधन, पायाभूत सुविधा आणि धोरणात्मक नियोजनाची आवश्यकता आहे. ग्रामीण भागात ऊर्जा पोहोचवणे, सौर प्रकल्पांसाठी जमीन उपलब्ध करणे आणि यासाठी असलेली भारताची इच्छाशक्ती म्हणजे पर्वतांवर चढणाऱ्या जिद्दी गिर्यारोहकांप्रमाणे आहे. ऊर्जा कार्यक्षमतेलाही तितकेच महत्त्व आहे. 'ऊर्जा बचत म्हणजे ऊर्जा निर्मिती' हे सूत्र आत्मसात करण्याची गरज आपल्याला आहे. एलईडी दिवे, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे आणि जनजागृती मोहिमा याद्वारे ऊर्जा वापर कमी करणे शक्य आहे. हे जणू लहान-लहान थेंब साठवून मोठा सागर निर्माण करण्यासारखे आहे. शेवटी ऊर्जा आत्मनिर्भरता म्हणजे केवळ आर्थिक स्वातंत्र्य नव्हे, तर राष्ट्राच्या आत्मसन्मानाचा प्रश्न आहे. जसे स्वातंत्र्य संग्रामात भारताने परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी संघर्ष केला, त्याचप्रमाणे आज ऊर्जा क्षेत्रात परावलंबित्वाच्या जोखडातून मुक्त होणे आवश्यक आहे. हा संघर्ष तलवारीचा नाही, तर तंत्रज्ञान, धोरण आणि जनसहभागाचा आहे. भारताने जर ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भरतेचा दीप प्रज्वलित केला, तर तो केवळ आपल्या देशालाच उजळवणार नाही, तर संपूर्ण जगासाठी मार्गदर्शक ठरेल. कारण, भारत हा केवळ एक देश नाही, तो संधीचा महासागर आहे. त्या महासागराला ऊर्जा आत्मनिर्भतेची लाट मिळाली, तर तो विकासाच्या किनाऱ्यावर अभूतपूर्व यशाची मोहर उमटवेल. ऊर्जा क्षेत्रातील आत्मनिर्भरता म्हणजे देशाच्या ऊर्जा गरजा देशांतर्गत स्रोतांद्वारे पूर्ण करण्याची क्षमता होय. ही आत्मनिर्भरता अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरते. भारताच्या वाढत्या अर्थव्यवस्थेसाठी ऊर्जा ही विकासाचा कणा मानली जाते. त्यामुळे ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबन प्राप्त झाल्यास त्याचे अनेक सकारात्मक परिणाम दिसून येतात. त्यामधील पहिला म्हणजे आयातीवरील अवलंबित्व कमी होते. भारत मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू आयात करतो. ऊर्जा आत्मनिर्भरतेमुळे विदेशी चलनाची बचत होते. त्यामुळे व्यापार तुटीवर नियंत्रण मिळते परिणामी देशाची आर्थिक स्थिरता मजबूत होते. ऊर्जा किमतीमध्ये स्थिरता येते. जागतिक बाजारातील किंमत चढ-उतारांचा देशांतर्गत अर्थव्यवस्थेवर कमी परिणाम होतो. यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि स्पर्धात्मकता वाढते. ऊर्जा सुरक्षेत आत्मनिर्भरता म्हणजे भारताच्या भवितव्याचा पाया आहे. हा पाया जितका मजबूत असेल, तितकी प्रगतीची इमारत उंच आणि भक्कम उभी राहील. म्हणूनच, आजची गरज आहे ती ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबन, स्वाभिमान आणि सतत प्रगतीच्या संकल्पाची!

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# केवळ ४६० किलोंसाठी!

४६० किलो शुद्ध युरेनियम इराणजवळ असलेले हे युरेनियम ताब्यात घेण्यासाठी अमेरिका व इस्रायल यांनी इराणवर हल्ला चढविला असे आता सांगितले जाऊ लागले आहे. ट्रम्प मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रथमच इराणजवळ असलेल्या ४६० किलो युरेनियमची माहिती देण्यात आली. या युरेनियमचा वापर करून ११ अणुबॉम्ब तयार करता आले असते असेही या बैठकीत सांगण्यात आले. इराणजवळ आण्विक शस्त्रक्षमता असता कामा नये अशी अमेरिका व इस्रायलची भूमिका राहत आली आहे. इराणचे आण्विक संयंत्र २०२५ च्या जून महिन्यातच उद्ध्वस्त करण्यात आले होते. या संयंत्राचे जे काही अवशेष बाकी होते, ते हल्ल्याच्या पहिल्या दिवशी म्हणजे २८ फेब्रुवारीला संपविण्यात आले. मात्र, इराणजवळ असलेले ४६० किलो युरेनियम अद्याप अमेरिका व इस्रायलला ताब्यात घेता आलेले नाही. त्यासाठी ३२ दिवसांपासून सुरू असलेल्या युद्धात काही लाख टन गोळा बारुद वापरण्यात आला आहे. एकीकडे अमेरिका व इस्रायल आणि दुसरीकडे इराण, हिजबुल्ला यांनी काही लाख टन दारूगोळा एकमेकांवर डागला आहे. मात्र अद्याप तरी हे युरेनियम कुठे आहे याचा शोध अमेरिका व इस्रायलला घेता आलेला नाही.

**इराणचा अणुबॉम्ब :** इराणजवळ असलेले हे ४६० किलो युरेनियम ६० टक्के शुद्धतेचे असल्याचे मानले जाते. अणु ऊर्जा तयार करण्यासाठी ३ ते ५ टक्के शुद्ध युरेनियम वापरले जाते तर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी वापरले जाणारे युरेनियम किमान ९० टक्के शुद्धतेचे असावे लागते. इराणने हा टप्पा अद्याप गाठला नसल्याने तो अणुबॉम्ब तयार करण्याच्या स्थितीत पूर्वीही नव्हता व आजही नाही.

**ओबामा करार :** इराणच्या आण्विक कार्यक्रमाला २०१६ मध्ये तत्कालीन अमेरिकन राष्ट्रपती बराक ओबामा यांनी कायदेशीर लगाम घातला होता. इराण एका विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक युरेनियम शुद्ध करणार नाही अशा करारावर इराणने सही केली होती. आंतरराष्ट्रीय आण्विक संस्थेकडून इराणच्या आण्विक संयंत्राचे वेळोवेळी परीक्षण-निरीक्षण केले जाण्याची तरतूद त्यात करण्यात आली होती. त्यालाही इराणने मान्यता दिली होती. विशेष म्हणजे या करारावर चीन व रशिया यांनीही सह्या केल्या होत्या. २०१६ च्या कराराचा परिणाम म्हणजे इराण, युरेनियम शुद्धतेचा ६० ते ९० टक्के हा निर्णायक टप्पा गाठू शकत नव्हता. मग, इराणजवळ असलेले ४६० किलो युरेनियम ताब्यात घेण्यासाठी अमेरिका व इस्रायल यांना एवढा अट्टहास करण्याची काय गरज होती? या दोन देशांनी केवळ मध्यपूर्वेला नाही साऱ्या जगाला जणू अंधारयुगाकडे लोटले आहे. विशेष म्हणजे इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू इराणविरुद्ध युद्ध सुरू करतील असा अंदाज माजी राष्ट्रपती बिल क्लिंटन यांनी ८ महिन्यांपूर्वी वर्तविला होता.

**युरेनियमचा काळाबाजार :** अमेरिका व इस्रायल यांनी हे युरेनियम ताब्यात घेतले तरी त्यामुळे काही इराणचा आण्विक कार्यक्रम संपणार नाही. आंतरराष्ट्रीय काळ्याबाजारात अशुद्ध युरेनियम उपलब्ध आहे. याशिवाय चीन-रशिया हे दोन देश इराणला सर्व प्रकारची मदत करण्यास सज्ज बसले आहेत. उत्तर कोरियाने अणुबॉम्ब तयार केला आहे, तो केवळ चीनच्या मदतीने. उद्या चीन इराणला युरेनियमचा पुरवठा करील. त्याचा उपयोग करीत इराण अणुबॉम्ब तयार करील.

**पुन्हा एकदा चीन :** भारत-पाकिस्तान संघर्षात पाकिस्तानने वापरलेली बहुतेक क्षेपणास्त्रे चिनी बनावटीची होती. आज इराण वापरत असलेली सारी प्रक्षेपणास्त्रे चिनी बनावटीची आहेत. इराण ज्या अचूकपणे लांब पल्ला असलेली प्रक्षेपणास्त्रे वापरीत आहे, ती त्याने स्वत: विकसित केलेली नाहीत. त्याला ती चीनकडून मिळालेली आहेत आणि एवढी साधी बाब अमेरिकेला समजू नये? काही आंतरराष्ट्रीय माध्यमांच्या मते राष्ट्रपती ट्रम्प आता आपल्या सल्लागारांचेही ऐकेनासे झाले आहेत.

**संयुक्त वायुसाठा :** खार्गे द्वीप हे इराण व कतार यांच्या मालकीचे संयुक्त वायुक्षेत्र असून तेथे जगातील सर्वांत मोठा वायुसाठा असल्याचे म्हटले जाते. यावर अमेरिकेने हल्ला चढविल्यानंतर इराणने कतारच्या वायुसंयंत्रावर हल्ला चढविला. यात कतारचे झालेले नुकसान अभूतपूर्व असल्याचे सांगितले जाते. हे संयंत्र दुरुस्त करण्यासाठी किमान एक वर्ष लागेल तर त्याचे उत्पादन पूर्ववत होण्यासाठी ३ ते ५ वर्ष लागतील असे सांगितले जात आहे.

**२० वर्ष माघारले :** मध्यपूर्वेतील देशांनी मागील काही दशकात मोठी आर्थिक प्रगती केली होती. हे सारे देश आता किमान २० वर्षांनी माघारले असल्याचे सांगितले जात आहे. दुसऱ्या शब्दात एक दिवस युद्ध सुरू राहणे याचा अर्थ मध्यपूर्वेतील देश एका वर्षाने माघारणे असा काढला जातो. मध्यपूर्वेतील जागांच्या किमती घसरल्या आहेत. आजवर हा भाग सुरक्षित व समृद्ध मानला जात होता. जगातील अनेक धनाढ्य मंडळींनी दुबईत मोठमोठ्या जागा खरेदी केल्या होत्या. त्या साऱ्यावर आता कुलूप लागण्याची वेळ आली आहे. मात्र, आता हा मुद्दा केवळ खाडी देशांपुरता मर्यादित न राहता तो जागतिक झाला आहे आणि याचा दुहेरी फटका भारतालाही बसणार आहे. एकीकडे ऊर्जा संकट आणि दुसरीकडे खाडी देशांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या एक कोटी भारतीयांवर येऊ शकणारे संकट, अशी दुधारी तलवार भारतावर राहणार आहे.

**कोविडनंतर :** २०२० मध्ये कोरोना विषाणूचा धुमाकूळ सुरू झाल्यानंतर साऱ्या जगात आर्थिक प्रगतीचा वेग मंदावला होता. भारतही त्याला अपवाद नव्हता. मात्र आता भारताची अर्थव्यवस्था कोविडच्या धक्क्यातून सावरू लागली होती. आर्थिक प्रगतीचा वेग वाढू लागला होता. त्याचे प्रतिबिंब २८ फेब्रुवारी रोजी देशाच्या संसदेत- लोकसभेत सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात दिसत होते. मात्र हा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर काही तासांच्या आत अमेरिका-इस्रायल यांनी इराणवर हल्ला चढविला आणि त्याच दिवशी या अर्थसंकल्पाला एक प्रकारचे ग्रहण लागले.

**रुपयाची घसरण :** युद्ध सुरू झाल्यापासूनच्या ३० दिवसांत डॉलर तीन रुपयांनी महाग झाला आहे. म्हणजे रुपया कमजोर झाला आहे. याचा आर्थिक बोजा अर्थव्यवस्थेवर पडणार आहे. या साऱ्या घटनाक्रमामुळे अर्थमंत्र्यांच्या चेहऱ्यावर चिंतेच्या रेषा उमटणार आहेत. कारण, एकीकडे महागाईचा भडका अणि दुसरीकडे डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरगुंडी या दोन संकटांनी भारताला ग्रासले आहे. एकीकडे खाडी संकट आणि दुसरीकडे महागाईची खाई अशा खिंडीत भारताची अर्थव्यवस्था सापडणार आहे.

**जागतिक नुकसान :** दुसरीकडे इराणजवळ गमावण्यासारखे काहीच नाही. याउलट अमेरिकेजवळ गमावण्यासारखे खूप काही आहे. आर्थिक सुबत्ता, आखाती देशांमधून मिळणारा पैसा, त्यातून अमेरिकन कंपन्यांची होणारी भरभराट या साऱ्या बाबींबर आता युद्धाचे ढग जमा झाले आहेत. इराणची संहारक क्षमता एवढी विध्वंसक असेल याचा अंदाज अमेरिकन प्रशासनाला करता आला नाही. मात्र प्रत्यक्षात याचा प्रत्यय आल्यानंतर राष्ट्रपती ट्रम्प यांनी इराणसोबत शांतता-सहकार्याची चर्चा सुरू केली आहे.

**अस्थिर नेता :** एका व्यक्तीची अस्थिर मानसिकता साऱ्या जगाला किती व कशी अस्थिर करू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प. आज ते जे बोलतात, २४ तासांत त्यांची भूमिका बदललेली असते. उपराष्ट्रपती व्हान्स, परराष्ट्रमंत्री मार्क रुबियो आणि संरक्षणमंत्री हे तिघेही आतून हादरलेले असल्याचे म्हटले जाते. कारण, ट्रम्प केव्हा काय करतील यावर त्यांचाही भरवसा नाही. स्वाभविकच इराण त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवण्यास तयार नाही. ट्रम्प यांनी खरोखरीच इराणच्या ऊर्जा केंद्रांवर हल्ले केल्यास, त्याची प्रतिक्रिया मध्यपूर्वेत उमटेल. आणि याची प्रतिक्रिया म्हणजे भारतात ऊर्जा संकट तयार होईल.

अमेरिकेने इराणमधील वीज केंद्रे उद्ध्वस्त केल्यास, अंधारयुग केवळ या एका देशात येणार नाही तर साऱ्या जगावर त्याचे सावट पडलेले असेल.

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# 'तिच्या' हाती सत्तेची दोरी!

आपल्याकडे फार पूर्वीपासून म्हटले जाते, 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी'. घरातील माता काय करू शकते, हे काही वेगळ्याने सांगायलाच नको. घराला आकार देणारी, मुलांना घडवणारी, घरात आणि बाहेरचे जग यात समतोल साधणारी अशी ही घरातील आई असते. ती खऱ्या अर्थाने घरातील व्यवस्थेचा कणा असते. मुळात, स्त्री ही कौटुंबिकच नव्हे तर सामाजिक व्यवस्थेच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा किंबहुना अविभाज्य घटक आहे. म्हणून जसजसा काळ बदलला तसा स्त्रीच्या घरातील आणि समाजातील अस्तित्वाचा विचार वेगळ्या पद्धतीने व्हायला लागला. जाहिरात क्षेत्रातील तज्ज्ञांना तुम्ही विचारले तर त्यांचे कामही स्त्रीच्या भोवतीच असल्याचे दिसेल. कारण कंपन्यांच्या दृष्टीने टार्गेट कस्टमर महत्त्वाचा असतो. म्हणून त्यांच्यासाठी देखील स्त्री महत्त्वाची ठरली.

यातून नंतर महिला आरक्षण हा विषय आला. त्याच्या बाता मारून अनेक पक्ष, नेते मोठे झाले, हा इतिहास आहे. 'महिला सक्षमीकरण' हा विषय तर आजही नेत्यांसाठी परवलीचा शब्दप्रयोग आहे. मागील काही वर्षांत तर घरातील स्त्रीचा स्वाभिमान आणि तिचे आर्थिक परावलंबित्व हा विषय ऐरणीवर आला. त्याला 'एनकॅश' करण्याची कल्पना राजकीय नेत्यांच्या डोक्यात आली आणि तिथून सुरू झाल्या महिलाविषयक विविध योजना. या योजनांनी अशी काही जादूची कांडी फिरवली की राज्यांमधील सत्ता पालटल्या. अनेक दशकांपासून राज्य करत असलेले राजकीय पक्ष अशा एका योजनेच्या घोषणेने अक्षरश: सत्तेबाहेर फेकले गेले. एखादा 'ट्रेंड' जेव्हा सुरू होतो तेव्हा त्याची यशस्विता पाहून तोच कित्ता गिरवला जातो. नेमका हाच प्रकार महिलांविषयीच्या योजनांबाबत घडला. आता जो उठतो तो महिलांसाठी योजना जाहीर करतो आणि महिला मतदारांना आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न करतो.

आता पाच राज्यातील निवडणुकीतही तेच चित्र दिसत आहे. पुढील महिन्यात ५ राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. यापैकी चार राज्ये अशी आहेत, ज्यांनी विजयाच्या कथित फॉर्म्युल्यावर म्हणजेच रोख हस्तांतरणावर मोठा डाव लावला आहे. चारही राज्ये महिलांच्या बँक खात्यात थेट २४,५०० कोटी रुपये हस्तांतरित करत आहेत. निवडणुकीचे वचनही हेच आहे की, सत्तेत आल्यास असेच ५ वर्षे पैसे खात्यांमध्ये जात राहतील.

तामिळनाडू सरकारने २-२ हजार रुपये स्पेशल समर पॅकेजच्या नावाखाली महिलांच्या खात्यात जमा केले. आसामच्या सरकारने बिहू साजरा करण्यासाठी ४-४ हजार रुपये दिले. केरळच्या डाव्या सरकारनेही स्त्री सुखम रोख योजना आणली. १० लाख महिलांना दरमहा १-१ हजार रुपये मिळत आहेत. बंगालच्या तृणमूल सरकारने तर फेब्रुवारीमध्ये लक्ष्मी भंडार योजनेत ५०० रु. वाढवले आहेत.

खराब आर्थिक परिस्थिती असूनही ममता बॅनर्जींच्या तृणमूल सरकारला पुढील वर्षी ५ हजार कोटी रुपये द्यावे लागतील. याच योजनेने २०२१ च्या निवडणुकीत ममतांना विजय मिळवून दिला होता. चारही राज्यांमध्ये सर्व योजनांच्या लाभार्थी महिलांची संख्या ४.१ कोटी आहे, तर एकूण मतदार १७.८९ कोटी आहेत. म्हणजेच या रोख योजनांच्या एकूण लाभार्थी २३ टक्के आहेत.

गेल्या पाच वर्षांतील निवडणुकांचा ट्रेंड पाहिल्यास असे दिसून येते की, महिलांना रोख रक्कम हस्तांतरित करणाऱ्या राज्यांची संख्या एकवरून १५ झाली आहे. ही राज्ये १३ कोटींहून अधिक महिलांना वार्षिक २.४६ लाख कोटी रुपयांपर्यंत रोख रक्कम हस्तांतरित करत आहेत, जी या राज्यांच्या एकूण अर्थसंकल्पाच्या ०.७ टक्के आहे. झारखंडसारखे राज्य आपल्या ग्रामीण विकासाच्या एकूण अर्थसंकल्पाचा ८१ टक्के हिस्सा महिलांना रोख हस्तांतरणात देत आहे.

परंतु, ट्रेंड असाही आहे की, जी राज्ये विकास योजना थांबवून रोख योजनांवर खर्च करत आहेत, तिथे अनेक योजना सुरू होऊ शकत नाहीत. मुळात, राजकीय पक्षांनी हे लक्षात घ्यावे की, केवळ अशा योजना फार काळ चालणार नाहीत. राजस्थान हे त्याचे सर्वांत मोठे उदाहरण आहे. येथे इंदिरा महिला सन्मान योजनाही काँग्रेस सरकारला वाचवू शकली नाही. त्यामुळे या ठिकाणी डॉ. कलाम यांनी दिलेला फॉर्म्यूलाच राजकीय पक्षांनी अंगीकारला पाहिजे. कलाम म्हणाले होते की, मुद्द्यांचे, व्यक्तींचे राजकारण करण्यापेक्षा विकासाचे राजकारण करा. केवळ मोफत योजना आणि फुकट पैसे वाटून विकास साधता येणार नाही. स्त्रियांसाठी सन्मान योजना असाव्यात पण, त्याला कालमर्यादा असावी. त्याची कल्पना राजकीय पक्षांनी निवडणुकीच्या काळातच द्यावी. फुकट आणि आयत्या मिळालेल्या गोष्टींची किंमत राहत नाही, हे कायम लक्षात असू द्यावे. स्त्रीने देखील अशा योजनांचा आधार शोधण्यापेक्षा स्वावलंबी होण्यावर भर द्यावा. यामुळे जास्त चांगला आदर्श ती कुटुंब आणि समाजासमोर प्रस्थापित करू शकते.

७७५५९३८८२२

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# बुद्धिमतां वरिष्ठम्

हनुमंताची स्तुती करताना आपण म्हणतो, ''मनोजवं मारुततुल्यवेगम्'', या श्लोकामध्ये हनुमंताचे वर्णन करताना आपण म्हणतो की हनुमंत बुद्धिमतां वरिष्ठम् आहे. म्हणजे बुद्धिमान लोकांमध्येही वरिष्ठ आहे, श्रेष्ठ आहे. रामायणामध्ये हनुमंताची भूमिका बघताना पदोपदी त्याच्या असीम सामर्थ्याचा आणि बुद्धिमत्तेचा परिचय मिळतो.

सीतेचा शोध घेण्यासाठी वानर वनामध्ये फिरत असताना अनेक दिवस लोटूनही सीता त्यांना सापडत नाही. तेव्हा ते शोध घेत घेत एका विवरामध्ये प्रवेश करतात. तेथे स्वयंप्रभा नावाची एक वृद्ध तपस्विनी तपश्चर्या करीत असते. त्या जागेचे महत्त्व असे असते की तेथे प्रवेश करणारा कोणीही जिवंत तेथून बाहेर जाऊ शकत नाही.

अशा ठिकाणी वानरांसहित हनुमान तेथे प्रवेश करतो. परंतु स्वयंप्रभा ज्यावेळेस हनुमंताला विचारते की, ''तुम्ही कोण आहात? येथे कशासाठी आले आहात?'' त्यावेळेला हनुमान तिला सांगतो की, ''आम्ही रामाचे सेवक असून सीतेचा शोध घेत येथे आलो आहोत. आपल्याला त्रास देण्याचा आमचा कुठलाही हेतू नाही.'' अशा पद्धतीचे उत्तम भाषण हनुमान करतो. त्यामुळे स्वयंप्रभा संतुष्ट होते व त्यांना समुद्रकिनाऱ्यावर जाण्याचा मार्ग सांगते व एवढेच नव्हे तर त्या सर्वांना ती डोळे मिटायला सांगून वानरांसहित हनुमंताला समुद्रकिनाऱ्यावर एका क्षणात पोहोचवते. यामध्ये सुद्धा हनुमंताच्या वक्तृत्वकलेचा परिचय आपल्याला मिळतो.

आपल्याला माहिती आहे की, हनुमान हा असीम सामर्थ्याचा होता, तरीही त्याला त्याच्या शक्तीचा विसर पडलेला होता. समुद्र कसा पार करावा, याचा विचार ज्या वेळेला सर्व वानर करीत होते, त्यावेळेस जांबुवंत हनुमंताला त्याच्या शक्तीची आठवण करून देतो व त्यानंतर हनुमान तत्काळ रामकार्य करण्यासाठी लंकेला जायला सिद्ध होतो.

आकाशमार्गाने हनुमान ज्या वेळेला जात असतो, त्या वेळेला नागमाता सुरसा त्याची परीक्षा घेण्याकरिता समुद्रातून बाहेर येते व हनुमंताचा मार्ग अडवते. ती हनुमंताला म्हणते की, ''मला भूक लागलेली आहे, त्यामुळे तू माझ्या तोंडामध्ये प्रवेश कर.'' हनुमंत म्हणतो की, ''मला रामकार्यासाठी ताबडतोब जायचे आहे,'' तरीही ती त्याचा रस्ता सोडत नाही. त्यामुळे हनुमंत आपले स्वरूप विशाल करतो. ती सुद्धा आपला जबडा खूप मोठा करते. असे करता करता हनुमंताचे शरीर विशाल होत जाते व तिचा जबडा सुद्धा विशाल होत जातो. शेवटी हनुमान



तत्काळ आपले लघुरूप घेतो व तिच्या तोंडामध्ये प्रवेश करून लगेच बाहेर येतो व तिला म्हणतो की, ''तू मला तुझ्या तोंडात प्रवेश करायला सांगितले होते. मी तुझ्या तोंडामध्ये प्रवेश करून आलो आहे. त्यामुळे आता तू मला जाऊ दे.'' अशा प्रकारे हनुमंताने आपल्या बुद्धीचा उपयोग करून आपला मार्ग मोकळा करून घेतलेला आहे. लंकेमध्ये प्रवेश करताना सुद्धा त्याने रात्रीचा वेळ निवडलेला आहे. तो असीम पराक्रमी असून सुद्धा त्याने मांजरा एवढे छोटे रूप धारण केले व लंकिनी या राक्षसीचा पराभव केल्यावर तो सीतेचा शोध घेत लंकेमध्ये फिरू लागला. जेव्हा सीता कुठेही मिळत नाही, त्यावेळेस तो अशोकवाटिकेमध्ये प्रवेश करतो व तेथे सीता त्याला दिसते. सीता दुःखी असते, रावणामुळे भयभीत झालेली असते. त्यामुळे हनुमान तिच्यासमोर एकदम प्रकट होत नाही, तर तो तिच्या जवळच्या एका झाडावर बसून राहतो व हलक्या आवाजामध्ये रामकथा म्हणायला सुरुवात करतो. रामकथेचा आवाज सीतेच्या कानावर ज्या वेळेला पडतो, त्यावेळेला ती हळूहळू हनुमंताकडे बघते, तिची भीती कमी होते व ती हनुमंताशी प्रश्नोत्तरे करते. त्यानंतर हनुमान तिच्यासमोर प्रकट होतो व तिला रामाने दिलेली अंगठी देतो. यावरून सुद्धा संकटात असलेल्या व्यक्तीची मदत कशी केली पाहिजे, हे आपल्या लक्षात येते.

सीतेचा शोध तर लागलेला असतो, म्हणजे मुख्य कार्य संपन्न झालेले असते; तरीसुद्धा एखादे मुख्य कार्य करताना अनेक छोटे-छोटे कार्य उत्पन्न होतात. तर बुद्धिमान पुरुष त्या कार्यांनाही करून टाकत असतो. त्यामुळे हनुमंताला वाटते की रावण कसा आहे, त्याचे सैन्य कसे आहे, त्यांचे बल किती आहे व माझे बल किती आहे, याचा थोडासा अंदाज घेतला पाहिजे आणि यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे. म्हणून तो अशोकवाटिकेमध्ये उपद्रव करतो. त्यामुळे रावण त्याच्या ऐंशी हजार किंकर सैन्याला पाठवतो. हनुमंत त्या सर्वांना सांगतो की, ''अरे, मी तर एक सामान्य वानर आहे. तुम्ही इतके हजारो राक्षस माझ्यासाठी युद्ध करायला आलेले आहात; परंतु बघा, मी तुमच्या सगळ्यांचा कसा पराभव करतो. आमचे राजे सुग्रीव यांच्याकडे माझ्यासारखे हजारो वानर आहेत, जे रामासोबत लंकेला येतील व तुमच्या सर्व राक्षस सैन्याचा पराभव करतील.''

हनुमान असे पाहिले तर सुग्रीवाच्या सैन्यातला सर्वोत्कृष्ट आणि सर्वांत बलशाली होता; परंतु तरीही तो आपल्या सैन्याचे वर्णन करताना नम्रतेने सांगतो की, ''माझ्यापेक्षाही अधिक बलशाली वानर आमच्याकडे आहेत.'' म्हणजे मी जर तुमच्या सगळ्यांचा पराभव करू शकतो, तर बाकीचे आले तर तुमचे काय होईल, अशा पद्धतीची भीती तो त्यांच्या मनात निर्माण करतो. हनुमंताचे हे कृत्य म्हणजे आजच्या आधुनिक युद्धाच्या भाषेत ''सायकोलॉजिकल वॉरफेअर'' म्हणजेच मानसिक युद्ध आहे. लंकादहनाच्या वेळी हनुमान रावणाचा मंत्री प्रहस्त याच्या महालावर जाऊन बसला व त्याने त्याच्या महालाला आग लावली. त्यानंतर हनुमंताने महापार्श्व, अतिकाय, शुक, सारण, जांबूमाली, सुमाली इत्यादी अनेक प्रमुख राक्षस वीरांच्या महालांना आग लावली. फक्त बिभीषणाचे घर हनुमंताने सोडून दिले. यावरून विध्वंस करत असतानासुद्धा चांगल्या लोकांना त्रास होऊ नये, हा हनुमंताचा हेतू कायम होता. आपल्या महाराष्ट्रामध्ये निर्माण झालेल्या समर्थ रामदास स्वामी आणि अनेक संतांनी रामासोबतच हनुमंताची उपासना सुद्धा लोकांना सांगितलेली आहे. हनुमान नुसताच शक्तिमान नव्हता, तर तो बुद्धिमान होता. हनुमंताची भक्ती व बलोपासनेमुळेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यामध्ये सामील होण्यासाठी मुघलांच्या काळामध्ये तरुण निर्माण झाले व त्यांच्यामध्ये गुलामगिरी झुगारून देण्याची भावना निर्माण झाली. हनुमंताची भक्ती म्हणजे सामर्थ्याची भक्ती आहे, बुद्धिमत्तेची भक्ती आहे. हनुमानाच्या या सर्व शक्तींचे स्मरण आपण केले पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### अपघात कमी करण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन आवश्यक

तरुण भारतात स्कूटरवर तीन मुलं जातानाचे छायाचित्र नुकतेच प्रकाशित झाले आहे. या छायाचित्रात दोन मुलं समोर व एक मुलगा मागे तोंड करून बसलेला आहे आणि त्या तिसऱ्या मुलाच्या हातात मोबाईल आहे व यापैकी कोणीही हेल्मेट घातलेले नाही. तसेच एका छायाचित्रात छोटा स्विमिंग ट्रॅक दुचाकीवरून नेताना दोघांचे छायाचित्र प्रसिद्ध झाले आहे. छायाचित्रकारांना असे नियम न पाळणारे मुलं व लोक दिसतात. आपल्यालाही अशी मुलं जी हेल्मेट न घालता दुचाकीवर त्रिपल सीट जाताना दिसतात. हे प्रकार रस्ते अपघातांसाठी कारणीभूत ठरतात. आपल्याला प्रत्येक चौकात सिग्नल तोडणाऱ्या व्यक्ती दिसतात. नियम न पाळणाऱ्या व्यक्तींसाठी चौकामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत की नाही? ते कार्यरत आहेत की नाही? अशी शंका आहे. दुचाकीस्वारांसाठी जेव्हा हेल्मेट आवश्यक केले तेव्हा बरेच लोक हेल्मेट न घालता दिसायचे, परंतु जेव्हा हेल्मेट न घालणाऱ्यांना हजार रुपये दंड आकारण्यात आला तेव्हापासून आता ८० ते ९० टक्के लोक हेल्मेट घालूनच दुचाकी चालवताना दिसतात. रस्ते अपघात कमी करावयाचे असतील तर वाहतूक विभागाने सीसीटीव्ही कॅमेरे योजना कार्यान्वित करावी व वाहतूक नियम न पाळणाऱ्यांना योग्य तो दंड आकारण्यात यावा, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

### लोणार सरोवराचे संवर्धन होणे आवश्यक

आपल्या राज्यातील जागतिक वारसा असलेल्या लोणार सरोवरातील पाण्याची वाढती पातळी हा जागतिक चिंतेचा विषय झाला आहे. देशातील महत्त्वाचे भूवैज्ञानिक वैभव म्हणून लोणारच्या सरोवराकडे पाहिले जाते. बुलढाणा जिल्ह्यातील हे ठिकाण हजारो पर्यटकांचे आकर्षणाचे स्थळ झाले आहे. सुमारे १.८८ किलोमीटर व्यासाच्या उल्काविवरात निर्माण झालेले खाऱ्या पाण्याचे आणि अत्यंत अल्कधर्मी स्वरूपाचे हे सरोवर पृथ्वीवरील एक नैसर्गिक आश्चर्य मानले जाते. केंद्र सरकारकडून लोणार सरोवराला नॅशनल जिओ हेरिटेज साईट म्हणून अलीकडेच घोषित करण्यात आले. बेसाल्टीक खडकात घडलेल्या या सरोवराचे संवर्धन आणि जतन होण्यासाठी व्यापक पातळीवर प्रयत्न झाले पाहिजे. पर्यटनाचा विकास करण्यासाठीदेखील ही बाब महत्त्वाची ठरू शकते.

मागील वर्षी देशातच नव्हे तर महाराष्ट्रातदेखील सरासरीपेक्षा अधिक पर्जन्यवृष्टी झाली आहे. त्याचा परिणाम म्हणून या सरोवरात जास्त पाणी येणे साहजिकच बाब आहे. सरोवराच्या जलपातळीत आणि विस्तारात वाढ का होते आणि ती कशी थांबवावी याबद्दल; सध्या तज्ज्ञांमध्ये विचारविमर्श सुरू आहे. पर्जन्यमान हे नेहमीच बेभरवशाचे असते. त्यामध्ये काहीवेळा कमी तर कधी जास्त पाऊस पडणे ही नैसर्गिक क्रियाच आहे. पुढील काही वर्षांत कमी पाऊस पडल्यास उन्हाळ्याच्या दिवसात लोणार सरोवरातील पाण्याचे बाष्पीभवन होण्याचे प्रमाणही वाढू शकते. लोणार सरोवरासारख्या पाणथळ जागा स्थानिक रहिवाशांना अन्न, पाणी, फायबर, भूजल पुनर्भरण, जलशुद्धीकरण, पूर आणि धूप नियंत्रण तसेच हवामान नियमन यासारखी महत्त्वपूर्ण संसाधने आणि परिसंस्था सेवांची विस्तृत साखळी पुरवत असतात. मात्र, अलीकडच्या काळात विकासाच्या नावावर पर्यावरण ऱ्हासाला हातभार लावला जात आहे. परिणामी पाणथळ जागा नष्ट होत चालल्या आहेत. लोणार सरोवरासारखे जागतिक महत्त्वाचे स्थळ टिकवून ठेवण्यासाठी या परिसरातील पर्यावरणाचे संतुलन सांभाळावे लागणार आहे. अन्यथा लोणार निसर्गाच्या पोटात लुप्त होऊन जाण्यास काही वेळ लागणार नाही.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### ५ किलो गॅस सिलेंडरचा तुटवडा; कामगार उपाशीपोटी

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे गॅसचा तुटवडा भासत असून त्याचा मोठा फटका पुणे परिसरातील मोशी, चिंबळी, चाकण शहरातील कामगार वर्गाला बसत आहे. चाकण हे कामगारांचे शहर म्हणून ओळखले जात असून येथे मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग ५ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलेंडरवर अवलंबून आहे. मात्र सध्या गॅस तुटवड्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गॅस एजन्सीकडे दररोज केवळ ४० ते ५० सिलेंडर उपलब्ध होत असल्याने ''जे लवकर पोहोचतील त्यांनाच सिलेंडर मिळेल'' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे हे कामगार रात्रीपासूनच रांग लावून ठेवत आहेत. एवढेच नव्हे तर सिलेंडरसाठी नंबर लावून हे कामगार जिथे जागा मिळेल तिथे झोपून रात्र काढत आहेत, जेणेकरून त्यांना सिलेंडर उपलब्ध होईल. काही व्यावसायिक अवैधरीत्या घरगुती सिलेंडरमधील गॅस काढून पाच किलोचे सिलेंडर भरून देतात. त्याला पूर्वी किलोमागे शंभर रुपये घ्यायचे. आता त्याचेही दर वाढल्याने परप्रांतीय कामगारांना उपाशीपोटी राहावे लागते. कामगारांनी प्रशासनाकडे ५ किलो व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा वाढवण्याची मागणी केली आहे.

**नितीन दुर्बुडे**/९५०३६४८६३०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# उद्योजक रसिक कुंकुळोळ यांचा श्री. श्री. रविशंकरजी यांच्या हस्ते सन्मान



**तभा. वृत्तसेवा**

**अंबाजोगाई** | अंबाजोगाईचे भूमिपुत्र व पुणे येथील प्रसिद्ध उद्योजक श्री.रसिक कुंकुळोळ यांचा आध्यात्मिक गुरु तथा आर्ट ऑफ लिव्हिंग चे संस्थापक श्री.श्री. रविशंकरजी यांच्या हस्ते त्यांनी आज पर्यंत उद्योग व सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्या बद्दल बेंगलोर येथील आश्रमात सन्मान करण्यात आला.

भारत सरकारच्या टेल डॉट कॉमच्या वतीने

जलशक्ती मंत्रालयाच्या वतीने दिला जानारा जल योध्दा सन्मान २०२५ चे वितरण बेंगलोर येथे झाले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक रसिक कुंकुळोळ हे उपस्थित राहिले होते.तसेच या कार्यक्रमास पुणे येथील आयकर आयुक्त नितीन वाघमोडे,आयकर आयुक्त कैलास गायकवाड,मानवलोक चे कार्यवाह अनिकेत लोहिया, सरकारी टेल डॉट कॉम चे अमेय साठ्ये उपस्थित होते.

यावेळी श्री.श्री.रविशंकरजी यांनी रसिक कुंकुळोळ यांच्या केलेल्या कार्याचे कौतुक करून त्यांचा सन्मान केला. रसिक कुंकुळोळ यांच्या बेंगलोर येथे झालेल्या सन्माना बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### भाजपचा वटवृक्ष करण्यासाठी लोकनेते मुंडे साहेबांनी केलेले कष्ट मोलाचे

# पं. दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण कार्यशाळेचे पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन

## मतदार नोंदणीची प्रक्रिया जोमाने राबवा ; कार्यकर्त्यांना केले प्रेरणादायी मार्गदर्शन

**तभा. वृत्तसेवा**

**परळी वैजनाथ** | भाजपला वाडी, वस्ती तांड्यावर नेण्याचे काम लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यासह अनेक नेत्यांनी अहोरात्र परिश्रम घेऊन केले, त्यामुळेच पक्षाचा आज वटवृक्षासारखा विस्तार झालेला आपल्याला पहायला मिळत आहे. नेत्यांचे हे कष्ट आपल्याला कदापि विसरता येणार नाहीत, त्यांचे कष्ट आणि आदर्श समोर ठेवून कार्यकर्त्यांनी पक्षाचे संघटन आणखी मजबूत करावे असे सांगत पक्षाची मतदार नोंदणी प्रकिया जोमाने राबवा असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.

भारतीय जनता पक्षाच्या परळी शहर तसेच पूर्व व पश्चिम मंडळाच्या वतीने आयोजित पंडित दिनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान कार्यशाळेचे उदघाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज श्रध्दा मंगल कार्यालयात झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, प्रवक्ते राम कुलकर्णी, ज्येष्ठ नेते दत्ताप्पा इटके, विकासराव डुबे, बंकटराव कांदे, जीवराज ढाकणे, श्रीहरी मुंडे, जुगलकिशोर लोहिया, संतोष हंगे, रमेश कराड, सतीश मुंडे, रामदास बडे, गणेश कराड, भाजपचे तालुकाध्यक्ष राजेश गिते, वसंत निर्मळ, शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, न.प. बांधकाम सभापती पवन मुंडे,श्रीराम मुंडे, तानाजी वाव्हळे, आदी उपस्थित होते.



पुढे बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या,भारतीय जनता पक्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत वाढला आहे. राष्ट्र प्रथम ही आपली विचारधारा आहे. जनसंघापासून ते आतापर्यंत अनेक बदल झाले, राजकारणाच्या प्रत्येक टप्प्यावर आपला पक्ष बदलतो आहे. राष्ट्रप्रेमाने ओतप्रोत भरलेल्या भावनेने आणि एका शिस्तीने पक्ष चालतो आहे. देशातील प्रत्येक नागरिकाचे देशावर प्रेम असले पाहिजे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे हे ध्येय आहे आणि हीच भाजपची नीती देखील असल्याचे ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

मुंडे साहेबांचे कष्ट मोलाचे

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी ज्याप्रमाणे पक्ष वाडी वस्त्यावर पोहोचवला प्रत्येक ठिकाणी मुंडे साहेबांसारखे व्यक्ती तयार झाले आणि पक्षाचा वटवृक्ष झाले. आपल्या पक्षाला एक इतिहास आहे, पक्षात विचार, संस्कार आणि नीतीला फार महत्व आहे. 'सत्ता हमारा ध्येय नही, संघर्ष हमारा नारा' आहे या भूमिकेतून आपल्या नेत्यांनी काम केल आहे. भाजप हा देशात एकमेव पक्ष आहे जो भारत मातेचे पूजन करतो. सर्वांना सोबत घेऊन देशभक्तीचे बीज भाजपने रोवले असल्याचे ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

मतदार प्रक्रिया जोमाने राबवा

आपल्या पक्षाने अनेक चढउतार पाहिले आहेत. अनेकांना सोबत घेऊन पक्ष काम करतो आहे. देशात आणि अनेक राज्यात आपली सत्ता आहे, प्रधानमंत्री मोदीजी हे तीनवेळा प्रधानमंत्री झाले.परंतु सत्ता हे पक्षाचे साध्य कधीच नव्हते. सामान्य लोकांची सेवा करणे, देशप्रेमाची भावना वाढीस लावणे हे पक्षाचे ध्येय आहे. आपल्या पक्षात शिस्तीला महत्व आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी देशासाठी, पक्षासाठी बलिदान देऊन सर्वस्व अर्पण केले.

पक्षाचे विचार, कार्य तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे हे आपले ध्येय ठेवा. संघटनेप्रति प्रेम आणि आदर ठेवा.तळमळीने काम करा, प्रधानमंत्री स्वतः जीवतोड मेहनत घेत आहेत. मी स्वतः तहानभूक विसरून काम करत आहे. आता मतदार नोंदणी उपक्रम घरोघरी जावून राबवा, प्रत्येकाची नोंदणी करा, बीएलओ घरी येतील तेंव्हा आपले आणि परिवाराचे नाव नोंदवा हे काम बूथ प्रमुख म्हणून आपणच करू शकता असे आवाहन त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले.

# तार चोरताना टॉवर कोसळला; पुण्याच्या दोघांचा नांदूरघाट शिवारात मृत्यू

**तभा. वृत्तसेवा**

**केज / प्रतिनिधी** | बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. हायव्होल्टेज विद्युत तार चोरी करण्याच्या प्रयत्नात अख्खा टॉवरच कोसळल्याने दोन चोरट्यांचा जागीच मृत्यू झाला. धक्कादायक बाब म्हणजे, घटनेनंतर इतर साथीदारांनी अपघाताचा बनाव रचून मृतदेह परभणीला नेले, मात्र तिथे गेल्यानंतर या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा झाला.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पुणे येथून पाच जणांची एक टोळी केज तालुक्यातील नांदूर घाट शिवारात तारा चोरण्याच्या उद्देशाने आली होती. शनिवारी रात्रीच्या सुमारास हे चोरटे हायव्होल्टेज टॉवरवर चढले आणि तारा कापण्याचे काम सुरू केले. मात्र, याच दरम्यान टॉवर जमिनीवर कोसळला. या भीषण दुर्घटनेत अविनाश पाटोळे आणि आकाश आडे या दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला.




घटनेनंतर घाबरलेल्या इतर तीन साथीदारांनी (आकाश पेठे, दीपक भगत आणि वैभव आदत) पोलिसांपासून वाचण्यासाठी एक शक्कल लढवली. त्यांनी या मृत्यूला 'रस्ते अपघाताचे' स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. दोन्ही मृतदेह एका कारमध्ये टाकून त्यांनी थेट परभणी गाठले. परभणीत पोहोचल्यानंतर मृतदेह गाडीतच सोडून तिघेही साथीदार तिथून पसार झाले.

गाडीच्या चालकाने जेव्हा रुग्णवाहिकेच्या मदतीने मृतदेह रुग्णालयात दाखल करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा मृतांच्या नातेवाईकांना या घटनेची माहिती मिळाली. नातेवाईकांनी चौकशी केली असता आणि पोलिसांनी तपास चक्रावून फिरवल्यानंतर चोरीचा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

या घटनेची माहिती मिळताच परभणी आणि केज पोलिसांनी तात्काळ घटनास्थळाला भेट देऊन पंचनामा केला आहे. टॉवर नेमका कसा कोसळला आणि या टोळीचे आणखी कुठे जाळे पसरलेले आहे का? याचा तपास पोलीस करत आहेत. सध्या पसार झालेल्या आरोपींचा शोध सुरू असून, या घटनेने बीड आणि परभणी जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

# भगवान महावीर जयंती उत्साहात साजरी होणार

## सकल जैन समाजातर्फे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | दि.२९ : जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांच्या जन्म कल्याणकानिमित्त ३१ मार्च २०२६ रोजी देशभरासह बीड येथे सकल जैन समाजतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यादिवशी सकाळी ७ वाजता जैन भवन येथून अहिंसा रॅलीला प्रारंभ होणार आहे. रॅलीमध्ये भगवान महावीरांची प्रतिमा विराजमान असलेला रथ अग्रभागी राहणार आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या हस्ते रॅलीचा शुभारंभ होईल. ही रॅली डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा पेठ, खडकपुरा, जुना बाजार, बलभीम चौक, कारंजा, नवी भाजी मंडई, सुभाष रोड मार्गे सकाळी ९ वाजता जैन भवन येथे पोहोचेल. त्यानंतर रॅलीचे रूपांतर धर्मसभेत होणार आहे. रॅलीदरम्यान दिगंबर जैन मंदिर, जुना बाजार येथे '१००८ प्रयोग त्रिलोक्य चूडामणी वासुदेव भगवान' यांच्या प्रतिमेचा अभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ९ ते ११.३० या वेळेत जैन भवन येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला जैन साध्वी सेजल श्रीजी व बीजल श्रीजी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. जिल्हा कारागृह अधीक्षक रामराजे चांदणे हेही उपस्थित राहणार आहेत. यावेळी भगवान महावीरांच्या जीवन चरित्रावर प्रवचन होणार आहे. तसेच नवकार सोशल ग्रुपतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ.मयन बियाणी यांच्या वतीने मोफत दंतचिकित्सा शिबिर, तर डॉ.आदेश्वर लुनावत यांच्या वतीने फिजिओथेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तयानंतर उपस्थितांसाठी मोजकर परिवाराच्यावतीने गौतम प्रसादीचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर प्रविणकुमार हर्षकुमार बोरा व पारसमल अभयकुमार छाजेड परिवारातर्फे प्रभावना ठेवण्यात आली आहे.

# केज येथे न्यायालयीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचा कोनशिला समारंभ संपन्न

**तभा. वृत्तसेवा**

**केज** | प्रतिनिधी

केज येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय परिसरात नवीन न्यायालयीन इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचा कोनशिला समारंभ रविवार,दि.२९ मार्च २०२६ रोजी सकाळी १०-३० वाजता उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या कार्यक्रमाला न्याय क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती श्री. किशोर चंद्रकांत संत व माननीय न्यायमूर्ती श्री. अभय ज.मंत्री यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माननीय श्री.सिद्धेश्वर सुंदरराव ठोंबरे यांची विशेष उपस्थिती लाभली.केज तालुक्याचे भूमिपुत्र असल्यामुळे त्यांचे विशेष स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमास राजस्थान उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायमूर्ती तथा महाराष्ट्र राज्य स्थावर मालमत्ता नियामक मंडळ अध्यक्ष माननीय श्री.संभाजीराव शिवाजीराव शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बीड येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश माननीय श्री. आनंद लक्ष्मीचंद यावलकर यांनी भूषविले.या प्रसंगी जिल्हा न्यायाधीश-१तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश माननीय श्री.सुधीर बाबूराव भाजीपाले आणि केज वकील संघाचे अध्यक्ष ॲड. महादेव संपतराव लाड यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले.



# मुलानेच घेतला बापाचा जीव, डोक्यात दगड घालून निर्घृण हत्या

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील कडा बसस्थानक परिसरात एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. दारूच्या नशेत असलेल्या मुलाने आपल्या राहत्या झोपडीत गाढ झोपलेल्या वडिलांच्या डोक्यात दगड घालून त्यांची निर्घृण हत्या केली. ही घटना सोमवारी पहाटे उघडकीस आली असून, यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अनिल सजन मुळे (वय ५०) असे मृत पित्याचे नाव असून, आरोपी मुलगा किरण मुळे (वय १९) सध्या फरार आहे.



मूळचे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पिसादेवी येथील रहिवासी असलेले हे कुटुंब गेल्या अनेक वर्षांपासून कडा शहरात मजुरीसाठी स्थायिक झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, अनिल मुळे आणि त्यांचा मुलगा किरण हे बसस्थानक परिसरात झोपड्या टाकून राहत होते. सोमवारी पहाटे किरण हा दारूच्या नशेत घरी आला. वडील गाढ झोपेत असताना त्याने अचानक त्यांच्या डोक्यात मोठा दगड घातला. या हल्ल्यात अनिल मुळे यांचा जागीच मृत्यू झाला. पहाटे मृताची पत्नी झोपेतून उठली असता तिला ही धक्कादायक घटना निदर्शनास आली. तिने आरडाओरडा केल्यानंतर आजूबाजूच्या नागरिकांनी धाव घेतली आणि पोलिसांना माहिती दिली.त्याने हे टोकाचे पाऊल नेमक्या कोणत्या कारणाने उचलले, याचा उलगडा अद्याप होऊ शकलेला नाही.

घटनेची माहिती मिळताच आष्टीचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे, उपनिरीक्षक कृष्णा शिंदे आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवला आहे. मृताच्या पत्नीने मुलगा दारूच्या नशेत होता त्यानेच हे कृत्य केल्याची माहिती दिली आणि एकच हंबरडा फोडला. हत्येनंतर आरोपी किरण मुळे हा फरार झाला असून, त्याला पकडण्यासाठी पोलिसांनी दोन विशेष पथके तयार केली आहेत.

पोलीस दलाचा मोठा ताफा घटनास्थळी

या घटनेच्या गांभीर्यामुळे पोलीस हवालदार प्रवीण क्षीरसागर, अमोल नवले, प्रभाकर खोले, भाऊसाहेब आहेर यांच्यासह मोठा फौजफाटा कडा शहरात दाखल झाला आहे. मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या या कुटुंबात नेमका काय वाद झाला होता, याचा तपास आता पोलीस करत आहेत. आरोपीला लवकरच अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# श्रीरामराव नानासाहेब कोदरकर यांचे निधन



**तभा. वृत्तसेवा**

**अंबाजोगाई** | येथील आदर्श वसाहतीमधील ज्येष्ठ नागरिक श्रीराम कोदरकर यांचे निधन झाले आहे. श्रीराम कोदरकर हे पाटबंधारे विभाग ,अंबाजोगाई सेवानिवृत्त वरीष्ठ लिपिक म्हणून कार्यरत होते.तसेच जेष्ठ नागरीक संघाचे सदस्य होते धार्मिक कार्यात व सामाजिक कार्यात व आदर्श वसाहत मधील सर्व कार्यात अग्रेसर असणारे यांचे आज दि. ३० मार्च २०२६ ,सोमवार रोजी वयाच्या ८१ व्या देहपरिवर्तन झाले. भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ,अंबाजोगाई , खोलेश्वर शैक्षणिक संकूलाचे कार्यवाह तसेच शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देत असलेले किरण व कौस्तुभ दादा कोदरकर यांचे ते वडील होते.त्यांच्या पश्चात पत्नी, तिन मुले,सूना,नातवंडे असा मोठा परिवार आहे.अत्यंत संयमी ,विनयशील व मोठा जनसंपर्क असणारे व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ओळख होती. अंत्यविधी -सायंकाळी ६.००वा श्री.दासोपंत स्मशानभूमी, मुकूंदराज स्वामी रोड अंबाजोगाई येथे होणार आहेत.

# सुलोचना बहीर यांचे निधन



**तभा. वृत्तसेवा**

**नवगण राजुरी (प्रतिनिधी)** | येथील माजी ग्रामपंचायत सदस्य सुलोचना माणिकराव बहीर यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले मृत्यू समयी त्या ८१ वर्षाच्या होत्या. पत्रकार सतीश बहीर,बुलंद छावाचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल बहीर यांच्या मातोश्री सुलोचना माणिकराव बहीर यांचे रविवार दि. २९ रोजी सकाळी दुःखद निधन झाले त्यांच्यावर रविवारी सायंकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात मुलगी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# जमीन नावावर करण्यासाठी पत्नीलाच बनवलं 'बहीण', बुरखा घालून उभं केलं कोर्टात

**तभा. वृत्तसेवा**

**बीड** | रक्ताच्या नात्याला काळीमा फासणारी आणि चित्रपट कथेलाही मागे टाकेल अशी फसवणुकीची एक धक्कादायक घटना बीड शहरात उघडकीस आली आहे. सख्ख्या बहिणीच्या हिशाची जमीन हडपण्यासाठी एका भावाने चक्क आपल्या पत्नीलाच बुरखा घालून 'बहीण' म्हणून उभे केले आणि दुय्यम निबंधक कार्यालयात बनावट सहीनिशी जमीन नावावर करून घेतली. या 'बोगस' व्यवहाराचा भंडाफोड झाल्यानंतर कोर्टाच्या आदेशानुसार बीडच्या शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये पती-पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड तालुक्यातील माळापुरी येथील रहिवासी आबेद खान याच्या आई-वडिलांच्या निधनानंतर वारसा हक्काने त्यांच्या मालकीची जमीन आबेद आणि त्याच्या बहिणीच्या नावे झाली होती. महसूल दप्तरी मृत्यूफेरप्रमाणे (वारस नोंद) दोघांचीही नावे जमिनीवर लागली होती. मात्र, संपूर्ण जमिनीवर एकट्याचाच ताबा असावा, या लोभापायी आबेद खान याने एक कुटील डाव रचला. बहिणीला तिची जमीन मिळू नये आणि तिने आपला हक्क सोडावा, यासाठी त्याने चक्क बनावट कागदपत्रे तयार करण्याचे ठरवले.

पत्नीलाच बनवलं 'बोगस' बहीण

२४ ऑक्टोबर २०२४ रोजी आबेद खान याने बीड येथील दुय्यम निबंधक कार्यालय (रजिस्ट्री ऑफिस) गाठले. यावेळी त्याने आपल्यासोबत सख्ख्या बहिणीला नेण्याऐवजी स्वतःची पत्नी वाहिदा हिला सोबत घेतले. पत्नीला ओळखू येऊ नये म्हणून त्याने तिला बुरखा परिधान करायला लावला आणि अधिकाऱ्यांसमोर हीच आपली बहीण असल्याचे भासवले. बुरख्याचा फायदा घेत वाहिदाने तिथे बहिणीच्या नावे खोट्या सह्या केल्या आणि जमिनीचे सोडपत्र नोंदवून दिले. या एका स्वाक्षरीमुळे बहिणीच्या हिशाची कायदेशीर जमीन आबेदच्या नावावर हस्तांतरित झाली.

असा झाला फसवणुकीचा भंडाफोड

काही दिवसांनंतर जेव्हा मूळ बहिणीला आपल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत संशय आला, तेव्हा तिने महसूल दप्तरी चौकशी केली. आपल्या संमतीशिवाय आणि आपण कार्यालयात न जाताही जमीन भावाच्या नावावर कशी झाली, हे पाहून तिला मोठा धक्का बसला. भावानेच आपल्या जागी दुसऱ्या महिलेला उभे करून फसवणूक केल्याचे लक्षात येताच तिने न्यायालयात धाव घेतली.

न्यायालयाचा दणका आणि गुन्हा दाखल

बहिणीने सादर केलेले पुरावे आणि दुय्यम निबंधक कार्यालयातील नोंदींची शहानिशा केल्यानंतर, कोर्टाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. हा केवळ फसवणुकीचा प्रकार नसून सरकारी यंत्रणेची दिशाभूल करण्याचा गंभीर गुन्हा असल्याचे ताशेरे ओढत न्यायालयाने पोलिसांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार, बीडच्या शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये आबेद खान आणि त्याची पत्नी वाहिदा यांच्याविरुद्ध फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे आणि तोतयागिरी केल्याप्रकरणी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवार रोजी योगिराज महाराज थोटे यांचे कीर्तन



**तभा. वृत्तसेवा**

**बीड (प्रतिनिधी)** | विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील

आठव्या पुण्यतिथी चैत्र शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. योगिराज महाराज थोटे यांचे गुरुवार दिनांक २ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व रमेश विश्वनाथ घुमरे, गंगाधर श्रीमंत घुमरे, बाळासाहेब विश्वनाथ घुमरे वलीपूर, अन्नासाहेब तुकाराम लांडे घाटसावळी ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

# सदाशिव नाईक यांना मातृशोक



**तभा. वृत्तसेवा**

**बीड( प्रतिनिधी)** | चिंचाळा ता वडवणी येथील सौ. उषा जीवनराव नाईक वय (७२) यांचे दिर्घ आजाराने रविवार दि. २९ रोजी माजलगाव येथे उपचार सुरू असताना निधन झाले. वर्तमानपत्र जाहिरात प्रमुख सदाशिव नाईक यांच्या त्या आई आहेत. चिंचाळा ता. वडवणी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर रविवारी संध्याकाळी ६ वाजता अंत्यसंस्कार होतील. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले असा परीवार आहे.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोली जिल्हा परिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेहस्ते राज्यस्तरीय पुरस्कार

## जिल्हा परिषदेचे सीईओ विवेक गायकवाड यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मार्च**



जिल्हा परिषद हिंगोलीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड (भा.प्र.से.) यांना १५० दिवस सेवाकर्मी कार्यक्रम अंतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारामुळे हिंगोली जिल्हा परिषदेला राज्यस्तरावर विशेष आ‍ओळख मिळाली आहे.

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या १५० दिवसांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गड्डापोड, समृध्दी दिवाने, विजय बोराटे तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे, समाज कल्याण अधिकारी गीता गुठ्ठे, जिल्हा संधारण अधिकारी प्रियंका राजपूत, शिक्षणाधिकारी आसावरी काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके यांचय मदतीने विविध उपक्रम राबविले.

यामध्ये सर्व प्रथम जिल्हा परिषद अंतर्गत सर्व कार्यालयामध्ये ई ऑफीस प्रणाली राबविण्यात आली. याशिवाय मागील अनेक दिवसांपासून रखडलेल्या पदोन्नत्या मार्गी लावल्या. कार्यालयीन कामकाजाज शिस्त यावी यासाठी बायोमेट्रीक प्रणाली बसविण्यात आली. याशिवाय प्रलंबीत कामांचा निपटारा, कागदपत्रांचे अ, ब, क, ड वर्गीकरण, कर्मचाऱ्यांची कर्मयोगी पोर्टलवर नोंदणी करून प्रत्येकी पाच अभ्यासक्रम पूर्ण केले. कार्यालयातील कर्मचारी तसेच कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याशिवाय जिल्हा परिषदेतील कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा देखील उगारला.

जिल्हा परिषदेच्या अंतर्गत मुल्यमापनामध्ये हिंगोली जिल्हा परिषदेला १०० पैकी ८० गुण मिळाले आहेत. या गुणांच्या आधारे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांना सेवाकर्मी पुरस्कार देण्यात आला.

या प्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हिंगोली जिल्ह्यातील उत्कृष्ट कामगिरी ही इतर जिल्ह्यांसाठी आदर्श ठरेल. सेवापूर्ती पुरस्कारामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना अधिक जोमाने काम करण्यासाठी प्रेरणा मिळते. त्यांनी जिल्हा परिषद प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे आणि लोकाभिमुख उपक्रमांचे विशेष कौतुक केले.

जिल्हा परिषद हिंगोली अंतर्गत विविध विकासकामे, सेवा वितरणातील पारदर्शकता आणि नागरिककेंद्रित उपक्रम यामुळे सीईओ विवेक गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे जिल्ह्यातील शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत असून, त्याचे सकारात्मक परिणाम नागरिकांपर्यंत पोहोचत आहेत.

राज्यभरातून हिंगोली जिल्हा परिषदेच्या कामकाजाबद्दल कौतुक होत असून, हा पुरस्कार त्या कार्याची पावती मानला जात आहे. या सन्मानामुळे जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, भविष्यातही अधिक गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला जात आहे.

# बासंबा चौक अंडरग्राऊंड भूयारी मार्गाचे काम युध्दपातळीवर

## आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचा पाठपुरावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मार्च**

शहरातून बासंबा गावाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील वाहतुकीचा प्रश्न कायमचा मिटणार आहे. शहरातील डॉ. हेगडेवार डेंटल कॉलेजसमोर सध्या अंडरग्राउंड भुयारी रस्त्याचे काम अत्यंत वेगाने, युद्धपातळीवर सुरू आहे. विशेष म्हणजे, हा भाग एक व्यस्त चौक असल्याने तांत्रिकदृष्ट्या हा रस्ता 'अंडरग्राउंड' करणे अनिवार्य होते, त्या दृष्टीने आता प्रशासकीय पावले उचलली गेली आहेत.

हा रस्ता हिंगोली शहराला बासंबा, वासंबा, चिंचोली आणि सिरसम यांसारख्या अनेक मोठ्या गावांशी जोडणारा मुख्य दुवा आहे. या चौकात होणारी वाहतूक कोंडी आणि अपघातांचा धोका लक्षात घेता, या भागातील नागरिक मागील बऱ्याच दिवसांपासून सुरक्षित आणि सुटसुटीत रस्त्याची मागणी करत होते. अखेर नागरिकांचे हे स्वप्न आता पूर्ण होताना दिसत आहे.

हिंगोलीचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून आणि पाठपुराव्यातून या भुयारी मार्गाच्या कामाला गती मिळाली आहे. या ठिकाणची भौगोलिक परिस्थिती आणि चौकाचे स्वरूप लक्षात घेता, त्यांनी हा रस्ता 'अंडरग्राउंड' करण्यासाठी विशेष निधी आणि तांत्रिक मंजुरी मिळवून दिली. त्यांच्या या कामामुळे परिसरातील ग्रामीण जनतेचा प्रवास आता सुखकर आणि वेळेची बचत करणारा ठरणार आहे. सध्या डेंटल कॉलेजसमोर या कामासाठी मोठ्या प्रमाणावर खोदकाम आणि बांधकामाचे साहित्य पोहोचले असून काम जोरात सुरू आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागल्याने बासंबा आणि सिरसम पट्ट्यातील नागरिकांनी आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांचे आभार मानले आहेत. हा भुयारी मार्ग पूर्ण झाल्यानंतर शहराच्या वैभवात भर पडण्यासोबतच वाहतुकीची कोंडी कायमची दूर होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# रेल्वेच्या विविध मागण्यांसाठी खा. रामराव वडकुते यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मार्च**



राज्यसभेचे नवनिर्वाचित खासदार रामरावजी वडकुते यांचा हिंगोली जिल्हा रेल्वे संघर्ष समितीच्यावतीने सत्कार करून जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाच्या रेल्वे प्रश्नांबाबत त्यांना सविस्तर निवेदन देण्यात आले. या वेळी हिंगोलीकरांच्या दैनंदिन प्रवासाशी निगडित विविध मागण्या पुढे करण्यात आल्या.

समितीच्या वतीने हिंगोलीहून मुंबईकडे जाणारी दैनंदिन रेल्वे तातडीने सुरू करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच अमरावती-पुणे या रेल्वे गाडीचा प्रवास वेळ कमी करून ती प्रवाशांच्या सोयीच्या दृष्टीने नव्याने वेळापत्रकबद्ध करावी, अशी मागणीही मांडण्यात आली. यासोबतच नागपूर - औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे जाण्यासाठी दैनंदिन रेल्वे गाडी सुरू करावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी खासदार रामराव वडकुते यांनी समितीच्या शिष्टमंडळाशी संवाद साधत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. मी खासदारकीची शपथ घेण्यापूर्वीच हिंगोली जिल्ह्यासाठी अत्यावश्यक असलेल्या रेल्वे सेवांबाबत तुमच्या मागण्या समजल्या आहेत. या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन तातडीने प्रयत्न करणार आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या प्रसंगी रेल्वे संघर्ष समितीचे नंदकिशोर तोष्णीवाल, वसंत भट, गोवर्धन अण्णा वीरकुंवर, शेख नईम शेख लाल, सुनील मानका, खलील बेलदार, रवींद्र सोनी आणि गोविंद प्रजापती यांची प्रमुख उपस्थिती होती.



**हिंगोली– १५० दिवसीय ई–गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात नांदेड परिक्षेत्राने राज्यातील सर्व परिक्षेत्रांत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. यानिमित्त मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते नांदेड परिक्षेत्राचे उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी मंत्री आशिष शेलार यांचीही उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### काकीनाडा–हिसार साप्ताहीक रेल्वे नियमित

हिंगोली– गेल्या अनेक वर्षांपासून, दक्षिण मध्य रेल्वे अकोला–पूर्णा रेल्वे मार्गावर काकीनाडा टाऊन– हिसार विशेष साप्ताहिक ट्रेन चालवत होती. आता, केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने ट्रेन क्रमांक ०७७०५/०६ काकीनाडा टाऊन – हिसार विशेष ट्रेनला कायम स्वरूपी करण्याची घोषणा केली आहे. विशेष ट्रेनचा दर्जा काढून कायमस्वरूपी केल्यानंतर, काकीनाडा टाऊन– हिसार ट्रेन लवकरच तिच्या नवीन क्रमांक १७२९५/१७२९६ सह सुरू केली जाईल. दर गुरुवारी सकाळी ५ वाजता काकीनाडा येथून निघून, काचीगुडा, निझामाबाद, बसर, मुदखेड मार्गे रात्री १०.०८ वाजता, नांदेड येथे रात्री १०.५० वाजता, पूर्णा येथे रात्री ११.३५ वाजता, दर शुक्रवारी बसमत येथे रात्री १२.४५ वाजता, हिंगोली येथे रात्री १.३५ वाजता, वाशिम येथे रात्री २.१५ वाजता, अकोला येथे सायंकाळी ५ वाजता, शेगाव येथे सायंकाळी ६ वाजता, भुसावळ, नंदुरबार, सुरत, वडोदरा, रतलाम, चित्तूरगड, अजमेर, झुंझुनू मार्गे जाऊन, ही गाडी दर तिसऱ्या शनिवारी दुपारी २.०५ वाजता हिसारला पोहोचेल. परतीच्या प्रवासात, हिसार–काकीनाडा ट्रेन दर रविवारी रात्री ११.१५ वाजता हिसारहून सुटेल आणि वर नमूद केलेल्या मार्गांनी प्रवास करत, दर मंगळवारी सकाळी ८.१५ वाजता शेगावला, सकाळी ८.४० वाजता अकोला, सकाळी १०.४० वाजता वाशिम, सकाळी १०.४० वाजता हिंगोली, सकाळी ११.३० वाजता बसमत, दुपारी १२.१५ वाजता पूर्णा, दुपारी १.२० वाजता नांदेडला पोहोचेल आणि बुधवारी सकाळी ९ वाजता काकीनाडा टाऊनला पोहोचेल. या रेल्वे सेवेत एकूण २२ डबे असतील, ज्यात २० थर्ड एसी आणि ०२ पॉवर कार डब्यांचा समावेश आहे.

### रूग्ण मित्र समितीतर्फे व्हील चेअर भेट



हिंगोली– लोक सेवा मंडळ छत्रपती संभाजी नगर संचलित रुग्णामित्र हिंगोली यांच्यातर्फे डॉ. चक्रधर मुंगल (वैद्यकीय अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हिंगोली) व डॉ. नितीन पुरोहित (वैद्यकीय अधिकारी) डॉ. मनीष बगाडिया (अस्थीरोग तज्ञ) यांना जिल्हा रुग्णालयात येणार रुग्णांना मदत व्हावी या दृष्टीने व्हील चेअर देण्यात आली. हे सर्व रुग्णमित्र तीन वर्षांपासून जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात येणाऱ्या रुग्णांना मदत व मार्गदर्शन करत असतात.

### दारूबंदी अंतर्गत ७ ठिकाणी पोलिसांचे छापे

हिंगोली–जिल्ह्यात अवैध दारू विक्री करणाऱ्या ७ ठिकाणी पोलिस विभागाने छापे टाकून २३९२० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपींताविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# एटीएमवर मदतीच्या बहाण्याने कार्ड बदलून ४१ हजारांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३० मार्च**

शहरात एटीएममधून पैसे काढण्याच्या बहाण्याने हातचलाखी करत एटीएम कार्डची अदलाबदली करून तब्बल ४१ हजार २०० रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरोधात वसमत शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वसमत शहरातील देशपांडे पेट्रोल पंप परिसरात असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएम केंद्रावर वैजनाथ हरीभाऊ आमलगोंडे (रा. आसेगाव) हे दि. ९ मार्च रोजी पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यावेळी एटीएममध्ये उपस्थित असलेल्या एका अनोळखी व्यक्तीने मी पैसे काढून देतो असा विश्वास संपादन करून मदतीचा बहाणा केला.

या दरम्यान संबंधित व्यक्तीने चलाखीने आमलगोंडे यांचे एटीएम कार्ड बदलून बनावट कार्ड त्यांच्या हातात दिले. पैसे निघत नाहीत असे सांगून आरोपी तेथून निघून गेला. काही वेळानंतर आमलगोंडे यांच्या मोबाईलवर खात्यातून रक्कम वजा झाल्याचे मेसेज येऊ लागले. तपासाअंती एटीएमच्या माध्यमातून एकूण ४१ हजार २०० रुपये काढण्यात आल्याचे स्पष्ट झाले.

या घटनेत आरोपीने एटीएमचा पासवर्डही हुशारीने मिळवून कार्डची अदलाबदली करत फसवणूक केल्याचे समोर आले आहे. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर आमलगोंडे यांनी दि. २९ मार्च रोजी वसमत शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक सुधीर वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार शेख नय्यर, इमरान कादरी व अजय पंडित करीत असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध सुरू आहे. शा प्रकारच्या फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी एटीएममध्ये अनोळखी व्यक्तीकडून मदत घेऊ नये, आपला पिन क्रमांक कुणालाही सांगू नये व संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित पोलिसांना कळवावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल पंपावर मिळणार केरोसीन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मार्च**

जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता भारताच्या इंधन पुरवठ्यावर होताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्वसामान्यांची चूल पेटती राहावी यासाठी मोठा निर्णय घेतला असून, नवनिर्वाचित राज्यसभा खा. रामराव वडकुते यांनी यासंदर्भात जनतेला महत्त्वाची माहिती दिली आहे.

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे इराणकडून होणारा एलपीजी गॅसचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. परिणामी देशामध्ये गॅसची काही प्रमाणात टंचाई निर्माण झाली आहे.

गॅस टंचाईमुळे सर्वसामान्यांची अडचण होऊ नये, म्हणून केंद्र सरकारने प्रत्येक पेट्रोल पंपावर २,५०० लिटर रॉकेल (घासलेट) उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी केंद्र सरकारने नुकतेच परिपत्रक जाहीर केले असून, सर्व पेट्रोल पंपांना त्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत. पंपांवर विशेष 'शेड' उभे करून या रॉकेलचे वितरण केले जाणार आहे.

जनतेने कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. केंद्र आणि राज्य सरकारने इंधन पुरवठ्याचे योग्य नियोजन केले आहे. सर्वांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन खासदार रामराव वडकुते यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून केले आहे.

जागतिक घडामोडींमुळे उद्भवलेल्या गॅस टंचाईवर मात करण्यासाठी केंद्र सरकारने रॉकेल वितरणाची व्यवस्था केली आहे. कुठल्याही नागरिकाची गैरसोय होऊ नये हाच सरकारचा उद्देश आहे.

राज्य सरकारनेही या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. गॅस सिलेंडर उपलब्ध होईपर्यंत रॉकेल हा एक उत्तम पर्याय म्हणून नागरिकांसमोर ठेवण्यात आला आहे. यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# शिवशंभो प्रतिष्ठानच्यावतीने १ मे ला नागरी सत्कार, पुरस्कार वितरण कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मार्च**



शिवशंभो प्रतिष्ठाणच्या वतीने दि.१ मे महाराष्ट्र दिनी विविध क्षेत्रातील सहा व्यक्तींचा शिवशंभो पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. याचबरोबर या सोहळयामध्ये नुतन खा. रामराव वडकुते यांचा नागरी सत्कार मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. या संदर्भात नियोजन बैठक घेण्यात आली.

सामाजिक व्यासपीठ शिवशंभो प्रतिष्ठाण हिंगोली च्या वतीने शनिवार दि.२८ मार्च रोजी शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात बैठक घेण्यात आली. या बैठकीला शिवशंभो प्रतिष्ठाणचे पदाधिकारी, सदस्य व नागरिक उपस्थित होते. या बैठकीमध्ये शिवजन्मोत्सवाच्या दिवशी जाहिर करण्यात आलेल्या जिल्हयातील विविध क्षेत्रातील सहा व्यक्तींचा शिवशंभो पुरस्कार व मानपत्र देऊन सत्कार सोहळा तसेच नुतन खा. रामराव वडकुते यांचा नागरी सत्कार शिवशंभोच्या वतीने दि.१ मे महाराष्ट्र दिनी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या सोहळयाला लखुजी राजे जाधव यांचे तेरावे वंशज श्री.शिवाजी राजे जाधव, राजे होळकर घराण्याचे तेरावे वंशज भुषणसिंह होळकर यांच्यासह सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, आजी-माजी लोकप्रतिनिधी, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या दृष्टीकोनातुन बैठकीत नियोजन करण्यात आले. याच सोहळयामध्ये शिवशंभो बोधचिन्हाचे अनावरण करण्यात येणार असुन मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. या बैठकीला शिवशंभो प्रतिष्ठाणचे अध्यक्ष कल्याण देशमुख, उपाध्यक्ष ॲड.रावण धाबे, सचिव उमेश नागरे, सहसचिव गजानन मगर, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर चव्हाण, सदस्य प्राचार्य पवन सोळंके, डॉ.नामदेव कोरडे, प्रा.नंदकुमार सवंडकर, इंजि.अशोक अग्रवाल, सुनिल पाठक, सुधाकर वाढवे, सदाशिव सुर्यतळ, विजय भालेराव, शैलेश नांदेडकर, मनोज देशमुख, डॉ. गजाला यास्मीन, ज्योतीमाला धुळे, गोपाल सरनाईक, गोपाल भोस, ॲड. संतोष राठोड, संजय भुमरे यांच्यासह मिलिंद वानखेडे, राजेंद्र हलवाई, राजु गवळी, श्रीरंग पंडित आदींची उपस्थिती होती.

# शेतकरी व सरकार यांच्यातील दुवा बनणार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० मार्च**

राज्यातील शेतकरी व सरकार यांच्यातील दुवा म्हणून राष्ट्रवादी किसान सभा काम करणार असून शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न मार्गी लावण्याच प्रयत्न केले जाणार असल्याची माहीती राष्ट्रवादी किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष वसंत मानकर यांनी दिली.

येथील शासकीय विश्रामगृहात राष्ट्रवादी किसान सभेचे पदाधिकारी व शेतकरी यांच्यात संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी किसान सभेचे प्रदेशाध्यक्ष वसंत मानकर, जिल्हाध्यक्ष अनिल पतंगे, वसंत मस्के, सरचिटणीस गणेश डोंगरे, रामभाऊ हांडोळे, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, रवींद्र गडदे, अशोक शिरामे, रवी डोरले, विकास शिंदे, अजय भूतनर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांचा लातूर जिल्हा दौरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ मार्च :** विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे हे मंगळवार, दिनांक ३१ मार्च, २०२६ रोजी लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. सभापती प्रा. शिंदे यांचे सकाळी १०.४५ वाजता लातूर विमानतळ येथे आगमन होईल. सकाळी १०.५५ वाजता लातूर विमानतळ येथून शासकीय विश्रामगृह लातूरकडे प्रयाण करतील. सकाळी ११.१५ वाजता शासकीय विश्रामगृह लातूर येथे आगमन होईल व लातूर शहर जिल्हा भाजपच्यावतीने आयोजित स्वागत व सत्कार समारंभास उपस्थित राहतील. सकाळी ११.३० वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथून विष्णूदास मंगल कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, अंबेजोगाई रोड, लातूरकडे प्रयाण करतील. सकाळी ११.४० वाजता विष्णूदास मंगल कार्यालय येथे आगमन होईल व लातूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत धनगर समाजाच्या निवडून आलेल्या उमेदवारांचा तसेच नूतन राज्यसभा सदस्य रामराव वडकुते व केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत स्पर्धा परिक्षेत यश मिळविलेल्या सनदी अधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभास उपस्थित राहतील. सभापती प्रा. शिंदे हे दुपारी १२.४५ विष्णूदास मंगल कार्यालय येथून दिपज्योती नगर, एकता कॉलनी लातूरकडे प्रयाण करतील. दुपारी १ वाजता दिपज्योतती नगर येथे आगमन होईल व श्री. अनिल गोयकर यांच्या निवासस्थानी राखीव. दुपारी १.४५ वाजता दिपज्योती नगर येथून लातूर विमानतळाकडे प्रयाण करतील. दुपारी २ वाजता लातूर विमानतळ येथून विमानाने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील

## विविध वृत्त...

### किरकोळ कारणावरून हल्ला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** 'तू आम्हाला पाहून हॉर्न का वाजविला', असा जाब विचारत बिथरलेल्या दोघांनी टेम्पोचा पुढील काच फोडण्यासह चालक व त्यांच्याोबतच्या एकावर कोयत्याने वार करून जीवघेणा हल्ला केल्याची घटना मळवटी रस्त्यावरील महादेव मंदिराजवळ शुक्रवार दि. २७ मार्च रात्री सव्वा आठ वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहराच्या मळवटी रस्त्यावरील महादेव मंदिराजवळ फिर्यादी राम दत्तात्रय शिंदे ) हे व्यापारी त्यांचा टेम्पो घेऊन घराकडे निघाले होते. त्याचवेळी समोरील वाहने हटण्यासाठी शिंदे यांनी त्यांच्या टेम्पोचा हॉर्न वाजविला. याचा राग अनावर झालेले आरोपी अतीश उर्फ दाद्या कांबळे व करण कांबळे यांनी टेम्पो थांबविला. टेम्पोची पुढील काच फोडून नुकसान केले. त्याचप्रमाणे चालक शिंदे यांच्या उजव्या पायावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करून त्यांना जखमी केले. त्यांच्यासोबत असलेले अंकुश किशनराव सूर्यवंशी यांच्यावरही कोयत्याने हल्ला केला. यात दोघेही गंभीर जखमी झाले. याप्रकरणी राम दत्तात्रय शिंदे यांच्या फिर्यादीवरून विवेकानंद चौक पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन रेडेकर हे करीत आहेत.

### अॅड. असीम सरोदे यांचे लातुरात व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** येथील मुख्याध्यापक राजकुमार नामवाड गौरव समितीच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ तथा राजकीय विश्र्लेषक आणि परिवर्तनवादी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते अॅड. असीम सरोदे यांचे 'भारतीय संविधान आणि सध्याचे राजकारण' या महत्वपूर्ण विषयावर दि. ३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता येथील दयानंद शिक्षण संस्थेच्या सभागृहात व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.ज्येष्ठ अभ्यासक डॉ. अशोक नारनवरे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या व्याख्यानास प्रमुख पाहूणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे उपस्थित राहणार आहेत. या व्याख्यानाचा लातूरकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन राजकुमार नामवाड गौरव समितीच्या वतीने मोहन हाके, नरसिंग घोडके, शिरीष दिवेकर, प्रा. डॉ. सोमनाथ कदम, नारायण कांबळे, एकनाथ पलमटे, बालाजी साळुंखे, आप्पाराव शिंदे, उत्तम दोरवे, दयानंद कांबळे, एकनाथ पलमटे, नामदेव घोडके, दत्ता माने, बालाजी साळुंखे, बालाजी सोनकांबळे, जगन्नाथ यमले, राहुल गायकवाड, छगन घोडके, तुळशीराम घोडके, शारदाताई हजारे, अशोक तोगरे, मधुकर दुवे, व्यंकट सरोदे, प्रा. अशोक गोमुकले, प्रा. दिलीप भोगे, प्रा. राम कांबळे, डॉ. गंगाधर साखरे यांनी केले आहे.

### व्हीएस पँथर्स वाहतूक आघाडी कार्यकारिणीचा विस्तार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** येथील व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेच्या वाहतूक आघाडीच्या शहर कार्यकारिणीचा विस्तार नुकताच करण्यात आला. संघटनेच्या मध्यवर्ती कार्यालयात संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत वाहतूक आघाडीच्या शहर सचिवपदी आर्यन पठाण, तर शहर उपाध्यक्षपदी युनूस पठाण यांची निवड करण्यात आली. वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष शाहरुख मणियार यांच्या प्रमुख उपस्थितीत संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या हस्ते नव्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचे संघटनेत स्वागत करण्यात आले. यावेळी विनोद खटके यांच्या वतीने नव्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी संपर्कप्रमुख आनंद जाधव, कामगार आघाडीचे यासिन शेख यांच्यासह अमीर सय्यद, समीर शेख, समीर पठाण अरमान शेख, आजन शेख राजीक पठाण, मोहम्मद शेख जाफर शेख, अफरोज शेख बबलू शेख आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शिक्षकांच्या प्रश्नांवर शिक्षक संघ आक्रमक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** शिक्षक प्रश्र्नांवर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा परिषदेत आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत आक्रमक झाल्याचे दिसून आले . संघाचे जिल्हा सरचिटणीस केशव गंभीरे यांनी शिक्षकांचे प्रश्र्न आक्रमकपणे मांडले. जिल्हा परिषद प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांचे प्रश्र्न सुटत नाहीत, याकडे गंभीरे यांनी लक्ष वेधले. प्रश्र्नांमध्ये; चट्टोपाध्याय (१२ वर्ष) व निवड (२४ वर्ष) श्रेणीचे आदेश काढून प्रशिक्षण आयोजित करावे. चुकीच्या संच मान्यता दुरूस्तीचे प्रस्ताव संचालक कार्यालयाकडे पाठवून दुरूस्ती करावी. समायोजनापूर्वी पदवीधर (विज्ञान), मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख तसेच विस्तार अधिकाऱ्यांची पदोन्नती तात्काळ करावी. पदोन्नतीने पदे भरताना शासन निर्णयाचा विचार करून ५० टक्के व ५० टक्के पदे भरताना टीईटी उत्तीर्ण तसेच सीटीईटी उत्तीर्णचा निकाल लागेपर्यंत भरण्यात येऊ नये. भविष्यनिर्वाह निधीचे बिलेविनाविलंब काढण्यात यावी. प्रलंबित वैद्यकीय बिलेतात्काळ निकाली काढावीत. सेवांतर्गत पात्रता वाढविण्यासाठी शिक्षकांची पूर्व परवानगीचे प्रस्ताव व कार्योत्तर मान्यतेचे प्रस्ताव विनाविलंब निकाली काढावे. पं. स.च्या शिक्षण विभागातील रिक्त पदे त्वरित भरून सक्षम लिपीक देण्यात यावा. पात्र शिक्षकांना सेवेत कायम करण्याचे आदेश काढावेत. ऑनलाईन कामकाजासाठी केंद्रस्तरावर स्वतंत्र यंत्रणा राबवावी, यासह २१ मागण्यांचे निवेदन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आले.

## भारतीय स्त्री शक्ती संघटनेच्या नगरसेविका कार्यशाळेस प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च :** महापालिकेत नगरसेवक म्हणून काम करत असताना पालिकेच्या बजेटचा अभ्यास करून विकास कामाची मागणी पाहिजे असे मत ज्येष्ठ माजी नगरसेवक अशोक गोविंदपूरकर यांनी व्यक्त केले.

भारतीय स्त्री शक्ती संघटनेच्या वतीने लातूर शाखेच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेविका साठी कार्यशाळा आयोजित केली होती. १९ नगरसेविका या कार्य शाळेला उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले.

यावेळी डॉ अर्चना आपटे यांचे हमको मन की शक्ती देना प्रेरणा गीत म्हटले. मान्यवराचे स्वागत संघटनेच्या शहर अध्यक्ष प्रेमा बाहेती आणिसचिव संजीवनी सबनीस यांनी केले.भारतीय स्त्री शक्ती संघटनेच्या राष्ट्रीयअध्यक्ष्य कुमुदिनी भार्गव यांनी प्रास्ताविक करून संघटनेची माहिती देऊन कार्यशाळा आयोजना मागची भूमिका स्पष्ट केली.यशस्वी नगरसेवक होण्या साठी घरच्या जबाबदाऱ्या आणि नगरसेवक म्हणून करायची कामे, लोकाच्या अपेक्षा पुर्ण करताना महिलाना नियोजन करणे आवश्यक असल्याचे भार्गव यांनी नमूद केले. अशोक गोविंदपूरकर यांनी लातूर नगर पालिकेचा इतिहास, आरक्षण नसतानाही १९५२ च्या काळात केशरबाई भार्गव आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी नगरसेवक म्हणून केलेल्या कामाची माहिती करून दिली. पक्षाच काम म्हणजे नगरसेवक पद नाही असे सांगत नागरसेविकांच्या जबाबदाऱ्या काय असतात ,आणि बजेट विषय अत्यंत सखोलपणे मांडला. माजी नगरसेवक अॅड. स्मिताताई परचुरे यांनी त्या नगरसेविका असतानाचे कांहीं अनुभव आणि पक्ष निरपेक्ष कार्य किती महत्वाचे ते सांगितले.

जेष्ठ पत्रकार अरूण समुद्रे यांनी संवाद आणि आणि संपर्क ही शक्तीस्थळे असल्याचे सांगितले.या कार्यक्रमात लातूर शाखेने प्रत्येक नगरसेविकेला स्मृतिचिन्हाने सन्मानित केले. प्रातिनिधिक स्वरूपात प्रेरणा होनराव आणि स्वाती घोरपडे यांनी मनोगत व्यक्त केले डॉ सुरेखा काळे यांनी आभार व्यक्त केले. कार्यशाळेचे सूत्रसंचलन अनघा अंधोरीकर यांनी केले.

## विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची अभिरूची निर्माण करावी : व्यंकटेश रावलोड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च :** गणितासारख्या अवघड विषयाची भीती दूर करण्यासाठी अशा उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. 'मॅथ्स मॉडेल अँड पोस्टर प्रेझेंटेशन' ही संकल्पना सर्व शाळांनी स्वीकारून विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाबद्दल अभिरुची निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांनी केले.

स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या वतीने आयोजित 'मॅथ्स मॉडेल अँड पोस्टर प्रेझेंटेशन' हा अभिनव उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी रावलोड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मारुती सूर्यवंशी होते.

यावेळी गणित तज्ज्ञ प्रकाश कामाळे उपस्थित होते. परीक्षक म्हणून व्ही. एस. भोपे, एल. बी. शिरुरे, एस. जी, गुणाले, कांदे. ए. एच. यांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. यावेळी कामाळे म्हणाले की, गणित विषयात अनेक महान व्यक्तींचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या आयुष्यातील प्रेरणादायी गोष्टी विद्यार्थ्यांनी आत्मसात करून संशोधनाच्या दिशेने वाटचाल करावी. या उपक्रमात १२० गणिती मॉडेल्स सादर करण्यात आली. विद्यार्थ्यांनी अत्यंत कल्पकतेने आणि सर्जनशीलतेने विविध संकल्पना मांडल्या. इयत्ता पाचवी वर्गातून जान्हवी कदम प्रथम, सुयश बुलबुले द्वितीय, दुर्वा मस्के तृतीय, अंकिता डोंगरे उत्तेजनार्थ इयत्ता सहावी वर्गातील अक्षरा लोखंडे प्रथम, पठाण शिरीन द्वितीय, वैष्णवी गायकवाड तृतीय, डांगरे राजवीर उत्तेजनार्थ इयत्ता सातवी वर्गातून अक्षरा चौंडे प्रथम, यशराज लाड द्वितीय, आर्यन पवार तृतीय, पल्लवी शेळके उत्तेजनार्थ इयत्ता आठवी वर्गातून शेख नाज प्रथम, अदिती चापुले द्वितीय, श्रेया सावंत तृत्तीय, ठोंबरे श्रावणी उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

## मनपा थकबाकीदार मालमत्ता धारकांची यादी जाहीर करणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च :** आर्थिक वर्ष २०२५-२६ संपण्यास अवघे दोन दिवस बाकी असतानाही काही थकबाकीदार मालमत्ताधारक कराचा भरणा करण्यास टाळाटाळ करीत आहेत. अशा टाळाटाळ करणाऱ्या थकबाकीदारांची यादीच महापालिका प्रशासन जाहीर करणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

कराचा भरणा करावा, यासाठी वर्षभराच्या कालावधीत तीन वेळा १०० टक्के, दोन वेळा ८० टक्के त्यानंतर तीनवेळा ७० टक्के व सध्या ५० टक्के शास्ती माफी योजना सुरू आहे. याचा लाभ घेऊन वर्षभरात ५४ हजार १२३ मालमत्ताधारकांनी ७० कोटींच्या भरणा केला आहे. परंतु, अद्यापही काही थकबाकीदार मालमत्ताधारक कराचा भरणा करण्यास टाळाटाळ करीत आहेत. महापालिकेच्या कर संकलन विभागाने कर वसुलीसाठी मागील २ महिन्यांपासून जप्तीची कारवाई सुरू केली आहे. कर वसुलीसाठी आतापर्यंत जप्ती मोहीम, नळ तोडण्यात येत आहेत.

त्यानंतरही काही थकबाकीदार कराचा भरणा करण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांच्याविरुद्ध आता धडक कार्यवाही करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त मानसी यांनी दिले आहेत.त्यानुसार आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस ३१ मार्चपर्यंत कराचा भरणा करणार नाहीत, अशा थकबाकीदारांची नावे २ एप्रिलपासून जाहीर केली जाणार आहेत. यात पहिल्या टप्प्यात ७५ हजारांवरील थकबाकीदारांची नावे जाहीर करण्यात येणार आहेत. यात निवासी, दुकानदार, व्यावसायिक, बांधकाम व्यावसायिक, हॉटेलचालक, उद्योजक, बँक, पतसंस्था, मोकळ्या जमिनींचे मालक, विविध संस्था आदी थकबाकीदार मालमत्ताधारकांची नावे असणार आहेत.

थकबाकीदारांनी आपले नाव जाहीर होण्याचे टाळण्यासाठी सध्या सुरू असलेल्या ५० टक्के शास्ती सवलतीचा लाभ घेऊन कराचा भरणा करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त मानसी, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी केले आहे. थकित बिल भरण्यासाठी नागरिकांना मदत होण्यासाठी ऑनलाईन सुविधा व अधिकचे कॅश काऊंटर वाढविले आहेत. सुटीच्या दिवशीही वसुली विभाग सुरू ठेवण्यात येणार आहे.

## 'उजास'तर्फे लातूरमधील आशा सेविकांमध्ये मासिक पाळीच्या आरोग्याविषयी जागरूकतेचा प्रसार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च :** आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टचा प्रमुख उपक्रम असलेल्या 'उजास'ने लातूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कमध्ये 'पीरियड मेळा' या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले. याद्वारे संस्थेने तळागाळापर्यंत मासिक पाळीच्या आरोग्याविषयी जागरूकता आणि स्वच्छता व्यवस्थापनाला चालना देण्याची आपली कटिबद्धता बळकट केली. या कार्यक्रमात लातूर जिल्ह्यातील २२८ आशा सेविका एकत्र आल्या. आघाडीवरील आरोग्य शिक्षक म्हणून त्यांच्या क्षमतेला बळकट करण्यावर यामध्ये लक्ष केंद्रित करण्यात आले.



केवळ जागरूकता निर्माण करण्यापुरते मर्यादित न राहता क्षमता बांधणीच्या माध्यमातून समुदायाच्या नेतृत्वाखालील बदल शक्य करण्याच्या उजासच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा हा एक भाग आहे. आशा सेविकांना योग्य ज्ञान आणि साधनांनी सुसज्ज करून सर्वांत तळागाळातील महिला आणि किशोरवयीन मुलींपर्यंत अचूक, व्यावहारिक आणि प्रवादरहित माहिती पोहोचेल, हे सुनिश्चित करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

या कार्यक्रमाला लातूरचे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बारुरे, महिला व बाल कल्याण विभाग, लातूर येथील जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री. जावेद शेख, लातूरचे उप शिक्षण अधिकारी (माध्यमिक) श्री. क्षीरसागर, लातूर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाचे उपायुक्त श्री. पंजाबराव खानसोले, लातूरच्या आशा जिल्हा समन्वयक संगीता डवरी आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियान, लातूर येथील डीएमएम आयबीसीबी श्री. अल्ताफ जिकारे यांसारख्या मान्यवरांनी उपस्थित राहून शोभा वाढवली. यावेळी समाजाच्या वर्तणुकीत बदल घडवून आणण्यात आणि मासिक पाळीच्या आरोग्याचे परिणाम सुधारण्यात आशा सेविकांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर मान्यवरांनी प्रकाश टाकला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले आणि उजासच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची प्रशंसा केली. तसेच, निरोगी समाज निर्माण करण्यासाठी आणि महिला व किशोरवयीन मुलींचे स्वास्थ्य सुधारण्यासाठी आशा कार्यकर्त्यांना अचूक ज्ञानाने सुसज्ज करणे महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी भर दिला.

पीरियड मेळा या कार्यक्रमाचे आयोजन संवादात्मक आणि सहभागी व्यासपीठ म्हणून करण्यात आले. यामध्ये मासिक पाळीच्या स्वच्छतेचे व्यवस्थापन, सुरक्षित प्रथा आणि संसर्ग प्रतिबंध या विषयांवर माहितीपूर्ण स्टॉल्स, प्रात्यक्षिके आणि मार्गदर्शनपर चर्चा यांचा समावेश होता. मासिक पाळीबद्दलच्या खोलवर रुजलेल्या गैरसमजुती दूर करण्यावर यामध्ये विशेष भर देण्यात आला. त्यामुळे आशा कार्यकर्त्यांना समुदाय पातळीवर आत्मविश्वासाने संवाद सुरू करता येईल आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होईल.

उपक्रमाच्या धोरणात्मक दिशेची माहिती देताना 'उजास'च्या प्रमुख पूनम पाटकर म्हणाल्या, ''निव्वळ जनजागृतीकडून मासिक पाळीच्या आरोग्य व्यवस्थापनासाठी एक शाश्वत परिसंस्था उभारण्याकडे 'उजास'ची उत्क्रांती होत आहे. 'आशा' सेविकांच्या क्षमतेमध्ये गुंतवणूक करून, आम्ही सातत्यपूर्ण आणि स्थानिक बदल घडवून आणू शकणाऱ्या कुशल सामुदायिक आरोग्य समर्थकांचे एक नेटवर्क उभारत आहोत. या मॉडेलमधून विस्तारक्षमता आणि दीर्घकालीन शाश्वतता यांची सुनिश्चिती होते, तसेच शेवटच्या टप्प्यापर्यंत सेवा पोहोचवण्यास मदत होते. दिल्लीतील आमच्या अलीकडील प्रवेशासोबतच महाराष्ट्राबाहेर आम्ही जसजसा विस्तार करत आहोत, तसतसे या दृष्टिकोनामुळे आम्हाला विविध भौगोलिक प्रदेशांमध्ये चिवट, समुदाय-केंद्रित प्रणाली तयार करणे शक्य होईल.''

या कार्यक्रमाचा समारोप एका सशक्त संदेशाने झाला. यामध्ये आशा सेविकांना आपापल्या समुदायांमध्ये स्वच्छतेच्या सवयींना प्रोत्साहन देणे, सामाजिक रूढींना आव्हान देणे आणि मासिक पाळीच्या आरोग्याविषयी मोकळ्या संवादांना चालना देणे यांसारख्या बदलाचे माध्यम म्हणून कार्य करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. अशा उपक्रमांच्या माध्यमातून उजास मासिक पाळीच्या आरोग्य व्यवस्थापनासाठी एक शाश्वत, समुदाय-आधारित परिसंस्था निर्माण करत आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च :** राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने राबविलेल्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यातील पहिल्या पाच जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने स्थान पटकावले आहे. या कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचा आज मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात सन्मान करण्यात आला.

यावेळी माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आणि मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील प्रशासनिक



कार्यालयांसाठी १५० दिवसांचा विशेष ई-प्रशासन कृती आराखडा कार्यक्रम जाहीर केला होता. यामध्ये प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान, तंत्रज्ञानाधिष्ठित आणि नागरिकाभिमुख करण्याचा हा उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने १ जून २०२५ पासून या कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू केली होती. यामध्ये संकेतस्थळ सुधारणा, सेवा हमी कायदा (आरटीएस), ई-ऑफिस प्रणाली, डेटा डॅशबोर्ड, व्हॉट्सअॅप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि जीआयएस व रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर आदी बाबींचा समावेश होता. या सर्व बाबींच्या आधारे करण्यात आलेल्या मूल्यमापनात

### १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाची उत्कृष्ट कामगिरी

लातूर जिल्ह्याने २०० पैकी एकूण १७९.२५ गुण प्राप्त करून राज्यातील पहिल्या पाच उत्कृष्ट जिल्ह्यांमध्ये स्थान मिळविले आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संपूर्ण टीमने राबवलेल्या या उपक्रमांची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली. या सन्मानामुळे लातूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

१५० दिवसांच्या या महत्त्वाकांक्षी ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून नागरिकांना विविध सेवा अधिक गतीने उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा कल्पकतेने वापर करून कार्यालयीन कामकाज अधिक अचूक व गतिमान करण्यात आले. या उपक्रमांचे मूल्यमापन होऊन लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाला राज्यातील पहिल्या पाच उत्कृष्ट जिल्ह्यांमध्ये स्थान मिळाले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या 'टीम वर्क'मुळे ही कामगिरी शक्य झाली, हा संपूर्ण टीमचा गौरव आहे, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतकरी आत्महत्यामुक्त राज्य निर्माण करू : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ३० मार्च-**

राज्यातील शेतकरी आत्महत्यामुक्त करु, शेतकऱ्यांना जोडधंदा उपलब्ध करून देवू, असे प्रतिपादन शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. लोहा येथे रविवारी आयोजित राज्यस्तरीय शेतकरी अधिवेशन व पक्षप्रवेश सोहळ्यात ते बोलतहोते.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, गेल्या चाळीस वर्षापासून शेतकऱ्याचे हित जपण्यासाठी शेती मालाला योग्य भाव मिळावा म्हणून शेतकरी नेते शंकरअण्णा धोंडगे यांनी राज्यात लढा उभारला. आज त्यांनी शेतकऱ्याच्या हिताचे निर्णय घेणाऱ्या शिवसेना पक्षात प्रवेश केला. त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला, हे माझे भाग्य



समजतो.

राज्यातील शेतकरी जगला पाहिजे, त्यांना न्याय मिळाला पाहिजे ही भूमिका माझी पण आहे. मी सुध्दा शेतकरी कुटुंबातील आहे. त्यामुळे मुख्यमंत्री होताच शेतकऱ्याच्या हिताचे निर्णय घेतले. राज्यातील तिजोरीवर बळीराजाचा अधिकार आहे, त्यांच्या हितासाठी नियम बाजूला ठेऊन निर्णय घेण्याचे काम केले. यापुढेही शेतकऱ्याच्या हिताचे निर्णय घेतले जातील. शेतकऱ्यांना जोडधंदा निर्माण करून दिला जाईल, सिंचनाचा प्रश्न मार्गी लाऊन शेतकरी सुखी कसा होईल, या दृष्टीने उपाययोजना आखल्या जातील. शेतकरी आत्महत्यामुक्त राज्य निर्माण करू, मराठवाड्यातील सिंचनाचा प्रश्न सोडवून मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याची भूमिका आहे.

देण्याचा प्रयत्न असणार आहे, कर्जमाफी जाहीर केली ती पूर्ण करण्यात येईल, अतिवृष्टी असोकी गारपीट असो शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे काम राज्यातील शिवसेना सरकारने केले आहे, लाडकी बहीण योजना सुरूकेलीती कधी ही बंद होणार नाही. येणाऱ्या काळात २१०० रुपये लाडक्या बहीण यांना देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी काळजी करण्याची गरज नाही. शेतकरी नेते शंकरअण्णा धोंडगे हे शिवसेनेत आले आहेत. आता शेतकऱ्याचे प्रश्न नक्की सुटतील. शंकरअण्णा धोंडगे आता तुम्ही तालुक्याचे नेतृत्व करू नका तर किसान सेनेच्या माध्यमातून राज्यात शेतकऱ्याची चळवळ शिवसेनेच्या पाठीशी उभी करा. शेतकऱ्याच्या हितासाठी

सिंचन प्रश्न, विकास कामे पूर्ण करण्यासाठी शिवसेना तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणार आहे, असे म्हणूनत्यांनी जय जवान जय किसान असा नारा दिला.

यावेळी शंकरअण्णा धोंडगे व त्यांच्या समर्थकांनी लाकडी नागर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेट दिला. यावेळी माजी गृहमंत्री सीताराम म्हेत्रे, खा. ज्योतीताई वाघमारे, आ. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर, आ. बाबुराव कदम, आ. आनंदराव बोंढारकर, माजी आ. सुधाकर भालेराव, माजी आ. मनोहर पटवाणी, माजी आ. शंकरअण्णा धोंडगे, शिवराजदादा धोंडगे, दिलीपदादा धोंडगे, दत्ता पवार यांच्यासह राज्यभरातील पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उमरी खरेदी विक्री संघावर गोरठेकरांचे वर्चस्व कायम

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ३० मार्च-**

आमदार कै . बाबासाहेब देशमुख गोरठेकर आ . कै बापुसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या हाती गेली चाळीस वर्षा पासुन एक हाती सत्ता खरेदी विक्री संघावर होती त्यांच्या निधनानंतर ही मतदारानी गोरठेकर घराण्यातील तिसऱ्या पिडीला तेवढीच साथ देवून विरोद्धकाच्या अरोपाला फेटाळून मतदान रूपी आशीर्वाद दिल्याने गोरठेकर बंधूचा खरेदी विक्री संघाचा गट बहुमताने कायम राहीला आहे राष्ट्रवादी गोरठेकर यांचे दहा तर भाजपा चे उदोजक कवळे गुरूजी यांच्या गटाला तीन जागा मिळाल्या आहेत .

उमरी खरेदी विक्री संघाची निवडणूक दि. २९ मार्च रोजी पहाडगल्लीतील जिल्हा परिषद शाळेत पार पडली.. या निवडणुकीसाठी राष्ट्रवादीचे शेतकरी विकास पॅनल व सहकार बचाव पॅनलमध्ये लढत झाली. या निवडणुकीत राकाँच्या गोरठेकर यांच्या पॅनलने विजयाची मुसंडी मारली तर भाजपा खा . अशोकराव चव्हाण ,आ.राजेश पवार नेतृत्वाखाली पार पडलेल्या या निवडणुकीत उदोजक मारोतराव कवळे गुरुजीं आणि माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी , डॉ विक्रम देशमुख ,बापुसाहेब कौडगावकर ,ज्ञानेश्वर पा सावंत यांच्या प्रयत्नाअंती या गटाचे ३ उमेदवार निवडून आले.

तालुक्याचे लक्ष लागलेल्या उमरी खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीत सत्ताधारी व विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडल्या. परंतु स्थापनेपासून असलेले गोरठेकर गटाचे वर्चस्व यावेळीही राहिले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शेतकरी विकास पॅनलचे नेते बाजार समितीचे सभापती शिरीष गोरठेकर, उपनगराध्यक्ष कैलास देशमुख गोरठेकर, प्रल्हाद पाटील ढगे, गणेशराव पाटील गाढे, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक प्रवीणभाऊ सारडा ,प्रकाश पाटील चिंचाळकर, सुभाषराव गोरठेकर, सुधाकर देशमुख धानोरकर, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजीव पाटील ढगे बोळसेकर, आनंदराव यल्लमगोंडे, बालाजी

जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजीव पाटील ढगे इज्जतगावकर, सदाशिव पुपूलवाड, कैलास गोरठेकर यांचे पीए नागेश बट्टेवाड यांच्यासह अनेक कार्यकत्यांनी पॅनलला विजयी करण्यात सहकार्य केले.

उमरी खरेदी विक्री संघाच्या १२ जागांसाठी २३ उमेदवार रिंगणात होते. होते. या निवडणुकीत गोरठेकर गटाचे वैयक्तिक गटातून राघोजी माधवराव जाधव, बालाजी पाटील पवार हातनीकर, महिला गटातून कलावतीबाई ढगे, ललिता

यल्लमगोंडे, अनूसूचित जाती जमातीमधून लक्ष्मण हिरमोड, इतर मागासवर्गीयमधून मारोती आनेराये, सहकारी संस्था गटातून व्यंकटराव कदम, नारायण जिरोणेकर, रावसाहेब पवार विजयी झाले असून गणेश अन्नेमवाड बितनाळकर हे यापूर्वी बिनविरोध निवडून आले आहेत. हे सर्व गोरठेकर गटाचे उमेदवार असून भाजपा आ. राजेश पवार व मारोतराव कवळे गुरुजींच्या सहकार बचाव पॅनलचे दादाराव गायकवाड, अशोक मोरे, माधवराव पवळे हे ३ जण निवडून आले आहेत. विशेष म्हणजे गोरठेकर गटाचे निष्ठावंत कार्यकर्ते नारायणराव जिरोणेकर हे २५ वर्षांपासून संस्थेवर संचालक, ८ वर्षे सभापती तर ५ वर्ष उपसभापती होते. यावेळीही मतदारांनी गोरठेकर घराण्याच्या तिसऱ्या पिढीवर विश्वास व्यक्त करीत सत्तेची चावी दिली आहे. निवडणूक

भाजपाच्या गटाला तीन जागावर समाधान मानावे लागले .

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून संजय कार्लेकर तर केंद्र प्रमुख बी.बी.पवार, प्रफुल्ल कांबळे, के. बी. आबादार, आर एस सोनकांबळे, सय्यद शब्बीर यांनी काम पाहिले. मतदान व मतमोजणीच्या वेळी पोलीस निरीक्षक जयप्रकाश गुट्टे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन आरमाळ महेंद्रकुमार, पोकुलवार व सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला. उमेदवार निवडून आल्यावर गोरठेकर गटाने विजयी रॅली काढली. या रॅलीत शिरीष देशमुख गोरठेकर, कैलास देशमुख गोरठेकर, गणेशराव गाढे, सुधाकर देशमुख धानोरकर, काँग्रेसचे राजीव पाटील बोळसेकर, प्रल्हाद पाटील ढगे इज्जतगावकर, आनंदराव वल्लगोडे, बालाजीराव जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसाचे राजीव पाटील ढगे इज्जतगावकर, नागेश बट्टेवाड नगर पालिकेचे नगरसेवक, नगरसेविका, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. फटाके फोडून गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.



## आ. बोंढारकर यांच्या कार्यालयाचे उपमुख्यमंत्री शिंदे यांचे हस्ते उद्घाटन

**नवीन नांदेड** - नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांचे शिवनेरी हे जनसंपर्क कार्यालय सर्वसामान्य जनतेचा आधार बनावे अशी रास्त अपेक्षा व्यक्त करतानाच जात , धर्म, पंथ अथवा कुठलीही भेदभाव न बाळगता सर्वसामान्यांचे प्रश्न या कार्यातून सोडवली जावेत असे उद्गार राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते ना.एकनाथराव शिंदे यांनी कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. नांदेड येथील हिंगोली गेट परिसरात आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या शिवनेरी या जनसंपर्क कार्यालयाचे आज सायंकाळी उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.यावेळी आ. हेमंत पाटील , आ . आनंदराव बोंढारकर, आ. बालाजीराव कल्याणकर,आ. बाबुराव कदम कोहळीकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या प्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे म्हणाले की, नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा आमदार म्हणून तुम्ही आनंदराव बोंढारकर यांना निवडून दिला आहात. आनंदराव हे या भागाचे आमदार म्हणून विधानसभेत आपले प्रश्न मांडत आहेत. ते प्रश्न सोडून घेण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत आहेत. तुम्ही त्यांच्या पाठीशी उभे राहिलात म्हणून ते आमदार म्हणून निवडून आले. आता आमदार बोंढारकर यांच्यासह मी ही आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. त्यामुळे नांदेड दक्षिण मध्ये विकासाची सर्व कामे नेटाने होतील .जनतेचे प्रश्न सोडवले जातील असा विश्वास ही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला. या उद्घाटन सोहळ्यास शिवसेनेचे आजी-माजी लोकप्रतिनिधी , पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदमपूरात महादेव काठी व चैत्र-आंबलीचा प्रसाद

**आदमपूर** -बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथे वाजत गाजत महादेव काठी व चैत्र आंबिल बारशीचा परंपरागत उत्सव सोमवार दि.३० मार्च ला महादेव मंदिर परिसरात संपन्न झाला.रविवार दि.२९ रोजी काठीस स्नानार्पण केल्यानंतर वाजत गाजत मानकरी जेष्ठ नागरिक प्रभन्ना होटलप्पा पाटील यांच्या वाड्यात मन्मथ अप्पा मठपती यांनी विधिवत पूजा अर्चा करीत दुपारी महादेव काठीची प्राण प्रतिष्ठा करण्यात आली. सोमवारी सकाळी आठ वाजता महादेव काठीस वाजत गाजत महादेव मंदिर परिसरात नेण्यात आले.शिवालयी गाभारी विधिवत पूजा अर्चा,नैवेद्य,आंबिल,प्रसाद अर्पण करीत शिव भक्त भाविकांना प्रसाद,आंबलीचे सामूहिक वाटप करण्यात आले.शिखर शिंगणापूर येथील आराध्य दैवत मोठा महादेव यात्रेनिमित्त सबंध महाराष्ट्रभरात ग्रामीण परिसरात कावड-काठींचे हर्षोल्लासात पूजन होत असते.ग्राम संस्कृतीत महादेव काठी चैत्र आंबलीचा उत्सव आजही पहायला मिळत आहे.त्याचदिवशी सायंकाळी महादेव काठी शिवालय प्रांगणातून वाजत गाजत गावच्या मुख्य रस्त्यावरून नेत रात्री उशिरा प्रभन्ना पाटील यांच्या वाड्यासमोर समारोप करण्यात येतो. यावेळी किसन पाटील,माणिक पाटील,योगेश पाटील, राजेश पाटील,शिवकुमार पाटील,शंकर लिंबूरे पाटील, गणेश लिंबूरे पाटील,गणेश बासरे,गंगाधर पंगलवार, शिवलिंग बासरे, गंगाराम लमले, हणमंत लमले, संभाजी लमले,यशवंत शिनगारे, अगडमदास शिनगारे,माजी सरपंच साईनाथ चिंतले,पत्रकार जाफर आदमपूरकर,दिनकर कोळनुरे, कृषी अधिकारी लक्ष्मण कोकणे,माजी उपसरपंच राम चिंतले,शिवा डोईफोडे,वैजनाथ सुवर्णकार,रामदास पेंटे, बालाप्रसाद मठपती, चिगळे, हलबुर्गे,मालीपाटील,हांद्रे भरगिरे, कोळनुरे, बासरे,कोकणे,बिद्राळे,चिंतले, मठपती सहकुटुंब परिवारासह व समस्त शिवभक्त गावकरी,महिला भगिनी आदिंची उल्लेखनीय उपस्थिती होती.

## प्रभू सावंत पुरस्काराने सन्मानीत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मार्च-**

गेली आठ वर्षापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान यांच्यावतीने भव्य अशा बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन केले जाते ह्याही वर्षी सोनारी फाटा तालुका हिमायतनगर येथे बौध्द धम्म परिषद मोठ्या थाटात संपन्न झाली दरवर्षी ह्या धम्म परिषदेमध्ये सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते यंदा ही दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध क्षेत्रा मध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवराचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला आहे यावर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता गौरव २०२६ चा पुरस्कार प्रभू सटवाजी सावंत यांना मान्यवराच्या हास्ते प्रदान करण्यात आला आहे.

# शेतकरी पुत्र विश्वजीत इंगळे बनला पोलीस

**तभा वृतसेवा**
**निवघा बा., दि. ३० मार्च-**

येथून जवळच असलेल्या उमरी ( भाटेगाव ) या छोट्याशा गावात तशी शैक्षणिक स्पर्धा खूप मोलाची आहे . येथील बहुतांश कुटूंबातील नागरीकांचा प्रमुख व्यवसाय शेती असला तरी ही येथील शैक्षणिक वातावरण हे उल्लेखनियच आहे. या गावात केवळ ४ थी पर्यंतच शाळा तालुक्या पासून ३० किमी च्या अंतरावर असलेल्या या गावातील नागरीकांनी शैक्षणिक सुविधांचा अभाव कधी जाणवूच दिला नाही उलट जमेल त्या परिस्थितीत आपल्या मुलांना त्यांनी शिकण्यासाठी गावापासून दूर करून शिक्षणाची गंगा कायम प्रवाहीत ठेवली असल्याचे येथील उच्चशिक्षीत नागरीकांकडे पाहून प्रत्येकजन ह्या भावना व्यक्त करताना दिसत असतो . गावची



हीच प्रेरणा घेऊन येथील शेतकरी बाबूराव इंगळे यांचे पुत्र विश्वजीत बाबूराव इंगळे यांनी आपणाला सैन्यात भरती होण्याचे स्वप्न पाहिले त्यासाठी सतत प्रयत्न करत त्यांनी वेळोवेळी भरती साठी परीक्षा दिल्या मात्र त्यांना थोड्या थोड्या अंतराने यशाने हुलकावनी दिली परंतु अपयशाला खचून न जाता त्यांनी गत पाच वर्षापासून ची आपली मेहनत सुरुच ठेवली आणि यंदा पोलीस भरतीची परीक्षा दिली त्यात त्यांना यश मिळाले आणि त्यांची अकोला पोलीस दलात भरती झाली . त्यांच्या निवडीचे स्वागत आणि कौतूक गावकऱ्यांनी जंगी मिरवणूक काढून केले .

दरम्यान पाच वर्षाच्या अथक संघर्षातून मिळणाऱ्या माझ्या निवडीमागे सर्वांत महत्वाचा हात म्हणजे माझे आईवडील.माझ्या ह्या प्रवासात,छत्रपती शिवाजी महाराज,फुले,शाहू,आंबेडकर यांचे विचार व आईवडिलांचे संस्कार आणि योग्य मार्गदर्शन ही माझ्यासाठी सर्वात मोठी शिदोरी ठरली.तसेच वेळोवेळी मिळणारे आईवडील,शिक्षक,गावकरी मंडळ आणि मित्रमंडळ यांचे मार्गदर्शन व आधार. येणाऱ्या तरुण मुलांना माझे एकच सांगणे आहे की जर माणसात जिद्द,शिस्त,चिकाटी आणि संयम या गोष्टी असतील तर माणूस कुठलेही कार्य सहज पार पाडू शकतो अशी प्रतिक्रीया विश्वजीत इंगळे यांनी दिली.

# बोरवाडी येथे उद्या खुल्या कबड्डी स्पर्धा

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ३० मार्च-**

तालुक्यातील बोरवाडी येथे उद्या १ एप्रिल रोजी श्री हनुमान जयंतीनिमित्त भव्य खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयरीळोजन करण्यात आले असून बुधवारी दुपारी २ वाजता बोरवाडीत स्पर्धेस सुरुवात



करण्यात येणार असून डे-नाईट खेळ खेळवला जाणार आहे. या कबड्डी स्पर्धे साठी गावकऱ्यांनी १५ हजार रुपयांचे प्रथम, १० हजार रुपयांचे द्वितीय, ७ हजार रुपयांचे तृतीय तर ५ हजार रुपयांचे चतुर्थ बक्षीस ठेवण्यात आले आहे.

इच्छुक कबड्डी संघांनी ९०२२५६९५९८ या क्रमांकावर संपर्क साधून संघांची नावनोंदणी करावी, असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

तसेच गुरुवार, २ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता भव्य कुस्ती स्पर्धेचेही आयोजन केलेले आहे, अशी माहिती बोरवाडीचे भूमिपुत्र गंगाधर वानोळे यांनी दिली.

# बारडच्या शितलादेवी मंदिरात यात्रा महोत्सव ; हनुमान मूर्तींची पालखी मिरवणूक

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ३० मार्च-**

मुदखेड तालुक्यातील बारड येथील तेलंगणा ,आंध्र प्रदेश , मराठवाडा, विदर्भातील जागृत देवस्थान तसेच भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या शितलादेवी (पोचम्मा ) देवीच्या यात्रा महोत्सवास मोठ्या उत्साहात सुरुवात झाली असुन. यानिमित्त हनुमान मूर्ती पालखी मिरवणूक ग्रामस्थांच्या वतीने काढण्याची प्रथा असुन कुस्त्यांचा फडही रंगणार आहे .

पोचम्मा देवीचे पुरातन काळातील भव्य वडाच्या झाडाखाली वसलेले मंदिर आहे . शीतला मातेचे वास्तव्य विहिरीत असल्याचे सांगितले जाते . थोर स्वातंत्र्य सेनानी साहेबराव देशमुख बारडकर यांनी देवस्थानासाठी चार गुंठे जागा दान दिली आहे . चैत्र वैशाख पौर्णिमेला दरवर्षी यात्रा भरत असते या निमित्त लाखो भक्त चंद्रपूरच्या देवीचे दर्शन घेऊन शीतला देवीच्या दर्शन घेण्याची प्रथा रूढ आहे . चंद्रपूरच्या आईची धाकटी बहीण म्हणून पोचम्मा देवीची ओळख आहे . भक्तांचे श्रद्धास्थान असल्याने तेलंगणा , आंध्र प्रदेश , विदर्भ , मराठवाड्यासह जिल्ह्यातील भक्त नवसाची



परतफेड करण्यासाठी मनोभावी आराधना करतात . नवरात्र महोत्सवात ओटी भरण्यासाठी सुहासिनीची लगबग असते . नवरात्र अष्टमीला तांबोल व दुधाचा प्रसाद वाटप केला जातो . संस्थांच्या वतीने दरवर्षी पाडव्यानिमित्त शितला देवीचे बैलगाडीतून आंबील काढण्याची पद्धत आहे .

ग्रामस्थांच्यावतीने दरवर्षी हनुमान जयंतीला यात्रा महोत्सव निमित्त भव्य पालखी मिरवणूक काढली जाते . शंभर वर्षांपूर्वीची सुंदर आकर्षक लाकडी नागोबा कुंभार यांनी तयार केलेल्या मूर्तीची गावातील प्रमुख रस्त्यावरुन भक्तीमय वातावरणात शोभायात्रा काढण्यात येत असते यावर्षी दि.२ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता भव्य शोभायात्रा निघणार आहे . यामध्ये सर्वधर्मीय युवक सहभागी होत असतात.ग्रामपंचायत च्या वतीने यात्रेनिमित्त भव्य कुस्तीची दंगल दि.३ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजता कुस्त्यांचा फड रंगणार आहे . यानिमित्त पैलवानांसाठी आकर्षक पारितोषिक ठेवण्यात आली आहे . प्रथम पारितोषिक अकरा हजार रुपये, द्वितीय पारितोषिक सात हजार रुपये ठेवण्यात आले आहे . याशिवाय अनेक आकर्षक बक्षीसे पैलवानांना देण्यात येणार आहेत .

# जिल्ह्यातील हरित क्षेत्र वाढण्यासाठी माझी शाळा - हरित शाळा उपक्रम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मार्च-**

वृक्षमित्र फाऊंडेशन नांदेड व पी.एम.श्री जिल्हा परिषद हायस्कूल तामसा ता. हदगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आज शाळेत निसर्गवेध पर्यावरण परिसंवाद व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रस्तुत कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून वृक्षमित्र संतोष मुगटकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वृक्ष लागवड व संगोपनाबाबत विस्तृतपणे मार्गदर्शन करीत प्रश्नोत्तर स्वरूपात विद्यार्थ्यांशी संवाद साधला. योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रोत्साहनपर वृक्ष व पुस्तक भेट दिले व कार्यक्रमात मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांकडून शालेय वृक्ष लागवड निगा संवर्धनाचे वचन घेत जून २०२६ मध्ये प्रशालेस दोनशे वृक्ष भेट देण्याचे आश्वासन दिले व जिल्ह्यातील हरित क्षेत्र वाढण्यासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला जाईल, असे प्रतिपादन केले.

प्रस्तुत उपक्रमाची नाविन्यपूर्ण कल्पना, नियोजन व कार्यवाही तामसा प्रशालेचे सक्षम पर्यवेक्षक एल. बी. चव्हाण यांनी सहकारी शिक्षक कोळगीरे, कांबळे, कंधारे, सय्यद, अत्तार, मुक्कनवार, सुतार, सौ. कोंडेकर, सौ. पाटील, सौ. ठक्करवाड यांचे सहकार्याने आणि शाळा प्रमुख देवीदास अक्कमवाड यांच्या मार्गदर्शनाने पूर्ण करीत यशस्वीरीत्या संपन्न केला.

परिसंवादानंतर शाळा परिसरात शालेय समितीचे अध्यक्ष गजानन कल्याणकर, सदस्य संजय सोमेवाड, सचिन तांदळे, पत्रकार देशमुख, सर्व विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच वृक्षमित्र फाउंडेशन नांदेडचे वृक्षमित्र शैलेंद्र क्षीरसागर, गणेश साखरे, अजय सोनकांबळे यांनी वृक्ष लागवड केली.

### जाहीर नोटीस

जाहीर नोटीस देण्या करिता राजीव ग्रामीण विकास मंडळ, उमरदरी. ता. मुखेड जि.नांदेड संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल, मुखेड. ता. मुखेड जि.नांदेड. ही शाळा हस्तांतर करण्यासाठी जवाहरलाल नेहरू शिक्षण प्रसारक मंडळ, उमरदरी. ता. मुखेड जि. नांदेड. या संस्थेच्या व्यवस्थापन मंडळात दोन्ही संस्थेच्या ठरावावरून राजीखुशीने व्यवस्थापन मंडळ बदल करून जवाहरलाल नेहरू शिक्षण प्रसारक मंडळ, उमरदरी. ता. मुखेड जि. नांदेड या संस्थेस समाविष्ट करण्यात येत आहे.

तरी पुढील सात दिवसात कोणत्याही स्थानिक अथवा बाहेरील नागरीक, संचालक मंडळाची तक्रार अथवा सूचना असल्यास जवाहरलाल नेहरू शिक्षण प्रसारक मंडळ, उमरदरी ता. मुखेड जि.नांदेड या संस्थेच्या कार्यालयात लेखी स्वरूपात कळवावे...

**अध्यक्ष**
**जवाहरलाल नेहरू शिक्षण प्रसारक मंडळ,**
**उमरदरी. ता. मुखेड जि. नांदेड.**

# सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक बी.जी. मुंडे व वित्त अधिकारी राऊतवार यांना दिलेला नियमबाह्य पदभार काढण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३० मार्च-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उद्योग भवन येथे बी.डी.मुंडे यांच्या पदाला कोणतीही वैध मान्यता नसताना त्यांना सहायक क्षेत्र व्यवस्थापक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच व्ही.जी.राऊतवार यांना वित्त अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला असून, या दोघांचेही कार्यभार काढून टाकण्यात यावा, अशी मागणी ॲड.संतोष गायकवाड यांनी एका निवेदनाव्दारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कार्यकारी अभियंत्याकडे केली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उद्योग भवन नांदेड येथे सहायक क्षेत्र व्यवस्थापक या पदावर बी.डी.मुंडे यांना कोणतीही वैध मान्यता अथवा मंजूर पद उपलब्ध नसताना दि.२२ सप्टेंबर २०२५ रोजी नियुक्ती देण्यात आली आहे. हे पद अस्तित्वात नसताना नियमबाह्य पध्दतीने हे आदेश काढण्यात आले आहेत. तसेच या नियुक्ती प्रक्रियेबाबत कोणतेही वैध, अधिकृत लेखी कागदपत्रे उपलब्ध नाहीत. प्रशासकीय मान्यता यांचा कुठलाही ठोस आधार नाही. हि नियुक्ती पूर्णपणे मनमानी, अपादर्शक व नियमबाह्य पध्दतीने करण्यात आली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करुन जबाबदार अधिकाऱ्यावर शिस्तभंग व दंडात्मक कारवाई करण्यात यावी, असेही ॲड.संतोष गायकवाड यांनी निवेदनात नमुद केले आहे.

दरम्यान सहायक क्षेत्र व्यवस्थापक बी.डी.मुंडे यांची मदतनीस पदी नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर त्यांची चालक तर त्यानंतर सहायक क्षेत्र व्यवस्थापक पदी केडर बदलुन पदोन्नती देण्यात आली असल्याची बाब ॲड.प्रमोद नरवाडे माहिती अधिकारात उघड केली आहे.

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. अन्वरुल्लाह खान पि. नुरुल्लाह खान व इतर, रा. नांदेड ता.जि. नांदेड यांनी मौ. ब्रम्हपुरी ता. जि. नांदेड सर्वे नं. ३८/२ मधील क्षेत्र ०० हे. ४२ आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. ब्रम्हपुरी ता. जि. नांदेड सर्वे नं. ३८/२ मधील क्षेत्र ०० हे. ४२ आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. मोहम्मद खुर्शिद पि. अब्दुल जलील, रा. मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड यांनी मौ. ब्रम्हपुरी ता. जि. नांदेड सर्वे नं. ३८/२ मधील क्षेत्र ०० हे. ४० आर जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. ब्रम्हपुरी ता. जि. नांदेड सर्वे नं. ३८/२ मधील क्षेत्र ०० हे. ४० आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय**